(डेक्कन् व्हरनॅक्युलर ट्रॅन्स्लेशन् सोसाइटीकडून बक्षिस मिळालेलें)

रजाचा गज

नाटक.

हें

आंग्लकवि शेक्सपियरच्या 'मच् अॅडो अबाउट् नथिंग्'

या पुस्तकाच्या आधारानें

रा. पांडुरंग गंगाधर लिमये, बी. ए.,

'चतुरगडच्या विनोदी स्त्रिया' या पुस्तकाचे कर्ते,

यांनीं लिहिलें.

आवृत्ति १ ली.

मुंबई—निर्णयसागर छापखान्यांत छापिलें.

पुणें,

जून, १९०६.

प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तक शेक्सपियरकृत " Much Ado About Nothing " नांवाच्या विनोदप्रचुर नाटकावरून लिहिलेलें आहे. यांतील चतुरिका या पात्रास जास्त विनयशील बनवितां आलें असतें; परंतु असें केल्यानें मूळांतील Beatrice चें चित्र हुबेहुब वठलें नसतें, व नाटकांतील मुख्य रसाचा भंग झाला असता. सबब चतुरिकेवर बेमर्यादशीलपणाचा आरोप येणाच्या शक्यतेकडे किंचित् दुर्लक्ष्य करून, Beatrice ची प्रतिमा मूळांतल्या प्रमाणें उतरविण्याकडे विशेष लक्ष्य पुरविलें आहे. परभाषेंतील ग्रंथांच्या बहुतेक रूपांतरांतील स्त्रीपात्रांच्या वर्तनांत, आपल्या समाजाच्या दृष्टीनें पाहतां, कमीजास्त प्रमाणानें मर्यादातिक्रम दिसून येतो, हा सामान्य अपवाद चतुरिकेसंबंधानेंही घेतां येईल. तथापि, असा मर्यादातिक्रम नाटकांतील पात्राच्या ठायीं क्षम्य आहे, असें लेखकाच्या अल्पमतीस वाटतें.

प्रस्तुत कृति आपल्या समाजाचें चित्र नसून, केवळ एका इंग्रजी नाटकाचें रूपांतर आहे, या दृष्टीनेंच तिच्यांतील गुणदोषांविषयीं टीका करणें योग्य आहे.

या पुस्तकास डेक्कन् व्हरनॅक्युलर ट्रॅन्स्लेशन् सोसाइटीनें बक्षिस दिल्याबद्दल मी त्या सोसाइटीचा फार आभारी आहें. वाचकवर्गाकडून असाच आश्रय मिळेल, अशी आशा आहे.

पुणें,
ता. १ माहे जून, सन १९०६. } पांडुरंग गंगाधर लिमये.

पात्रें.

चंद्रकांतः—भरतपूरचा राजा.

दुर्मदरावः—चंद्रकांताचा लेकवळा भाऊ.

विश्वासराव
प्रमोदराव } —चंद्रकांताच्या पदरचे सरदार.

दौलतरावः—धर्मपुरीचा सुभेदार.

मल्हाररावः—दौलतरावाचा भाऊ.

येसाजी
कोंडीबा } —दुर्मदरावाचे अनुयायी.

विद्याधरपंडित.

अर्जुनः—चंद्रकांताचा नोकर.

सांभारेः—कोतवाल.

पिंगळेः—कोतवालाच्या हाताखालचा एक अधिकारी.

खांडव्या
चपात्या } —गस्तवाले.

सरलाः—दौलतरावाची मुलगी.

चतुरिकाः—दौलतरावाची पुतणी.

मालती
अंजनी } —सरलेच्या दासी.

रजाचा गज.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

[**स्थळ**—दौलतरावांचा वाडा:—दौलतराव, सरला, चतुरिका व एक जासूद बोलत आहेत.]

दौलतराव—चंद्रकांत महाराज आज रात्रीं येथें येऊन दाखल होणार, अशा आशयाचें हें पत्र आहे.

जासूद—एव्हांना ते अगदीं जवळ येऊन ठेपले असतील. मी पुढें निघालों तेव्हां ते येथून १०।१२ कोसांवर होते.

दौलतराव—या मोहिमींत तुमचे किती लोक पडले असतील बरें?

जासूद—थोडे फार गमावले असतील; पण सांगण्यासारखा एकही नाहीं.

दौलतराव—वा! याला ह्मणावें विजय. पुढल्या मजकुरावरून सरदार विश्वासराव यांचा महाराजांनीं चांगलाच बहुमान केला आहे, असें दिसतें.

जासूद—विश्वासरावांनीं तरवारच तशी गाजविली; आणि महाराजांनीं त्यांच्या गुणाची पारखही योग्य केली. वयाच्या मानानें पाहतां, त्यांनीं अदमासाबाहेर पराक्रम करून दाखविला. मूर्ति लहान पण कृति थोर खरी! कशी, याची आपण कल्पनाच करावी.

दौलतराव—आमच्या धर्मपुरींत त्यांचे एक चुलते आहेत, त्यांनां या गोष्टीचें फार कौतुक वाटेल.

जासूद—त्यांचीं पत्रें त्यांनां देऊनच मी इकडे आलों. तीं पाहून त्यांनां इतका आनंद झाला कीं, त्याच्या योगानें कंठ दाटून येऊन त्यांच्या डोळ्यांवाटे आनंदाश्रु वाहूं लागले.

दौलतराव—साहजिकच आहे. अशा पवित्र अश्रुजलानें ज्यांचीं मुखें निर्मल होतात, त्या महात्म्यांची योग्यता काय सांगावी! खरोखर, दुसऱ्याला रड लागलेली पाहून सुख मानून घेणाऱ्या अधमांपेक्षां, लोकांचें सुख पाहून आनंदाश्रु काढणारे पुण्य पुरुष किती तरी चांगले!

चतुरिका—बरं कायहो, ते समशेरबहाद्दर मोहिमीवरून परत आले का?

जासूद—कोण ह्मटलेंत बाईसाहेब, समशेरबहाद्दर? मीं तर हें नांव सुद्धां आजपर्यंत ऐकलें नव्हतें. आमच्या सगळ्या लष्करांत या नांवाचा इसम नाहीं.

दौलतराव—कायग, कोणाची चौकशी चालविली आहेस?

सरला—प्रमोदराव सरदारांची.

जासूद—ते होय? तेही स्वारीबरोबरच आहेत. नेहमींप्रमाणें रंगेल आहे स्वारी! त्यांनीं देखील आपल्या अंगचें शौर्य चांगलें प्रकट केलें.

चतुरिका—उजेड! त्यांच्या तेवढ्या बाताच ऐकून घ्याव्यात. जळली ती ज्या त्या गोष्टीची घमेंड. त्यांनां वाटतं, मी कायतो शहाणा, मी शूर, मी सुरेख! परवां आपले हे राजश्री "प्रत्यक्ष कामदेव माझ्या प्रमाणं स्त्रियांचीं हृदयं भेदूं द्या," ह्मणून फुशारकी मिरवूं लागले. तेव्हां या गर्वोक्तीबद्दल त्यांची फजिती उडविण्याच्या हेतूनं काकांचा खुषमस्कऱ्या त्यांनां एक गिलोल देऊनं ह्मणाला कीं, "तुह्मीं या आयुधानं चिमण्याच मारीत बसावंत; तुह्मी कुसुमायुधाची बरोबरी कशाला

करतां ?" तें असो; पण काय हो, या मोहिमींत त्यांनीं शत्रूंकडचा एक तरी माणूस मारला का? मीं त्यांनां ह्मटलं होतं कीं, "तुह्मी माराल तेवढ्यांचा मी स्वाहा करीन;" ह्मणून विचारत्यें.

दौलतराव—कायग पोरी, प्रमोदरावांची अशी कुचेष्टा चालविली आहेस, पण खात्रीनें सांगतों कीं, ते तुझ्यासारख्या दहा जणींनां पुरून उरतील.

जासूद—या लढाईंत त्यांनीं अगदीं प्रलय करून सोडिला. शत्रूंनां ते अगदीं काळासमान वाटत होते.

चतुरिका—मुळींच नाहीं; गोगलगाईसमान वाटले असतील. आतां ते खायला मात्र अगदीं काळ आहेत खरे! स्वारीचा जठराग्नि सदा प्रदीप्त; शौर्याग्नि मात्र अगदीं मंद—विझलेलाच ह्मणानात?

जासूद—छेहो, ते शूर आहेत.

चतुरिका—चुलीपुढें ना? आहेत खरे शूर! पण वीरांपुढें?

जासूद—तुह्मी काय समजलां आहांत? ते वीराला सवाई वीर आहेत, शाहण्याला—

चतुरिका—दीड शाहाणे आहेत!

जासूद—संपूर्ण गुणांनीं अगदीं भरले आहेत.

चतुरिका—दुर्गुणांनीं भरले आहेत खरे! त्यांनां एकदां स्वच्छ धुवून तरी काढा! बरं, पण जाऊं द्या; आपल्याला काय करायचं आहे?

दौलतराव—चतुरिके, आत्तां इतक्यांत महाराज वगैरे मंडळी येतील; त्यांच्या स्वागताची नीट व्यवस्था करून ये पाहूं?

चतुरिका—आज्ञा महाराज. लहानपणीं आह्मी एके ठिकाणीं खेळत होतों, तेव्हां मी राणीसरकार होत होतें. आणखी ते चाकर होत होते; तेच आतां महाराज ह्मणून येणार, आणखी मी त्यांच्या स्वागताची व्यवस्था करणार! मजा आहे न् काय!

[जाते.]

दौलतराव—हें पहा, हिच्याबद्दल तुह्मी आपला भलताच ग्रह होऊं देऊं नका. हिचा आणि प्रमोदरावांचा हा नेहमींचाच प्रकार आहे. महाराज, विश्वासराव, आणि प्रमोदराव यांच्या सहवासांत तिचे लहानपणचे बरेच दिवस गेले असल्यामुळें ती सहजच प्रमोदरावांशीं आणि विश्वासरावांशीं विशेष सलगीनें वागते; आणि महाराजांशीं देखील वास्तविक जितक्या अदबीनें वागलें पाहिजे, तितकी ती वागत नाहीं. त्याचप्रमाणें लहानपणीं नीटशा धाकांत न ठेवल्यामुळें ती एखादवेळ आमच्यापुढें देखील आपल्या मर्यादेचें उल्लंघन करते. बाकी ती हाडाची अगदीं गरीब आहे. तुह्मांला तिची एकंदर बाह्य वर्तणूक चमत्कारिक आणि गैर वाटण्याचा संभव आहे, ह्मणून हा पूर्व वृत्तांत सांगून ठेवतों. आतां पहालच तुह्मी, (चतुरिका येते.) प्रमोदरावांची आणि हिची भेट होण्याचा अवकाश, कीं झाली वाग्युद्धाला सुरवात, आणि लागले एकेकांच्या अकलेचे तारे तुटायला.

चतुरिका—पण माझ्यापुढें त्यांचा मुळींच निभाव लागत नाहीं. असेच मागं एकदां आले होते माझ्यापुढें दिमाख दाखवायला; पण त्यांच्या अकलेचे मीं तीन तेरान् नऊ अठरा करून सोडले. आतां जर चुकून माकून त्यांच्या डोक्याच्या कानाकोपऱ्यांत थोडीबहुत अक्कल अडकून राहिली असेल, तर ती तरी नीट जपून ठेवा, ह्मणावं. नाहींतर मनुष्यपणाचं चिन्ह जी विचारशक्ति, तीच अजीबात नाहींशी झाली, ह्मणजे त्यांच्यांत आणि पशूंत कांहींच भेद राहणार नाहीं. बरं पण हल्लीं त्यांचे जीवश्चकंठश्च कोण आहेत ?—चार चार दिवसांनीं बदलत असतात.

जासूद—छे, असें कसें होईल ?

चतुरिका—कसं होईल ह्मणजे ? त्यांचं मन अळवावरच्या पाण्याइतकं स्थिर आहे ह्मणून.

जासूद—मला वाटतें त्यांच्या आणि तुमच्या ग्रहांनां पटत नाहीं.

चतुरिका—नाहींच ! त्यांचं पाऊल जर माझ्या गृहांत पडलं, तर त्याला मी आग लावून टाकीन. पण आजकाल त्यांचे दोस्त कोण आहेत तें नाहीं सांगितलंत ? असतील एखादे वाऱ्याशीं भांडणारे पोळ.

जासूद—ते बहुतेक सरदार विश्वासराव यांच्या सहवासांत असतात.

चतुरिका—नशीब त्या विश्वासरावांचं, कीं ही साडेसाती त्यांच्या मागं लागली ! पटकी वगैरे स्पर्शजन्य रोगांतच प्रमोदरोग दाखल केला पाहिजे. तो एकदां लागला ह्मणजे सुटका कठीणच. एकदां ही जळू चिकटली कीं चिकटली.

जासूद—तुमच्या पुढें बोलण्याची कांहीं, बाईसाहेब, माझी सोय नाहीं.

चतुरिका—मर्जी तुमची !

दौलतराव—काय वेडी आहे पोर !

चतुरिका—डागल्याखेरीज कांहीं माझं वेड जाणार नाहीं.

जासूद—ही महाराजप्रभृति मंडळी आली.

(चंद्रकांत, दुर्मदराव, विश्वासराव, व प्रमोदराव प्रवेश करितात.)

चंद्रकांत—दौलतराव, आजकाल जगाची रीत अशी दृष्टीस पडते कीं, होतां होईल तों दुसऱ्यांपासूनचा उपद्रव टाळायचा; पण तुमची गोष्ट याच्या अगदीं उलट दिसते बुवा ! नाहींतर आपण होऊन तुह्मीं आह्मांला इकडे कशाला बोलाविलें असतें ?

दौलतराव—महाराजांच्या चरणाची धूळ माझ्या घराला लागली, यांत उपद्रव तो काय झाला ? आपली कृपादृष्टि कायम रहावी, यांतच मला समाधान आहे.

चंद्रकांत—डोक्यावर पडलेला भार तुह्मी फार खुषीनें सहन करतां खरे ! ही कोण तुमची मुलगीचना ?

दौलतराव—असें ह्मणतात.

प्रमोदराव—ह्मणतात ह्मणजे ? तुह्मांला कांहीं शंका आहे वाटतें ?

दौलतराव—नाहीं मेहेरबान. शंका येण्याचें कारण नाहीं, कारण ती झाली तेव्हां आपण पाळण्यांत निजत होतां; आपल्याला कांहीं कमजास्त समजूं लागलें नव्हतें.

चंद्रकांत—वा ! अगदीं शालजोडींतले मिळाले ! हल्लीं आपण कोणत्या चालीचे गृहस्थ आहां, हें या भाषणावरून ओळखितां येण्यासारखें आहे. खरोखर, मुलगी ह्मणजे हुबेहुब वडिलांची प्रतिमा आहे !

प्रमोदराव—ती किती जरी दौलतरावांसारखी दिसत असली, तरी ती त्यांनां बाप नाहीं ह्मणणार.

चतुरिका—काय बाई नवल तरी ! खेंटर सुद्धां ऐकत नाहीं, तरी यांची आपली टकळी चाललीच आहे एकसारखी !

प्रमोदराव—अरे वारे तुसडाबाई ! आपण जिवंत आहां का अजून ? मीं ह्मटलें कोणाच्या मुखांतून मुक्ताफळें गळालीं !

चतुरिका—आपल्यासारखं सुग्रास अन्न मिळाल्यावर तुसडाबाईला मरायला काय झालं आहे ? असलं मिष्ट अन्न पाहिल्यावर प्रत्यक्ष सौजन्याच्या देखील तोंडाला पाणी सुटून तें तुसडाबाईच्या पंक्तीला बसेल !

प्रमोदराव—तर मग सौजन्याला मुळींच स्वाभिमान नाहीं ह्मणायचा? तें कांहीं असो; पण हें पहा, तुला खरें सांगतों कीं, तुझ्याशिवाय सर्व स्त्रीजातीचा मी अगदीं प्यार आहें. आतां माझें हृदय कठीण नसावें, अशी माझी मनापासून इच्छा आहे; पण काय उपयोग ! माझ्या मनांत एक देखील स्त्री उतरत नाहीं.

चतुरिका—खरं खरं ! हें पहा कीं नाहीं, सरले, एक होता कोल्हा, बरं का ? त्याच्या तोंडाला द्राक्षं पोहोंचेनात, तेव्हां तो ह्मणूं लागला कीं, "द्राक्षं आंबट आहेत."

प्रमोदराव—असलीं खवट बोलणीं बोलतेस, पण स्त्रीजातीचीच शपथ घेऊन सांगतों कीं, मला एक देखील स्त्री आवडत नाहीं.

चतुरिका—ईश्वराचे हे मोठे उपकारच ह्मणायचे कीं, स्त्रियांच्या मागं ही पीडा त्यानं ठेविली नाहीं. आतां आवडीविषयीं ह्मणाल, तर तुमचं माझं एक मत आहे. माझ्यापाशीं एखाद्यानं लावलेल्या प्रेमाच्या रडगाण्यापेक्षां अपरात्रीचं कुत्र्यांचं रडणं मला जास्त आवडतं.

प्रमोदराव—चाललेंच आहे! गाढवाला आपलें उकिर्ड्यावर लोळणेंच आवडतें. देव करो, आणि तुझें मत असेंच कायम राहो! नाहींतर एखादा पुरुष तुला आवडला कीं, त्याला कुरवाळून गोंजारून त्याचे मुके घेऊन त्याचें तोंड छिन्न विच्छिन्न करून टाकशील.

चतुरिका—तुमच्या सारखी जर सुरत असली, तर ती कांहीं माझ्या कुरवाळण्यानं जास्त विद्रूप दिसूं लागणार नाहीं.

प्रमोदराव—वा! काय जीभ वाजते आहे पण! जशी कांहीं घंटा!

चतुरिका—कबूल, देवाच्या एका बाजूला घंटा, आणि दुसऱ्या बाजूला काय असतं, तें तुह्मीच आपल्या तोंडानं कबूल करा.

प्रमोदराव—तुझ्या जिभेसारखी जर माझी घोडी चलाख आणि दमदार असती, तर काय बहार झाली असती. बरें आतां मेहेरबानी करून उगीच बैस. तुझ्या कटकटीचा कंटाळा आला.

चतुरिका—घोड्यासारखं अंग चोरून निसटायची तुह्मांला खोडच आहे.

चंद्रकांत—दौलतराव, तुमच्या निमंत्रणानुरूप आह्मी येथें येऊन तर ठेपलों. आतां एक महिनाभर आमचा तळ येथून हालत नाहीं; आणि कांहींतरी निमित्तानें याहूनही अधिक दिवस आमचें वास्तव्य येथें व्हावें, अशी तुमची फार फार इच्छा आहे ह्मणतां; पण हें तुमचें बोलणें उगीच वर वर नाहींना?

दौलतराव—हें काय विचारतां महाराज! दुर्मदराव, आपणही रहावयाचें. आपल्या बंधूंचें आणि आपलें पुन्हां सख्य झालें, तेव्हां मी आपलाही बंदा आहें.

दुर्मदराव—आमचें काय ह्मणा ! मी आपला फार आभारी आहें.

दौलतराव—तर मग चलायचें आतां.

चंद्रकांत—हो चला; आपण मिळूनच जाऊं.

(विश्वासराव व प्रमोदराव यांशिवाय सर्व जातात.)

विश्वासराव—कां प्रमोदराव, पाहिलीतना दौलतरावांची मुलगी?

प्रमोदराव-पाहिली, पण तितकें लक्ष्य लावून नाहीं पाहिली.

विश्वासराव—मोठी मर्यादशील आहे, नाहीं?

प्रमोदराव—माझा खरा अभिप्राय तुह्मी सरळ मनानें विचारतां, कां बायकांवर ताशेरा झाडण्याच्या माझ्या नेहमींच्या संवयीला अनुलक्षून विचारतां?

विश्वासराव—नाहीं हो ! तुमचें तिच्याबद्दल काय मत झालें असेल, तें खरें खरें सांगा.

प्रमोदराव—सांगूच तर मग? ऐका. मी तिची मोठी थोरली उच्च प्रशंसा केली असती, पण ती स्वतः पडली फार ठेंगणी. आतां अगडबंब तारिफ करावी, तर ती अगदींच किरकोळ आहे. बरें, ती धवलकीर्ति आहे, असेंही ह्मणतां येत नाहीं, कारण ती थोडी काळी सांवळी आहे. बाकी येवढें कबूल करतों कीं, ती आपल्यापेक्षां कुरूप बायकांहून खास सुरूप आहे. तथापि तिच्याहून खुपसुरत ज्या स्त्रिया जगांत आहेत, त्यांच्यापुढें ती कुरूपच नाहीं कां ?

विश्वासराव—अशी कुचेष्टा नका करूं हो ! खरेंच ती कशी आहे, असें तुह्मांला वाटतें?

प्रमोदराव—येवढा वेळ काय ऐकलेंत? पुन्हां खोदखोदून विचारतां, तेव्हां तिला खरेदी घेणार आहां कीं काय?

विश्वासराव—असलें रत्न पैदा करण्याची कोणाची ऐपत आहे?

प्रमोदराव—आणि त्याला शोभेलसें कोंदण तरी कोठें आहे, असें-

ही ह्मणा. पण कायहो? तुह्मी मला मनापासून विचारीत आहां, कां आपले एखाद्या कामार्ताची नक्कल करून "मदन मलारे बहु जाळी" आणि "छळितो अती। रतीचा पति॥" या नमुन्याचा पाल्हाळ लावणार आहां?

विश्वासराव—सांगितलेंना कीं, मी थट्टा करीत नाहीं आहें ह्मणून? खरोखर माझ्या दृष्टीनें तरी तिचें सौंदर्य अप्रतिम आहे.

प्रमोदराव—मला अजून चाळिशीवांचून दिसतें आहे. पण माझ्या दृष्टीनें माझ्या मनाला तुह्मी ह्मणतां अशा प्रकारची खबर अजूनपर्यंत तर कांहीं दिली नाहीं. आतां तिचीच चुलतबहीण पहा. शिशिर-ऋतूंतल्या शुष्क वृक्षांत आणि वसंत ऋतूंतल्या कोमल पालवींत जितकें अंतर, तितकेंच तुमच्या सरलेंत आणि चतुरिकेंत आहे. मात्र तिच्या अंगांत तेवढा कडकलक्ष्मीचा संचार नको होता. तें असो; पण तुमचा चतुर्भुज होण्याचा बेत नाहींना?

विश्वासराव—ती मनोहारिणी सरला जर मला आपले बाहुपाश घालील, तर स्वतःला चतुर्भुज करून घेण्याला मी एका पायावर तयार आहें.

प्रमोदराव—हं? एकून येथपर्यंत मजल येऊन ठेपली ह्मणा? काय चमत्कार आहे! उठला सुटला त्याला ह्मणे बायको पाहिजे! उद्यांच्या भाकरीची मारामार पडली तरी बेहेत्तर, पण आज बायको पाहिजे. साठ वर्षांचा जख्खड थेरडा कां असेना, पण तो सुद्धां पहिलीच्या तेराव्या दिवशीं दुसरी बायको करायला काय उतावळा होतो! पंधरासोळा वर्षांचीं कारटीं झालीं कीं, लागलीं रस्त्यानें लोकांच्या बायकांकडे पहायला! मला वाटतें ब्रह्मचारी या शब्दाचा अर्थ देखील हळू हळू लोक विसरूं लागतील. अहो वेडेपीर, माझें ऐकायचें असेल, तर हें बायकोचें लोढणें आपण होऊन गळ्यांत अडकवून घेऊं नका. नसलें ऐकायचें

तर खुशाल हें विकत श्राद्ध घेऊन बसा फुकट तर्पण करीत. हे पहा, महाराज तुमच्यासाठीं परत येत आहेत.

चंद्रकांत—(प्रवेश करून) अरे! तुह्मी अजून येथेंच कां आहां? येवढें काय कारस्थान चाललें आहे?

प्रमोदराव—तेवढें नका विचारूं मेहेरबानी करून.

चंद्रकांत—तर मग सांगाच; तुह्मांला माझी शपथ आहे.

प्रमोदराव—ऐकलेंतना विश्वासराव? मी बुवा अगदीं मूकस्तंभासारखा बसलों असतों, पण काय करावें? ही राजाची शपथ आलीना? नाहीं तर मीं तुमचें हितगुज यांनां कधींही सांगितलें नसतें. महाराज, हे राजश्री प्रेमपाशांत सांपडले आहेत. "कोणाच्या" ह्मणून विचारा कीं ?

चंद्रकांत—कोणाच्या बुवा?

प्रमोदराव—सरलेच्या.

विश्वासराव—हे कांहीं तरी बोलत आहेत झालें!

प्रमोदराव—कांहीं तरी बोलायला आह्मांला वेडच लागलें आहे. पण आपण मोठे शहाणे आहां, तें कांहीं तरी भलतेंच होऊं देऊं नका ह्मणजे झालें.

विश्वासराव—माझ्या मनोवृत्तींत फरक पडायचा नाहीं.

चंद्रकांत—तुमचें जर तिच्यावर प्रेम असलें, तर तुमची मनोवृत्ति खरोखरच न पालटो! कारण ती तुमच्या प्रेमाला अगदीं पात्र आहे.

विश्वासराव—असें बोलून माझ्या मनांतलें काढून घ्यावयाचें हाच कीं नाहीं आपला उद्देश?

चंद्रकांत—छे छे; तुमच्या गळ्याची शपथ, मला जें वाटलें तें मी बोललों.

विश्वासराव—आणि तुमच्या पायाची शपथ, मला जी शंका आली, ती मीं बोलून दाखविली.

प्रमोदराव—तुमच्या दोघांच्या दोन गळ्यांची आणि चार चार पायांची शपथ वाहून मी सांगतों कीं, माझ्या मनाचा जो तर्क झाला, तो मीं तुह्मांला सांगितला.

विश्वासराव—तर मग तुमचा तर्क बरोबर आहे. माझें मन तिच्यावर आसक्त झालें आहे खरें.

चंद्रकांत—ती तुह्मांला अगदीं अनुरूप पत्नी आहे, असें मी खात्रीनें सांगतों.

प्रमोदराव—मन आसक्त होण्याला तिच्या रूपांत येवढी काय जादू आहे, आणि ‘ अनुरूप पत्नी ’ येवढें मोठें संस्कृत विशेषण लावायला ती काय येवढी गुणांची खाण आहे, हें नाहीं आपल्याला समजत!

चंद्रकांत—तुह्मीं कधीं कोणच्या स्त्रीला चांगलें ह्मटलें आहे ?

विश्वासराव—एकदां एखादी गोष्ट यांच्या मनानें घेतली कीं, ‘ वज्रलेपो भविष्यति’; छे, फारच हट्टवादी स्वभाव.

प्रमोदराव—हें पहा तुह्मांला सांगतों, स्त्रीच्या उदरीं कांहीं दिवस माझा वास घडला, याबद्दल मी स्त्रीजातीचा फार आभारी आहें. स्त्रीनें माझें लालन पालन केलें याबद्दलही स्त्रीजातीचा मी फारफार ऋणी आहें. पण झाले येवढे उपकार बस्स झाले. प्रथम लग्न करून मग बायकोच्या प्रतापावर ‘जारिणीपति ’ हा किताब मिळवावा, अशी माझी मुळींच महत्वाकांक्षा नाहीं. स्त्रियांच्या पातिव्रत्यधर्मावर माझा मुळींच भरंवसा नाहीं; आतां स्त्रियांनींही पुरुषांवर नाहीं विश्वास ठेवूं, पाहिजे तर. सांगायला तात्पर्य काय कीं, मी अविवाहित राहणार; आणि असें राहण्यांतच अधिक मतलब आहे.

चंद्रकांत—बरें आहे बचाजी ! तुह्मांला जर प्रेमरोग जडून म्लानमुख झालेले न पाहीन, तर नांवच बदलून ठेवा.

प्रमोदराव—संतापानें, क्षुधेनें, किंवा शारीरिक व्यथेनें ह्मणाल, तर वेळेस कबूल करीन; पण प्रेमानें माझा चेहरा जितका उद्विग्न होईल, त्याच्या दसपट प्रफुल्लित जर तो मद्याच्या फक्त एका पेल्यानें करून न दाखविला, तर ह्मणाल तें ऐकेन.

चंद्रकांत—पद्दा बरें! आतां जर बदललांत, तर फजितीला पारावार नाहींसा होईल.

प्रमोदराव—ठीक आहे. जर बदललों, तर कसलेल्या निंदकांची एक कचेरी भरवा, आणि माझी टर उडविण्यांत जो पहिला येईल, त्याला शाबासकी द्या.

चंद्रकांत—बरें आहे; जें जें होईल तें तें दिसेलच. अहो, किती जरी नाठाळ जनावर असलें, तरी कांहीं कालानें आपोआप नरम आलेंच पाहिजे.

प्रमोदराव—या प्रमोदाचें हृदय ह्मणजे कांहीं जनावर नव्हे, तें अक्षय कठीणच राहणार; त्याच्यांत प्रेमांकुर ह्मणून उद्भवायचा नाहीं. उद्भवला तर मात्र मला जनावर ह्मणा; माझीं 'हिंदीपंचा'तल्याप्रमाणें वेडींवांकडीं चित्रें काढवा; आणि त्यांच्याखालीं "कामांध झालेला प्रमोद" असें लिहा.

चंद्रकांत—पाहूं आतां काय काय होतें तें. मदनाचे एकून एक बाण खपले असले, तर न जाणों; नाहीं तर तुह्मीं "मजवरि धरिं अनुकंपा" असें ह्मणायची वेळ आलीच ह्मणा.

प्रमोदराव—कशाची आली आहे अनुकंपा! आतां धरणीकंप होण्याचा जितका संभव, तितकाच तुमचें ह्मणणें खरें होण्याचा.

चंद्रकांत—हा दम कांहीं कायम राहणार नाहीं. बरें प्रमोदराव, माझें एक काम करा. दौलतरावांनां सांगा कीं, भोजनाची वेळ होई-

पर्यंत मला तिकडे यायला होणार नाहीं. त्यांनीं आज बराच थाट केला आहेसें दिसतें.

प्रमोदराव—माझ्या वेंधळ्याच्या हातून असली जबाबदारीची कामगिरी पार पडेल कीं नाहीं कोणास ठाऊक! ठीक आहे, येतों, रामराम.

विश्वासराव—महाराज, आतां मला आपण साहाय्य कराल तरच कांहीं होण्याजोगें आहे.

चंद्रकांत—कांहीं हरकत नाहीं. तुमच्या मुखांतून निघण्याचा अवकाश, कीं माझ्या हातून होण्यासारखी असेल तितकी खटपट करायला मी तयार आहें.

विश्वासराव—माझ्यावर हे तुमचे मोठे उपकार आहेत.

चंद्रकांत—पण तुह्मी खरोखरच तिच्यावर इतके अनुरक्त झालां आहां कां?

विश्वासराव—काय सांगूं महाराज? परवां स्वारीवर जातांना जेव्हां प्रथम मीं तिचें मुखकमल पाहिलें, तेव्हांच ती मला आवडली. पण शिपाईगिरीच्या कामांत मन वेधलें असल्यामुळें ती नुसती आवड जास्त परिपक्व होण्याची आजपर्यंत संधीच आली नाहीं. त्या लढाईचें आतां नांव सुद्धां काढूं नयेसें वाटतें. ती मनोहारिणी सरला पूर्वींच आपल्या मनांत भरली होती, ती प्राप्त झाली तर आपल्यासारखा सुदैवी कोणी नाहीं, अशा प्रकारच्या कल्पनातरंगांनीं माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें आहे.

चंद्रकांत—अरे वा! तुह्मी तर आपल्या प्रेमाचा पाल्हाळ लावून माझे कान किटवायच्या बेतांत आलांत. तें असो; पण खरोखरच जर तुमचें सरलेवर प्रेम जडलें असेल, तर तें तसेंच वृद्धिंगत होऊं द्या. युक्तीयुक्तीनें दौलतरावांच्या आणि तिच्याजवळ ही गोष्ट काढून मी ती तुह्मांला

प्राप्त करून देतों कीं नाहीं पहा. आतां जी तुह्मीं चऱ्हाट वळायला सुरवात केली होतीत, ती येवढ्याकरितांच कीं नाहीं?

विश्वासराव—कामी जनांची मनोवृत्ति कशी असते, आणि त्यांच्यांशीं कसें वागावें, हें आपण उत्तम प्रकारें जाणत आहां. या कामांत माझा उतावळेपणा दिसू नये, ह्मणून मी आपलें हृद्गत जरा बेताबेतानें उघड करणार होतों.

चंद्रकांत—त्यांत येवढ्या द्राविडी प्राणायामाची काय जरूर? पुरापेक्षां पूल मोठा हवा कशाला? सरलेवांचून तुह्मांला दुसरें कांहीं दिसत नाहीं ह्मणतां; तेव्हां ती तुह्मांला मिळवून दिल्यानें माझ्या हातून अनायासें सत्कार्य घडल्यासारखें होईल. कारण, अपेक्षित वस्तूसारखी देणगी नाहीं. आजची रात्र मोठ्या चैनींत आणि गडबडींत जाणार, हें उघड आहे. तेव्हां मी घेतों तुमचा वेष, आणि संधि साधून तिला एकांतांत गांठतों; आणि मोठ्या शब्दांची आणि निरनिराळ्या उपमांची गर्दी करून, माझे प्राण तुझ्यावांचून—ह्मणजे तुमचे तिच्यावांचून—अगदीं व्याकुळ होत आहेत, असें हजार तऱ्हेंनीं हजार वेळ ह्मणून तिला अशी गुंग करून टाकतों कीं यंव्! मग लावायचें तिच्या बापाशीं बोलणें. त्याचा रुकार मिळाला कीं, "शुभमंगल सावधान!" कां, हा बेत तुह्मांला कसा काय पटतो?

विश्वासराव—तुमच्या धोरणानें चालावें, हेंच मला श्रेयस्कर दिसतें.

चंद्रकांत—चला तर मग त्याच उद्योगाला लागूं. (जातात.)

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—दौलतरावांच्या वाड्यांतील एक दिवाणखाना. दौलतराव व मल्हारराव प्रवेश करितात.]

दौलतराव—कायहो, तुमचा तो हा कोठें आहे? नाच बैठकीची वगैरे नीट व्यवस्था ठेविली आहे ना त्यानें?

मल्हारराव—होय; तो त्याच गडबडींत आहे. पण दादा, तुमच्या ध्यानीं मनीं देखील नसेल, अशी एक बातमी सांगायची आहे तुह्मांला.

दौलतराव—बातमी कसली बाबा, शुभ आहे ना?

मल्हारराव—तें आतां पहायचें आहे; पण एकंदरींत कुशलच आहे. महाराज आणि विश्वासराव यांचें ह्मणे खलबत चाललें होतें कीं, आजच्या-आज महाराजांनीं सरलेची एकांतांत गांठ घेऊन तिला आपला प्रेमभाव व्यक्त करून दाखवायचा; आणि तिचा जर त्यांच्यावर प्रत्यनुराग जडला, तर 'शुभस्य शीघ्रम्' करून लागलीच तुमच्यापाशीं मागणी करायची. आपल्या विश्रामबागेंतला एक नोकर आपण त्यांचे बेत आड्न ऐकले ह्मणून मला आत्तां सांगत होता.

दौलतराव—कोणीतरी अजागळानें तुह्मांला कांहींतरी सांगितलें आहे, झालें.

मल्हारराव—छे हो; तो इसम मोठा हुषार आणि तरतरीत आहे, पाहिजे तर मी त्याला बोलावून आणतों; तुह्मी स्वतःच त्याला विचारून पहा ह्मणजे झालें.

दौलतराव—जाऊं द्या कीं. मला कांहीं यांत विशेष अर्थ दिसत नाहीं. तरी पण न जाणों, प्रसंग आलाच तर सरलेला सावध करून ठेवलेलें असणें कांहीं वावगें होणार नाहीं. तुह्मी जाऊन तिला तयार करून ठेवा. अरे ए, ह्या, काय तुझें नांव? तूं आपलें काम समजलास ना? ए, तूं इकडे ये माझ्याबरोबर; तुला एक कामगिरी सांगायची

आहे; पाहूं तुझी कर्तबगारी. भाऊ, सगळ्यांनां मोठ्या खबरदारीनें वागलें पाहिजे ह्मणून ताकीद करा बरें कां ? (जातात.)

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—दौलतरावांच्या वाड्यांतील दुसरा एक दिवाणखाना. दुर्मदराव आणि कोंडीबा बोलत आहेत.]

कोंडीबा—कां धनीसाहेब, आपली मुद्रा आज इतकी खिन्नशी दिसते?

दुर्मदराव—अरे बाबा, तसेंच कांहीं कारण आहे.

कोंडीबा—पण कांहींतरी विवेक करावा धनीसाहेब.

दुर्मदराव—आग लागो तुझ्या त्या विवेकाला. कोरडा विवेक काय चाटायचा आहे ? ह्मणे विवेक करावा!

कोंडीबा—ते खरें धनीसाहेब, नुसत्या विवेकानें विपत्तीचा अंत होतो, असें नाहीं माझें ह्मणणें; तरीपण असलेल्या स्थितींत समाधान मानून घेतां येतें.

दुर्मदराव—हें तत्वज्ञान आपण कोठें पैदा केलें ? माझा इकडे हवा तसा उपमर्द होत आहे; आणि हे आले आहेत शहाणे मला साधुपणाच्या गोष्टी शिकवायला! तें कांहीं नाहीं; आपल्याला कांहीं बुवा आपलें खरें स्वरूप झांकतां येत नाहीं. मनाविरुद्ध गोष्ट घडली कीं, त्यापासून झालेला असंतोष कांहींकेल्या नाहींसा होणार नाहीं. तब्बेत लागेल तसे आपण वागणार, मग दुसऱ्याची मुळींच आपल्याला परवा नाहीं. आंत एक आणि बाहेर एक आपल्याजवळ मिळायचें नाहीं.

कोंडीबा—तें सारें खरें. पण दैव अनुकूल होईपर्यंत इतकें स्वेच्छ वर्तन न ठेवलें तर जास्त श्रेयस्कर नाहीं कां होणार ? प्रत्यक्ष भावाशीं द्रोह मांडलात, पण त्यानेंच पुन्हां आपल्यावर मेहेरनजर केली आहे. तेव्हां

ह्मणतों, आपलें बस्तान यथास्थित बसेपर्यंत, पुन्हां त्याची इतराजी न होईल अशाच तंत्रानें चाललें पाहिजे.

दुर्मदराव—मोठा आला आहे तंत्र आणि मंत्र सांगायला! त्याच्या अनुग्रहाची मला मुळींच खातर नाहीं. त्याचीचशी काय कथा; साऱ्या जगानें जरी माझा तिरस्कार केला तरी पतकरेल; पण भलेपणा मिळविण्यासाठीं एखाद्याचा तोंडपुजेपणा करणें आणि लाळ घोटणें या दुर्मदाच्या हातून कालत्रयीं घडणार नाहीं. आतां लोक "माझ्या अंगीं नम्रता वगैरे नाहीं, मी नीच हरामखोर आहें" ह्मणून ह्मणतील— ह्मणेनात बापडे? हरामखोर जरी झालों, तरी मी आपला सरळमार्गी हरामखोर आहें. माझा भाऊ जर मला मुसकें बांधलेल्या चावऱ्या कुत्र्याप्रमाणें वागवतो, तर मी तरी कशाला त्याच्याशीं विश्वासानें वागूं? मोकळा सुटलों कीं, त्याच्या नरडीचा घोट घ्यायला मी कधीं सोडायचा नाहीं. तोंपर्यंत मी असाच असंतुष्ट आणि दुर्मुखलेला राहणार. तूं आपलें ब्रह्मज्ञान आणि पांडित्य पुरे कर.

कोंडीबा—मग कांहीं हातपाय तरी हालवायला लागा; नुसतें असंतुष्ट राहून काय उपयोग?

दुर्मदराव—असें कसें ह्मणतोस? आजकाल माझा मसलतगार काय तो असंतोष! सगळा सल्ला त्याचा आहे. हें कोण आलें बरें? येसाजी वाटतें. (येसाजी येतो.) कां येसाजीराव, कसें काय? कांहीं नवलविशेष?

येसाजी—काय सांगावें धनी, मेजवानीचा अगदीं थाट पण थाट उडून राहिला आहे! आणखी कांहीं दिवसांनीं लग्नाच्या प्रयोजनांचीही पण गर्दी उडण्याचा रंग दिसतो आहे; लग्नाचा बेत घाटत आहे.

दुर्मदराव—मग काय, त्यांत कांहीं विघ्नसंतोषीपणा करायला येईल कीं नाहीं? लग्न करून बळेंच अस्वस्थता पदरीं बांधून घेणारे हे उंटावरचे शहाणे आहेत तरी कोण?

येसाजी—तुमच्या माहितींतलेच आहेत, तुमच्या दादासाहेबांच्या गळ्यांतले ताईत, अगदीं त्यांचे जीव कीं प्राण—

दुर्मदराव—सरदारबहाद्दुर विश्वासराव साहेब वाटतें?

येसाजी—अगदीं बरोबर.

दुर्मदराव—अरे वा ! नवरदेव तर खूप आहेत बुवा ! बरें, वधू कोण नेमस्त केली आहे ?

येसाजी—कोणीं कां केली असेना ? आपल्याला कांहीं कार्यसिद्धीला आमंत्रण यायचें नाहीं.

दुर्मदराव—तरी पण ?

येसाजी—सरला विश्वासरावांची अर्धांगी होणार !

दुर्मदराव—वाहवा ! येवढीशी आहे मिरबोंडी, आणि तिचें लग्न होणार कां ? जोडीतर मोठी नामी शोभेल बुवा ! पण ही खबर तुला कशी लागली ?

येसाजी—मी रोषनाईवर देखरेख वगैरे करीत होतों, इतक्यांत महाराज आणि विश्वासराव मारे हातांत हात घालून गंभीरमुद्रेनें बोलत बोलत तिकडून आले. त्यासरसा मी जरा आड उभा राहिलों. त्यांचें असें मेतकूट चाललें होतें कीं, महाराजांनीं विश्वासरावांचा वेष घेऊन त्यांनां सरला मिळवून द्यावी.

दुर्मदराव—बसा ह्मणावें वाट पहात. माझ्या मनांत धुमसत असलेल्या मत्सराग्नीला हा चांगला बळी आला आहे. माझ्या नाशाला कारण कायतो तो चढेल गुलाम विश्व्या; अलीकडे तो मला अगदीं पाण्यांत पहात असतो. त्याचें जर नाक कापतां आलें, तर मी आपल्याला कृतकृत्य समजेन. कां दोस्त, कसें काय ? तुमचें साहाय्य आहे कीं नाहीं ?

कोंडीबा—जिवांत जीव आहे तोंपर्यंत सेवेंत तत्पर आहों, धनीसाहेब.

दुर्मदराव—माझें नाक खालीं झालें ह्मणून कसे गुलाम अगदीं मिटक्या मारीत जेवीत असतील. त्यांचा सोंवळेकरी मला अनुकूल पाहिजे होता हो ! बरें चला, पाहूं कसा काय बार उडवून द्यायचा तो. (जातात.)

[पडदा पडतो.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

[स्थळ—दौलतरावांचा वाडा—दौलतराव, मल्हारराव, सरला, आणि चतुरिका बोलत आहेत.]

दौलतराव—आजचा दिवस तर निर्विघ्नपणें पार पडला. मेजवानीचा बेत अगदीं यथास्थित उतरला. आणि गाण्याला देखील चांगला रंग चढला होता, नाहीं ?

चतुरिका—निदान गाणार मंडळी तरी खूप रंगांत आली होती.

दौलतराव—दुर्मदराव कोठें आज भोजनाच्या वेळीं दिसले नाहींत!

मल्हारराव—आपणही नाहीं बुवा पाहिले!

चतुरिका—त्या गृहस्थांची नजर मोठी करडी आहे बाई! त्यांच्याकडे पाहिलं कीं, जें माझ्या काळजांत धडधडूं लागतं, तें तासभर रहात नाहीं.

सरला—पण त्यांचा स्वभाव फार उदास दिसतो.

चतुरिका—खरंच; एकदां बसले कीं अगदीं मठ्ठ! तोंडावाटे ब्र काढायचे नाहींत. त्या दुसऱ्या पोपटरावांचा नमुना यांच्या अगदीं उलट. एकदां बिचाऱ्याचं तोंड वाजायला लागलं कीं, जसा कांहीं तोफखाना! अति तिथें माती. त्या दोघांच्या दरम्यानच्या स्वभावाचा माणूस पाहिजे.

दौलतराव—मग काय तुझें ह्मणणें कीं, एखाद्या शस्त्रवैद्याकडून प्रमोदरावांची अर्धी जीभ कापवून दुर्मदरावांच्या जिभेला शिवली, आणि दुर्मदरावांच्या मुद्रेवरचें निम्में औदासिन्य प्रमोदरावांच्या तोंडावर फासलें तर—

चतुरिका—तर जो मनुष्य बनेल तो रूपवान्, हुषार, आणि हौशी असा असून त्याच्या जवळ पैशाची ऊब चांगली असली, तर पाहिजे ती स्त्री त्याच्यावर भुलेलच,—मात्र तो तिच्या मनांत भरला पाहिजे.

दौलतराव—मोठी बोलणारी वस्ताद आहे बुवा! अशा गुणांनीं तुला कोणी देखील वरणार नाहीं.

मल्हारराव—असें खरें!

चतुरिका—तर मग हवं होतं तेंच कपाळीं आलं ह्मणायचं! देव करो आणि तुमच्या तोंडांत साखर पडो! नकोग बाई! त्या मिशाळ आणि दाढ्याळ आणि केसाळ नवऱ्याशीं संबंध नको! त्याच्यापेक्षां एखादा बोकडाच्या केसांचा लठ्ठ बुरणूस पांघरून निजलेलं काय वाईट?

दौलतराव—बरें, जर एखादा बिनदाढीमिशांचा, गोरा गोमटा, गुळगुळीत गालांचा, छबकडा नवरा तुला मिळाला तर?

चतुरिका—त्याला घेऊन मी काय करूं? आपलं चोळीलुगडं नेसवून त्याला दासीसारखा बरोबर घेऊन मिरवूं? कां त्याला नाटकांत घालूं? दाढीमिशावाला राक्षस मला खपायचा नाहीं, आणि बिनमिशांच्या पोराला मी खपायची नाहीं.

दौलतराव—तर मग तुझें लग्न कसें होणार? तुला पुत्र कसा होणार? आणि तो तुझा नरकवास कसा चुकविणार?

चतुरिका—तो कायदा मला लागू नाहीं. आतां यमदूत मला कदाचित् नरकाच्या दारापर्यंत खेंचून नेतील, नाहीं असं नाहीं; कारण खालच्या दर्जाचे अधिकारी तेवढे येथून तेथून दुष्ट अरेराव असतात; पण शेवटीं तेथला अधिकारी मला ह्मणेल, "कायग चतुरिके, तूं कशाला इथें आलीस? तुह्मां कुमारिकांनां आंत येण्याची सक्त मनाई आहे;" कीं चालल्या चतुरिकाबाई स्वर्गलोकांत देवांच्या मांडीशीं मांडी ठोकून बसायला. मग तेथले देवबिव सारे आह्मांला खडीताजिम देतील; कीं बसली आमची स्वारी तेथून तुमच्या मृत्युलोकींची गम्मत पहात.

मल्हारराव—बरें सरले, तूं दादांचे ह्मणणें ऐकणारना?

चतुरिका—ऐकणारना ह्मणजे? (दौलतरावांकडे बोट दाखवून) "बाबा, मी कांहीं आपल्या इच्छेबाहेर वागणार नाहीं" असं लीनतेनं ह्मणणं

तिचं कर्तव्यच आहे. पण गडे सरले, पति मनाजोगा मिळाला तर ठीक आहे हो! नाहीं तर पुन्हां बापाला सांगावं कीं, (छातीवर हात ठेवून) "बाबा, मी कांहीं आपल्या इच्छेबाहेर वागणार नाहीं."

दौलतराव—शर्थ झाली बुवा इच्यापुढें! हें बघ चतुरिके, उगीच गमजा नको लावूं. स्वतः गळ्यांत मंगळसूत्र बांधून घेतल्याशिवाय कांहीं तूं रहात नाहींस खास! तुला देखील ताळ्यावर आणणारा एखादा वस्ताद नवरा भेटेल.

चतुरिका—ईश्वरीसंकेतच जर असा असला, तर तो सिद्धीस जायला नवीच नरसृष्टि निर्माण झाली पाहिजे. कारण मला ताळ्यावर आणतां येण्याइतकं पाणी सध्यांच्या एकाही पुरुषाच्या अंगांत नाहीं. ह्मणे पति ह्मणजे स्त्रियांचं अधिदैवत! आमच्या सारखंच हाडांमांसाचं पिंड, तें कसचं आलं आहे डोंबल्याचं अधिदैवत! मी ह्मणत्यें पुरुष काय येवढं पुण्य पदरीं बांधून आले आहेत, आणि स्त्रियांनीं काय कोणाचं घोडं मारलं आहे, ह्मणून त्यांनीं पुरुषांच्या अर्ध्या वचनांत रहावं, त्यांच्या सेवेंत तत्पर असावं, आणि त्यांची गुलामगिरी करावी! तें कांही नाहीं. सर्व स्त्रीपुरुष ह्मणजे एका ईश्वराचीं लेंकरं; तेव्हां तीं बहीणभावंडं झालीं. त्यांच्यात्यांच्यात विवाह ह्मणजे केवढा अधर्म आणि अनीति!

दौलतराव—बरें पुरे कर. सगळी अक्कल आतांच नको खर्चून टाकूं. बाळे सरले, महाराजांशीं कसें वागायचें तें नीट ध्यानांत आहेना? (दौलतराव व मल्हारराव जातात.)

चतुरिका—आतां काय बाई तुह्मी राणीसरकार होणार ना? पण माझं ऐकायाचं असलं तर आपली सांगत्यें कीं, लहान तोंडीं मोठा घांस घेणं कांहीं चांगलं नाहीं. ज्यानं त्यानं आपल्या पाहिरीप्रमाणं वागावं. खरं विचारशील तर आपल्या बरोबरीच्या घराण्यांतल्या पुरुषाशीं—उदाहरणार्थ विश्वासरावांसारख्याशीं—संबंध जोडलास तर त्यापासूनच तुला खऱ्या सुखाची प्राप्ति होईल. आतां महाराज आपण होऊन तुझी मागणी करीत

आहेत ह्मणशील; ह्मणून आपली त्यांच्या प्रेमाची पुरती पारख केल्याशिवाय एकदम त्यांनां वश होऊं नको हो! कारण हे राजेलोक पहिल्या प्रतीचे लहरी असतात. बाकी कुठेंही जा; प्रेम ह्मणून निरंतर आणि निश्चल राहिलं आहे, असं कचितच. जिथं पहावं तिथं प्रेमाची स्थिति ह्मणजे वाऱ्यावर ठेवलेल्या आधणाच्या पाण्यासारखी. स्त्री असो अगर पुरुष असो, त्याचं एखाद्यावर प्रेम बसलं कीं, हृदय अगदीं पोळं लागतं. प्रेमपात्राची गांठ पडली कीं, त्याच्या स्पर्शरूपी विसणानंच कीं काय कोणास ठाऊक, प्रेम जरा थंडावतं, आणि मग हळहळ अगदीं थंडगार पडतं; आणि मनुष्य पश्चात्तापांत पडतो.

सरला—एकूण अचल प्रेम जगांत नाहींच, असं कां तुझं ह्मणणं ?

चतुरिका—अग तसे अपवाद असतील, पण आपली तुला एक गोष्ट सांगितली. बरं तूं आतां असं कर. महाराजांनां त्यांच्या दिवाणखान्यांतून सहज दिसशील अशा ठिकाणीं आपल्या विश्रामबागेंत जाऊन बस; कीं आलेच ते तुझ्याकडे ह्मणून समज. मी तिथेंच जाईच्या मंडपांत तुझी वाट पहात बसलेली असेन. काय काय होईल तें तिथें मला येऊन सांग. समजलीसना ?

सरला—युक्तितर खूप आहे, पण ते आले नाहींत ह्मणजे मात्र मौज खरी!

(जातात.)

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—विश्रामबागेंतील एक लतामंडप. चतुरिका व प्रमोदराव बसलीं आहेत.]

चतुरिका—(स्वगत) दिवसाच्या दगदगीनं जीव कसा अगदीं त्रासून गेला आहे. ह्मटलं थोडी मोकळी हवाही लागेल, आणि सरलेची वाट पाहिल्यासारखंही होईल, ह्मणून येथें येऊन बसल्यें, तों हीच आपली पीडा मला येऊन भलतं सलतं सांगूं लागली आहे! मला वाटलं सरलाच आली, नाहींतर मी येथें आहे ह्मणून कांहीं यांनां समजूं दिलं नसतं. जसं कांहीं मीं

यांनां अजूनही ओळखलं नाहीं, असंच ढोंग करत्यें. (उघड) मग नाहीं कां सांगत तुमच्यापाशीं असं कोण ह्मणत होतं तें ?

प्रमोदराव—माफ करा. तुमच्यामध्यें तंटे लावल्याचेंच श्रेय मला मिळणार कीं नाहीं त्यांचें नांव सांगून ?

चतुरिका—बरं तुमचं नांव काय तें तरी कळंद्या ?

प्रमोदराव—माझें नांव कांहीं कां असेना ?

चतुरिका—काय ह्मणे माझं बोलणंचालणं नाटकी आहे, आणि माझी विनोदी भाषणं हरदासी नकलांवरून चोरलेलीं आहेत कां ? मी सांगत्यें, माझी अशी निंदा केलेले गृहस्थ त्या प्रमोदरावांखेरीज दुसरे कोणीही नाहींत.

प्रमोदराव—हे प्रमोदराव ह्मणजे कोण आहेत ?

चतुरिका—जसे कांहीं तुह्मांला माहीतच नसतील !

प्रमोदराव—खरोखरच नाहींत.

चतुरिका—त्यांनीं कधीं हसविलं नाहीं कां तुह्मांला ?

प्रमोदराव—पण ते आहेत तरी कोण ?

चतुरिका—हं: ! ते आहेत महाराजांचे खुषमस्करे. लोकांच्या टवाळक्या करण्यांत, आणि नाहीं नाहीं त्या कंड्या माजविण्यांत मोठे पटाईत आहेत; यामुळं लोक सदा त्यांच्या नांवानं खडे फोडीत असतात. अचकट विचकटपणें बोलून छाकट्या दुर्व्यसनी लोकांनां ते पोट धरधरून हंसवितात, तेव्हां त्यांनां मात्र ते अगदीं हवेसे वाटतात. अक्कलेच्या नांवानं जरी आवळ्यायेवढं आहे, तरी लफंगेपणांत कोणाला हात धरूं देणार नाहींत हो ! महाराजांच्या स्वारीबरोबरच आहेत ते.

प्रमोदराव—त्यांचा स्तुतिपाठ तर तुह्मीं फार चांगला गायलात. तो ऐकून ते आपल्याला अगदीं धन्य मानून घेतील. ते मला भेटले ह्मणजे तुमचें भाषण त्यांनां कळवितों.

चतुरिका—खुशाल, खुशाल ! ते फार तर मला एक दोन शिव्या

देतील; आणि माझी कुचेष्टा करून लोकांनां हंसवायचा प्रयत्न करतील. कोणींच जर कदाचित् नाहीं हंसलं, किंवा सगळ्यांनींच त्यांच्याकडे दुर्लक्ष्य केलं, तर खेंटरासारखं हिरमुसलं तोंड करून बसतील! मग जेवायचे नाहींत, खायचे नाहींत, कांहीं करायचे नाहींत.

प्रमोदराव—मग ते बरेच विचित्र प्राणी आहेत ह्मणायचे? बरें आहे, जातों. तुह्मांला मीं त्रास दिला याची माफी असूंद्या. (जातो.)

चतुरिका—(स्वगत) यथेच्छ तोंडसुख घ्यायला सांपडलं खरं! सरलेचा तर अजूनही ठिकाण नाहीं, तेव्हां आतां येथून जावं हेंच बरं दिसतं. (जाते.)

विश्वासराव—(प्रवेश करून, स्वगत) आत्तां महाराज काम फत्ते झालें ह्मणून सांगायला येतील. तोंपर्यंत ठरल्याप्रमाणें या लतामंडपांत बसावें.

(तसें करितो. नंतर दुर्मदराव व येसाजी प्रवेश करितात.)

येसाजी—आपण पाळतीवर बसलों त्याचें चीज झालें खरें! महाराज आतां या पावलीं दौलतरावांचा रुकार मिळवायला जातील.

दुर्मदराव—तो विश्व्या त्याची अगदीं चातकासारखी वाट पहात बसला असेल. तेव्हां थोडेसे विषबिंदु पाजून त्याची तृषा शांत करूं चला. (दोघे विश्वासरावाजवळ जातात.) कोण आहे, प्रमोदराव?

विश्वासराव—(बिचकत) हो; कां?

दुर्मदराव—महाराजांचा आणि तुमचा अतिशय स्नेह, ह्मणून आपला तुह्मांला सांगतों हो! अहो, त्या सरलेची किंमत ती काय, आणि हे तिच्या नादीं लागतात काय! तुह्मीच सांगा, यांच्या पायपोसाची तरी सर तिला आहे कां? तुमच्यासारख्यानेंच जर त्यांची कानउघाडणी केली तर बरें आहे; नाहींतर मला कांहीं ठीक लक्षण दिसत नाहीं.

विश्वासराव—पण ते तिच्या नादीं लागले आहेत कशावरून?

दुर्मदराव—हा येसाजी आणि मी आपले सहज बागेंत फिरत होतों; आणि बघतों तों त्या तिकडल्या बाजूला महाराज आपले तिच्या पायावर

मस्तक ठेवून राहिलेले ! मग आह्मी दडून उभे राहिलों. तेव्हां "तुझ्यावांचून पंचप्राण व्याकुळ होत आहेत, दगडाला देखील पाझर फुटला असता" वगैरे वगैरे शब्द आमच्या कानीं पडले.

येसाजी—आणखी "त्या माकडाची तुझ्याकडे वर मान करून पाहण्याची देखील सर नाहीं," असेंही कायसें ह्मणाले. कोण माकड कोणास ठाऊक !

दुर्मदराव—हा प्रकार पाहिल्यापासून मला बुवा फार वाईट वाटत आहे. तेव्हां ह्मटलें तुमच्याकडून तरी महाराजांनां ताळ्यावर आणण्याचा कांहीं यत्न करावा.

विश्वासराव—बरें आहे; पाहतों माझ्या हातून कांहीं होण्याजोगें असलें तर.

दुर्मदराव—बरें तर मग; जातों आह्मी आतां.

(दुर्मदराव व येसाजी जातात.)

विश्वासराव—(स्वगत) झालें, आटोपला आमचा ग्रंथ. जो विश्वास महाराजांचा अगदीं जीव कीं प्राण, त्याच्याशीं त्यांनीं विश्वासघात केला अं ! ते मला अशा वाटण्याच्या अक्षता लावतील ह्मणून स्वप्नांत देखील आलें नव्हतें. एकूण कामवासनेपुढें मित्रत्वाचें वगैरे सर्व नातें गुंडाळून धाब्यावर बसवायला मनुष्य कमी करीत नाहीं, असें झालें! छेः! प्रेमाच्या कामांत मध्यस्थाची योजना करणें अगदीं गैर; कारण तोच असा हातांवर तुरी देऊन निसटतो. सौंदर्यापुढें सत्यपणा, दृढनिश्चय वगैरे चटसारीं डगमगून जातात. त्या प्राणप्रिय सरलेचें आतां नांवच काढायला नको.

प्रमोदराव—(प्रवेश करून) हूं, विश्वासराव, आटपा लवकर, तयारी करा.

विश्वासराव—कसली ?

प्रमोदराव—संन्यास घ्यायची. कारण तुमची सरला उपटली महा-

राजांनीं. आतां कोठें जाऊन राहणार ? त्र्यंबकेश्वरास, कां काशीस, कां प्रयागास, कुठें ?

विश्वासराव—ती आणि महाराज आनंदांत नांदोत ह्मणजे झालें.

प्रमोदराव—तुमच्या आशीर्वादाची त्यांनां मुळींच अपेक्षा नाहीं. पण महाराज अशी दगलबाजी करतील, असें तुह्मांला वाटलें होतें कां ?

विश्वासराव—जाऊंद्या हो; माझ्याशीं बोलूं नका. तुह्मी आपले येथून जा कसे ?

प्रमोदराव—हा चांगला रोजगार ! केशाचें प्रायश्चित्त नाऱ्याला काय ह्मणून ? एक होता आंधळा, बरें कां; त्याचें एकानें पागोटें उडविलें; तर तो आपला खांबालाच झोडपायला लागला !

विश्वासराव—सोडा, जाऊंद्या मला. (जातो.)

प्रमोदराव—(स्वगत) आतां ही भागुबाई कुठेंतरी कोंपऱ्यांत जाऊन मुळ मुळ रडत बसेल. ती चतुरिका येवढी चाणाक्ष बायको, पण मला कसें तिनें ओळखिलें नाहीं ! अंधेरांत माझें तोंड दिसत नव्हतें ह्मणून आवाजही लपला होता का काय ? खरेंच कां लोक मला महाराजांचा खुषमस्कऱ्या ह्मणतात ? माझ्या बोलण्याचालण्यावरून कदाचित् ह्मणतही असतील ! पण नाहीं; ह्या सगळ्या त्या फटकळीच्या मनच्या कृति आहेत. बरें आहे ह्मणावें चतुरिके, तुझाही तमाशा पाहून घेईन.

चंद्रकांत—(प्रवेश करून) विश्वासराव हो कुठें गेले आहेत ?

प्रमोदराव—एक चाबूक, आणखी एक छाटी, कमंडलु, रुद्राक्ष वगैरे सामान आणायला गेले आहेत. त्यांच्या सरलेला तुह्मीं पटकावलीत, ह्मणून मीं त्यांनां सांगितलें. खरेंना ? तेव्हां ते ह्मणाले कीं, आतां आपण घेणार संन्यास, आणि गेले तावातावानें निघून.

चंद्रकांत—संन्याशाला चाबूक कशाला लागत असतो ?

प्रमोदराव—त्यांनां जी जम्मत सांपडली, ती त्यांनीं तुह्मांला दाखविली,

आणि तुह्मीं ती लांबविलीत ह्मणून त्यांनां एक पांचपन्नास फटके लगवायचे आहेत.

चंद्रकांत—वा! चोर सोडून संन्याशाला सूळ, हा चांगला न्याय आहे! तुमच्या ह्मणण्याप्रमाणें जम्मत पळवणारा मी, आणि त्यांनां फटके काय ह्मणून?

प्रमोदराव—ती तुह्मांला दाखविण्याचा मूर्खपणा त्यांनीं केला ह्मणून.

चंद्रकांत—खरें ह्मणाल, तर मी ती त्यांनां मिळवून देण्याच्या खटपटींत होतों.

प्रमोदराव—मग आमचा अदमास चुकला तर? एकंदरींत तुह्मीं फार चांगली गोष्ट केलीत; कारण एक कविश्रेष्ठानें ह्मटलें आहे कीं "उघड्यास वस्त्र द्यावें घाबरल्या–कामुकास तत्कांता."

चंद्रकांत—तें असो. पण तुमच्या विरुद्ध एक चतुरिकेची तक्रार आली आहे. तुह्मीं ह्मणे तिची फार निंदा केलीत?

प्रमोदराव—वारे वा! माझीच उलटी सुलटी उभी आडवी उडवून पुन्हां आपल्या चोराच्या उलट्या बोंबा! अहो, मीं ह्मणूनच तिचें बोलणें सहन केलें. आतां एका घटकेपूर्वीं, मला न ओळखून आपली सांगूं लागली कीं, प्रमोदरावांनां महाराजांचा खुषमस्कऱ्या ह्मणतात, तो मोठा टवाळ आणि लफंगा आहे"—अहो एक ना दोन! तिची जीभ ह्मणजे तरवारीची धार आहे नुसती! बोलण्याइतका जर तिचा श्वास घातुक असता, तर तिनें कालिय सर्पाला देखील लाजविलें असतें! तिला वरल्यानें जरी कृतयुगांतल्या माणसांच्या इतकें सौख्य प्राप्त झालें, तरी मी ह्मणतों, नको. पाहिजे तसल्या खवीसाला ती हवा तसा वांकवील, अगदीं त्याच्या नाकीं नव आणून सोडील. त्या डाकिणीचें नांव काढूं नका. एखाद्या पंचाक्षऱ्यानें जर आपल्या मंत्रसामर्थ्यानें तिचे सर्व व्यापार बंद करून टाकले, तर त्याचे जगावर फार उपकार होतील. ती जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत या भूतलावरचा वास आणि नरकवास सारखाच.—नव्हे

मी ह्मणतों, तिचें वारें लागण्यापेक्षां नरकवास बरा, असें ह्मणून लोक मुद्दाम पातकें करूं लागले तरी वाहवाच! ही पहा, आलीच ही लास.

(दौलतराव, सरला, व चतुरिका प्रवेश करितात.)

चतुरिका—(सरलेस) एकूण महाराजांनां कांहीं तूं ओळखलं नाहींस?

प्रमोदराव—महाराज, आतां येथें एक क्षणभर देखील उभें राहण्याची माझी सोय नाहीं. हवें तर सातसमुद्रांच्या पलीकडून मला एक मातीचें ढेंकूळ आणायला पाठवा, एका तासांत शंभर योजनें धांवून यायला सांगा, किंवा स्वर्गाला हात लावायला सांगा, पण हिच्याशीं प्रसंग नको! हिची जीभ फार तिखट आहे; ती नाहीं मला आवडत.

चंद्रकांत—पण असे निकरावर कां आलांत?

प्रमोदराव—ही फटाकडी आली आहेना? उगीच अंगाबिंगावर उडाली तर रिकामी पंचाईत!

[जातो.]

चंद्रकांत—कायहो चतुरिकाबाई, प्रमोदरावांचा आणि तुमचा ३६ चा आंकडा झाला हें खरें कां?

चतुरिका—कांहीं खोटं नाहीं. पहिल्या प्रथम आमचा अगदीं ६३ चा आंकडा होता. पण ते सहा आणि तीन जवळ जवळ येऊन शेवटीं इतक्या जोरानें एकामेकांतून घुसले कीं, तीन इकडे आले, आणि सहा तिकडे गेले. तेव्हां पासून ३६ चा आंकडा आहे खरा!

(विश्वासराव प्रवेश करितो.)

चंद्रकांत—कां हो विश्वासराव, असे उद्विग्न कां दिसतां?

विश्वासराव—कांहीं नाहीं महाराज!

चंद्रकांत—तुह्मांला कांहीं होत आहे कीं काय?

विश्वासराव—छे, तसेंही कांहीं नाहीं.

चतुरिका—मी सांगत्यें, हे उद्विग्नही नाहींत, आजारीही नाहींत, आणि प्रसन्नही नाहींत. यांनां बहुतेक मत्सरबुद्धीचा विकार झालेला असावा.

चंद्रकांत—वा! तुह्मीं अगदीं बरोबर ताडलेंत. पण यांच्या मनांत आलेला किंतु अगदीं निरर्थक आहे. घ्या विश्वासराव, ही आपली सरला संभाळा, आणि चिरकाल सुखांत कालक्रमण करा.

दौलतराव—विश्वासराव, ही मी आपली कन्या तुह्मांला अर्पण करितों; हिचा स्वीकार करा. इत:पर माझ्या सर्व धनदौलतीचेही अधिपति तुह्मीच.

चतुरिका—धनदौलतीचे अधिपति बरं कां? नाहीं तर समजाल दौलतरावांचेच पति ह्मणून! बरं विश्वासराव, आतां थोडं समयोचित भाषण करा कीं?

विश्वासराव—आनंदाचें खरें द्योतक ह्मणजे मौन. मला आतां किती आनंद होत आहे, हें शब्दांनीं सांगतां आलें, तर मला मुळींच आनंद झाला नाहीं ह्मणायचा. प्रिये सरले, तूं माझी झालीस तसाच मीही सर्वस्वी तुझा आहें, असें समज.

चतुरिका—हूं, सरलाबाई, आतां तुमची पाळी आली. कांहीं बोलणं सुचत नसलं तर तुह्मी आपल्या तोंडानं त्यांचंही तोंड बंद करून टाका.

चंद्रकांत—खरोखर तुमची बुवा अतिच उल्हासवृत्ति आहे!

चतुरिका—आणि त्यांत यांच्या प्रेमाचा फाल्गुनमास बोकळला आहे; मग काय विचारतां! काळजीचा आणि माझा बारावा बृहस्पति आहे. ती पाहिली कां त्यांनां सांगत्ये आहे कीं, माझ्या ध्यानीं मनीं स्वप्नीं तुमच्या शिवाय कांहीं दिसत नाहीं!

विश्वासराव—तुमचे कान फारच तिखट आहेत बुवा!

चतुरिका—वा:! एक ह्मणतो माझी जीभ फार तिखट आहे, एक ह्मणतो माझे कान फारच तिखट आहेत! मी ह्मणत्यें माझ्या नकळत माझी जीभ आणि कान तुह्मीं खाऊन तरी केव्हां पाहिलेत? लागली मंडळी एकामागून एक संसार थाटायला! माझा मेला अर्धा जन्म गेला तरी मी आपली कुवारीणच.

चंद्रकांत—मग तुमच्या मनांत सौभाग्यवती व्हायचें आहे कां ? मी देतों तुह्मांला पति शोधून.

चतुरिका—खरंच; टाकतां कां माझं एकदां लग्न करून ?

चंद्रकांत—तुह्मी होतां कां माझी बायको ?

चतुरिका—वाः "भटो भटो लग्न करा, तर ह्मणे तुह्मीच बायको व्हा" तशांतलीच गत केलीत. मला बायको हो ह्मणतां खरे, पण तुह्मी पडलांत राजे लोक ! कांहीं सामान्य पुरुष नाहीं. तेव्हां जसे सणावारीं घालायचे उंची कपडे निराळे, आणि रोजचे निराळे, तसे जर तुह्मी फक्त—

दौलतराव—बैस उगीच! हिच्या जीभेला हाड कसें तें नाहींच.

चतुरिका—तुमच्या जिभेला आहे वाटतं हाड ? महाराज, मी आपल्याकडून पुष्कळ यत्न करत्यें, पण जळली ही जीभ कांहीं ताब्यांत रहात नाहीं. माझं बोलणं कांहीं आपण मनावर घेऊं नये.

चंद्रकांत—खरें ह्मणाल, तर तुह्मीं मुकाट्यानें बसलेलेंच मला रुचत नाहीं. तुमचा स्वभाव बुवा फारच आनंदी! काय तुमच्या जन्मकालचा गुण असेल तो असो !

चतुरिका—छे, यांत जन्मकालाचा मुळींच गुण नाहीं, कारण मी झाल्यें तेव्हां माझी आई अगदीं "आई आई बया बया" करीत होती.

दौलतराव—अगदीं तुला पक्की आठवण आहेना ? बरें जा; मघाशीं तुला सांगितलेल्या कामाच्या व्यवस्थेला लाग जा.

चतुरिका—बरं आहे. [जाते.]

चंद्रकांत—इतका गमतीदार स्वभाव आपण कधीं पाहिला नव्हता !

दौलतराव—तें कांहीं विचारूं नका. चिंता ह्मणजे काय याची तिला कल्पनाच नाहीं.

चंद्रकांत—लग्नाची गोष्ट काढली कीं तिचें अगदीं पित्त खवळतें.

दौलतराव—एखाद्यानें जर तिच्यापाशीं प्रेमाचें बोलणें लावलें, तर त्याला ती कोठून मी इच्याकडे आलों, असें करून सोडते.

चंद्रकांत—प्रमोदरावांची आणि हिची खाशी जोडी शोभेल, नाहीं ?

दौलतराव—त्यांचें जर लग्न लावलें, तर बोलबोलून तीं आठादिवसांत एकमेकांनां भंडावून सोडतील !

चंद्रकांत—खरेंच! कां विश्वासराव, मुहूर्त केव्हांचा ठरवायचा?

विश्वासराव—माझी या घटकेला तयारी आहे.

दौलतराव—पण माझी नाहींना ? अशी घे ह्मटल्या कोठें लग्नाची तयारी होत असते ?

चंद्रकांत—तुह्मांला आतां दुसरें कांहीं सुचायचें नाहीं, ही गोष्ट खरी. पण त्यांतल्यात्यांत तुमचें–आणि आमचेंही–मनोरंजन होईल अशी मी एक अजब युक्ति योजिली आहे. ती सिद्धीस नेणें ह्मणजे भगीरथ प्रयत्नच आहेत; पण पाहूं. माझें ह्मणणें, प्रमोदरावांनां असें भासवायचें कीं, चतुरिकेचें त्यांच्यावर मन बसलें आहे; आणि चतुरिकेच्या मनांत असें भरवायचें कीं, प्रमोदरावांची तिच्यावर प्रीति जडली आहे. तुमची मदत पाहिजे, कीं बेमालूम काम होऊन जाईल. मग तुमच्या शेजारीं त्यांचें एक बोहोलें.

दौलतराव—होऊन जाऊंद्या. महाराज, हवा तो खटाटोप पडला, तरी माझी तयारी आहे.

विश्वासराव—आणि माझीही पण.

सरला—आणखी चतुरिकेला योग्य पति मिळाला तर माझ्या हातून होण्यासारखं असेल तें मीही पण मोठ्या आनंदानं करीन.

चंद्रकांत—(सरलेस) प्रमोदराव ह्मणजे लाखांतला मनुष्य आहे. तो कुलीन, शूर, आणि सुशील आहे, याबद्दल माझी खात्री आहे. चतुरिकेला कशी भुरळ पाडायची, हें मी तुह्मांला सांगतों. (दौलतराव व विश्वासराव यांस उद्देशून) आणि, प्रमोदराव जरी इतका बिलंदर आणि नाकमुरड्या आहे, तरी त्याच्या डोळ्यांत धूळ कशी टाकायची, हें मी तुह्मांला सांगेन. आपला बेत जर सिद्धीस गेला, तर मदन महाराजांनां आपल्या कामाचा राजिनामाच द्यावा लागेल. चला मी आपला सविस्तर बेत तुह्मांला कळवितों.

(जातात.)

प्रवेश ३ रा.

[**स्थळ**—दौलतरावांचें घर. दुर्मदराव व येसाजी प्रवेश करितात.]

दुर्मदराव—आपण रचलेला व्यूह तर सपशेल ढासळला; ते तिकडे मुहूर्त देखील ठरवायाला लागले. मग कसें काय बावा?

येसाजी—आपल्या जवळ, धनी, हजार युक्त्या आहेत. तुमचा हुकुम होऊं द्या कीं, हा पठ्ठा अजून त्यांच्या लग्नाला खो आणील.

दुर्मदराव—त्या विश्व्याचें जेणेंकरून नष्टचर्य ओढवेल, अशी पाहिजे ती गोष्ट कर; ती मला इष्टच आहे. त्याचें नांव काढलें कीं माझ्या तळपायांची आग मस्तकाला जाऊन पोहोंचते. बरें पण तूं हें लग्न कसें मोडणार?

येसाजी—अर्थात सरळ मार्गानें नाहीं, हें तर उघडच आहे. पण, धनी, काम असें शिताफीनें करीन कीं, ज्याचें नांव तें.

दुर्मदराव—तें कसें काय ?

येसाजी—सरलेची अंजनी ह्मणून दासी आहे ती? तिचें आणि माझें जरासें सूत आहे, हें तुह्मांला माहीत असेलच ?

दुर्मदराव—बरें पुढें ?

येसाजी—सरलेच्या शयनमंदिराच्या खिडकींत रात्रीं अपरात्रीं पाहिजे तेव्हां ती उभी राहील, अशी व्यवस्था करणें माझ्या अगदीं हातचें आहे.

दुर्मदराव—अरे, पण ती खिडकींत उभी राहिल्यानें लग्न कसें जागच्या जागीं बसणार?

येसाजी—पुरतें ऐकून तर घ्या. तुह्मी महाराजांनां जाऊन असें ह्मणा कीं, विश्वासरावांसारख्या सरदाराचा त्या छिनाल सरलेशीं तुह्मीं विवाह जुळविलात, ही मोठी लांछनास्पद गोष्ट केलीत.

दुर्मदराव—माझ्या बोलण्याला प्रमाण काय ह्मणून त्यांनीं विचारलें तर?

येसाजी—त्यांना असेंच प्रमाण दाखवून देऊं कीं, त्याच्या योगानें महाराजांची अपकीर्ति, विश्वासरावांची दुर्दशा, सरलेच्या जन्माचें वाटोळें, आणि दौलतरावांचा 'रामबोलोभाईराम' होऊन जाईल. आणखी काय ह्मणतां ?

दुर्मदराव—हं, हं, आला तुझा कावा ध्यानांत. केवळ त्यांना अपशकुन करण्याकरितां मी स्वतःचें नाक कापून घ्यायला देखील तयार आहें.

येसाजी—मग हो धनी काय पाहिजे? महाराजांना आणि विश्वासरावांना एकदां एकांतांत गांठा; आणि द्या बेधडक सांगून कीं, सरला मला लागू आहे. त्या व्यभिचारिणीशीं संबंध जोडल्यानें दोघांच्याही नांवाला कलंक लागणार, वगैरे लंब्या लंब्या गोष्टी सांगून त्यांच्या मनाची अशी चलबिचल उडवितां कीं यंव ! आतां ते ह्मणतील कीं, "चक्षुर्वै सत्यम्" तर ह्मणावें प्रत्यक्ष डोळ्यांनीं बघून खात्री करून घ्या. लग्नाच्या आदल्या रात्रींच आणा त्यांना बोलावून; ह्मणजे तोंपर्यंत इकडली व्यवस्था चोख करून ठेवायला मला बरें पडेल. अंजनीला मी 'सखे सरले' ह्मणून हांक मारीन. 'सख्या जिवलगा' ह्मणून तिनें मला उलट हांक मारिली, ह्मणजे त्यांची अगदीं बालंबाल खात्री होऊन जाईल कीं, सरला निवळ बाजारबसवी आहे. मग कशाला लग्नाचें नांव काढताहेत !

दुर्मदराव—येवढा उपद्व्याप आपण करणार. मग काय व्हायचें असेल तें होईल. तूं मात्र संभाळ अं ? बघ, येवढें काम तडीस नेलेंस तर तुला सोन्यानें मढवून काढीन.

येसाजी—हो हो. तुह्मी मला सोन्यानें मढवून काढाल, वर हिरे माणकें देखील लावाल; त्याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. पण ह्लींच्या कामगिरींत मात्र डरूं नका, ह्मणजे झालें.

दुर्मदराव—नक्की मुहूर्त केव्हांचा ठरला, त्याचा अगोदर पत्ता काढला पाहिजे. (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळ–विश्रामबाग. प्रमोदराव प्रवेश करितो.]

प्रमोदराव—कोण आहे रे तिकडे?

गडी—(प्रवेश करून) जी सरकार–

प्रमोदराव—तें कोंचावर माझें गोष्टीचें पुस्तक पडलें आहे, तेवढें घेऊन इकडे ये.

गडी—हा आलोय न्हवका?

प्रमोदराव—आलास तो पाहिला रे. पण परत जाऊन तें पुस्तक घेऊन पुन्हां माघारा ये. समजलास? – पण नको. आह्मी आपले नुसतेच हवा खात बसतों. (गडी जातो.) हं! कामी जनांच्या व्यापारांनां हंसणारीं माणसें स्वतः प्रेमाच्या कचाट्यांत सांपडलेलीं आढळणें, ह्मणजे मोठी मौज खरी! याच वर्गांतले आमचे विश्वासराव! ज्याच्या कानाला रणदुंदुभीच्या ध्वनीपुढें सर्व तुच्छ वाटत होतें, त्याच गृहस्थाला आतां शृंगारिक गाण्यांशिवाय दुसरें कांहीं रुचत नाहीं. एखादें उत्तम चिलखत अगर तरवार पाहण्याकरितां दहा दहा मैल उन्हातान्हांत तंगड्या तोडीत जाणाऱ्यांपैकीं गडी, पण त्याला आतां नटण्यामुरडण्यापलीकडे दुसरें कांहीं दिसत नाहींसें झालें आहे. तसेंच, त्याचें बोलणें किती साधें आणि सरळ असे; पण आतां जें एकेक विलायती बोलायला शिकला आहे, त्याला सुमारच नाहीं. माझ्यासुद्धां मनोवृत्ति अशा पालटतील काय? नाहीं. पण कांहीं नियम नाहीं सांगवत बुवा! मी स्वतः कामांध होऊन नाहीं नाहीं ते चाळे करित सुटायचा नाहीं ह्मणून कशावरून? बाकी संभव फार थोडा. कारण एखाद्या स्त्रीच्या नुसत्या सौंदर्यानें कांहीं आपल्या तोंडाला पाणी सुटणार नाहीं; कोरड्या दक्षतेनें आपण मोहून जाणार नाहीं; आणि सद्गुणांच्या पोकळ कीर्तीनेंही फसणार नाहीं. सौंदर्य, दक्षता, कुलीनत्व, विनय, गायनवादन कला इत्यादि गुण एका स्त्रीच्या अंगीं सांपडेपर्यंत मी एकाही स्त्रीच्या प्रेमपाशांत सांपडणार नाहीं. ओहो! हे पहा

महाराज आणि शृंगारराव येत आहेत. तेव्हां आपण या जाईच्या मंडपांत दडून बसावें.

(तसें करितो. नंतर चंद्रकांत, विश्वासराव, व दौलतराव प्रवेश करितात.)

चंद्रकांत—मग आहे का तुमची गाणें ऐकायची लहर?

विश्वासराव—हो हो. हा सायंकाळचा समय किती तरी शांत आणि रमणीय आहे! गाण्याला वेळ असावी तर अशी!

चंद्रकांत—प्रमोदराव कसे चोरासारखे लपून बसले आहेत, पाहिलेतना?

विश्वासराव—बरें अनायासें काम झालें. गाणें झालें ह्मणजे योजिलेला प्रयोग त्यांच्यावर करायचा.

चंद्रकांत—(अर्जुन सारंगी घेऊन येतो, त्यास) तेवढी ती चीज पुन्हां ह्मण बुवा एकदां.

अर्जुन—मला गायला सांगणें ह्मणजे गायनकलेचा अपमान करणें आहे, महाराज.

चंद्रकांत—असें ह्मणण्याची रीतच पडून गेली आहे; बरें गा आतां; पुरे झाले आढेवेढे.

अर्जुन—इच्छाच असली, तर ऐकवतों आपल्याला; पण खरें ह्मणाल तर माझी आवाजी जरा नादुरुस्त झाली आहे.

चंद्रकांत—बरें निदान वाजवून तरी दाखविशील? कां हातही नादुरुस्त झाला आहे?

अर्जुन—वाजवतों; पण ती चीज कांहीं अजून नीटशी बसली नाहीं. (वाजवूं लागतो.)

प्रमोदराव—(स्वगत) "ओहो! क्या बात ह्यू!" काय बेटा अगदीं तल्लीन होऊन गेला आहे. दीड दमडीच्या तारांच्या अंगांत आत्मा ब्रह्मांडीं नेण्याचें सामर्थ्य असावें, ह्मणजे केवढा चमत्कार!

अर्जुन—(गातो.)

चंद्रकांत—(गाणें संपल्यावर) फार सुरेख गाणें आहे खरें!

अर्जुन—पण गाणारा वाईट आहे, महाराज.

चंद्रकांत—असेंच कांहीं नाहीं. गाणाराही त्यांतल्यात्यांत बरा आहे.

प्रमोदराव—(स्वगत) काय लेकाचा गातो आहे! हेंच जर एखादें कुत्रें रडलें असतें, तर त्याला बिचाऱ्याला गोळी घालून गार केलें असतें. ह्या कुत्र्याचें रडणें अपशकुनवाणें नसलें ह्मणजे पुरे.

चंद्रकांत—बरें आतां उद्यांची नीट तयारी करून ठेव, बरें का? उद्यां सरलाबाईच्यापुढें तुमची परीक्षा व्हायची आहे. (अर्जुन जातो.) काय हो दौलतराव, चतुरिका प्रमोदरावांवर लुब्ध झाली आहे ह्मणून कायसें ह्मणत होतां नाहीं का तुह्मी?

विश्वासराव—(प्रमोदरावांस ऐकूं न येईल अशा स्वरानें) हूं. चालू द्या, पकडा शिकार. (मोठ्यानें) ती ह्मणजे पुरुषावर लुब्ध होईल, अशी माझी तर मुळींच कल्पना नव्हती.

दौलतराव—आणि त्यांतल्यात्यांत, ज्यांच्या नांवानें ती बाह्यात्कारें नेहमीं बोटें मोडीत असते, त्या प्रमोदरावांवर तिचें अंत:करण गुंतलेलें असणें, ही विशेष आश्चर्याची गोष्ट आहे.

प्रमोदराव—(स्वगत) हें काय गौडबंगाल आहे!

दौलतराव—येवढी जहांबाज बायको, पण तिला देखील कशी भुरळ पडली, याचें मला मोठें गूढ पडलें आहे.

चंद्रकांत—अहो ती कदाचित् ढोंग करीत असेल!

विश्वासराव—नाहीं कोणीं ह्मणावें?

दौलतराव—अरे बापरे! हल्लींच्या तिच्या अवस्थेला ढोंग कोण ह्मणेल?

चंद्रकांत—कां, अशी काय तिची अवस्था झाली आहे?

विश्वासराव—(हळूच) गळाला चांगलें आमिष लावा कीं, सांपडलाच मासा ह्मणून समजा.

दौलतराव—अहो, "आत्ताशा आपली ती नेहमीं सचिंत बसलेली असते," असें सरला ह्मणत होती तें एकलेंत ना?

विश्वासराव—हो, ह्मणत होती खरी!

चंद्रकांत—काय, तुह्मी ह्मणतां तरी काय? मला नव्हतें वाटत कीं, मदनाच्या शरांची तिच्या कठीण हृदयापुढें कांहीं दाद लागेल ह्मणून!

दौलतराव—किती झालें तरी, मी ह्मणतों, ती स्त्रीच आहे. त्या अर्थीं तिला पुरुषाचा अभिलाष होणें अगदीं साहजिक आहे. तरी पण तिनें प्रमोदरावांची निवड केली, हें फार विलक्षण दिसतें!

प्रमोदराव—(स्वगत) ह्या दाढीवाल्या बुद्ध्याच्या तोंडून हे शब्द येत आहेत, तेव्हां हें कपटजाल असेल, असें कांहीं ह्मणतां येत नाहीं.

विश्वासराव—(हलकेच) मासा अगदीं गळांत सांपडायच्या बेतांत आला असेल. चालूं द्या असेंच.

चंद्रकांत—तिनें आपला प्रेमभाव प्रमोदरावांनां व्यक्त करून दाखविला आहे का?

दौलतराव—नाहीं; आणि प्राण गेला तरी तसें न करण्याचा तिचा निश्चय आहे.

विश्वासराव—सरला मला सांगत होती कीं, ती ह्मणत्ये, "ज्या मुखानें प्रत्यक्ष तोंडावर देखील मी त्यांची हवी तशी अवज्ञा केली, त्याच मुखानें 'मला पदरांत घ्या' असें मी त्यांनां ह्मणूं तरी कशी?"

दौलतराव—ती तोंडानें कांहीं जरी ह्मणाली तरी मन कोठें स्थिर राहतें आहे ? आपली मध्यरात्रीं उठून प्रहरानुप्रहर प्रमोदरावांच्या नांवानें प्रेमपत्रिका लिहीत बसते; आणि आपणच सारें पुन्हां फाडून टाकते. तिला असें वाटतें कीं, "जेथें आपल्या प्रेमाची नुसती अवहेलनाच नव्हे, तर कुचेष्टा देखील व्हायची, अशा ठिकाणीं जाणूनबुजून प्रेमपत्रिका पाठवायची कशाला ?" ती ह्मणते, "आपल्यावरून जग ओळखावें. प्रमोदराव जर माझ्यापुढें लाळ घोटूं लागले, तर, माझें जरी त्यांच्यावर इतकें प्रेम आहे

तरी, मी त्यांच्याशीं तशीच वागेन." मला आपलें हें सरलेच्या सांगण्यावरून माहीत.

विश्वासराव—आणि मग आपली गुडघ्यांत मान घालून रडते काय, सुस्कारे काय टाकते, ऊर बडवून झिंज्या काय उपटून घेते, मध्येंच त्यांनां उद्देशून काहींच तरी बोलत काय सुटते, तें कांहीं विचारूं नका!

दौलतराव—अहो एक ना दोन. सरलेकडून मला सारें समजतें. ती तर म्हणत होती कीं, "ही चतुरिका वेळेस आपल्या जिवाचें काय करून घेईल, याची देखील मला धास्ती वाटूं लागली आहे."

चंद्रकांत—तिचा तर मौन धरण्याचा पक्का दुराग्रह दिसतो; मग दुसऱ्या कोणाकडून तरी ही गोष्ट प्रमोदरावांच्या कानावर घालवावी.

विश्वासराव—असें करून तरी काय होणार! ते उलट जास्तीच तिच्या पाठीस लागतील.

चंद्रकांत—मग त्यांनां सुळावर चढविलें तरी अन्याय होणार नाहीं. चतुरिका म्हणजे कांहीं अशातशांतली बायको नाहीं. रूपानें सुरेख असून गुणांनींही चांगली आहे.

विश्वासराव—आणि चांगली हुषार, धोरणी आहे.

चंद्रकांत—पण प्रमोदरावांवर प्रेम करतांना तिचा विचार गेला कुठें?

दौलतराव—विकाराचें पाऊल दारांत पडलें कीं, विचार खिडकीवाटे पळून जातो, अशी एक म्हण आहे. ती माझी पुतणी, तेव्हां तिच्याबद्दल मला फार काळजी वाटूं लागली आहे.

चंद्रकांत—हेंच जर तिचें माझ्यावर प्रेम असतें, तर मी कुलशीलाच्या वगैरे सर्व गोष्टी एकीकडे ठेवून मोठ्या आनंदानें तिला वरिलें असतें. कसेंही करा. पण, बुवा, ही गोष्ट प्रमोदरावांनां कळवाच. त्यांचें म्हणणें काय आहे, हें तरी निदान समजावून घ्या.

दौलतराव—त्यांच्यापाशीं गोष्ट काढून कांहीं उपयोग होईल, असें का आपल्याला वाटतें?

विश्वासराव—सरला ह्मणत होती कीं, तिची कांहीं आतां धडगत दिसत नाहीं. त्यांनीं जर तिचा अंगीकार केला नाहीं, तर ती खास झुरणीला लागून मरेल, पण त्यांची विनवणी ह्मणून करायची नाहीं. आणि इतकेंही असून ते जर हिची मनधरणी करूं लागले, तर वरकांतीं त्यांच्याशीं एक अक्षर सुद्धां सरळ बोलायची नाहीं.

चंद्रकांत—तिचें ह्मणणें अगदीं रास्त आहे. ही व्यक्ति वेळेस तिची फटफजिती उडवायला कमी करणार नाहीं, हें ती पुरें जाणून आहे. तुह्मांला माहीतच आहे त्यांचा स्वभाव कसा चढेल आहे तो. त्यांनीं ह्मणजे एक गोष्ट नांवें ठेवल्यावांचून किंवा कुचेष्टा केल्यावांचून ठेविली आहे, असें व्हायचेंच नाहीं.

विश्वासराव—बाकी त्यांचा चेहरामोहरा अगदीं मनांत भरण्याजोगा आहे.

चंद्रकांत—हो, मोहक आहे खराच.

विश्वासराव—तसेंच ते माझ्यामतें मोठे चतुरही आहेत.

चंद्रकांत—हो हो. त्यांची कुशाग्र बुद्धि कांहीं छपून रहात नाहीं.

विश्वासराव—आणखी त्यांच्या अंगीं शौर्यही बरेंच आहे.

चंद्रकांत—ही गोष्ट तर अगदीं निर्विवाद आहे. तरीपण भांडणतंट्याची वेळ आली कीं, ते त्यांतून मोठ्या शिताफीनें आपलें अंग काढून घेतात. कदाचित् सांपडलेच, तर त्यांच्यापासून उपद्रव व्हायची फारशी कोणाला भीति नसते.

दौलतराव—तरमग ते वाजवीपेक्षां फाजिल पापभीरु आहेत ह्मणायचे.

चंद्रकांत—कांहीं ह्मणा. त्यांच्या जिभेला जरी मुळींच आळा नाहीं, तरी मनापासून ते मोठे पापभीरु आणि ईश्वरपरायण असे आहेत. हें पहा दौलतराव, तुमच्या पुतणीबद्दल माझ्या देखील मनाला फार हुरहुर लागली आहे. चला, येतां का ? आपण जाऊन एकदां प्रमोदरावांनां सगळी हकीगत सांगून तरी पाहूं ?

विश्वासराव—छे:, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. पोक्त विचारानेंच जेव्हां तिचें मन शांत होईल तेव्हां होईल.

दौलतराव—ती आशाच नको. कारण मन शांत होण्यापूर्वीं तिचाच अंत होण्याचा जास्त संभव.

चंद्रकांत—बरें, सरलेचें आणखी काय ह्मणणें आहे, तें एकदां ऐकून घेऊं; आणि मग पाहूं काय करायचें तें. प्रमोदरावांवर माझा अतोनात लोभ आहे. त्यांनीं जर मनाशीं विचार करून पाहिला, तर असलें रत्न झिडकारून टाकण्याची आपली मुळींच योग्यता नाहीं, ही गोष्ट सहज त्यांच्या लक्षांत येईल. त्यांनीं जर तिला वरण्याचें नाकारलें, तर 'अभाग्याच्याघरीं कामधेनु' च ह्मणायचें; दुसरें काय ?

दौलतराव—बरें, चलावें महाराज आतां. जेवणाची वेळ झाली असेल.

विश्वासराव—(हळूच) याउप्पर जर या स्वारीला तिचें वेड नाहीं लागलें, तर आह्मांला काहींच समजत नाहीं ह्मणायची पाळी येणार.

चंद्रकांत—(प्रमोदरावांस ऐकूं जाणार नाहीं अशा बेतानें) आतां हेंच जाळें तिच्यावर पसरायचें. तें काम सरलेवर आणि तिच्या दासीवर सोंपवूत टाकूं ह्मणजे झालें. एकाचें दुसऱ्यावर प्रेम आहे, अशी दोघांचीही समजूत झाल्यावर जी त्यांची पहिली मुलाखत होईल, तिची मौज अगदीं पाहण्यासारखी होणार. त्यावेळेस कांहीं कोणाचे वाग्बाण सुटायचे नाहींत. तिलाच आतां यांनां जेवायला हांक मारायला पाठवून देऊं.

(चंद्रकांत, दौलतराव, व विश्वासराव जातात.)

प्रमोदराव—हे बेटे मोठ्या गंभीरपणानें बोलत होते, तेव्हां यांत कांहीं लपंडाव दिसत नाहीं. या साऱ्याजणांनां तिची फार कींव आलेली दिसते. खुद्द सरलेकडून यांनां सर्व बातमी लागलेली आहे; तेव्हां शंकेला जागाच नाहीं. काय ! तिचें आणि माझ्यावर प्रेम ? छे; त्याला माझ्या प्रेमाची जोड दिलीच पाहिजे. काय ह्मणाले, तिनें माझ्या विनवण्या केल्या

तरी मी तिची कुचेष्टा करीन, आणखी प्राण गेला तरी ती आपला प्रेमभाव मला व्यक्त करून दाखविणार नाहीं. आणखी काय ? मी फार चढेल आणि कुचेष्टा करणारा आहें, नाहीं का? एकंदरींत अशा तऱ्हेनें आपल्याला स्वत:चीं व्यंगें समजणें कांहीं वाईट नाहीं. महाराज ह्मणाले, ती सुरेख असून सद्गुणी आहे. पैकीं ती सुरेख आहे, हें धडधडीत दिसतें आहे. आणि ती सद्गुणी नाहीं, असें ह्मणायला कांहींच प्रमाण नाहीं. माझ्यावर प्रेम करणें हा ह्मणे तिचा मोठा मूर्खपणा ! मी ह्मणतों याच्यांत मूर्खपणा तो काय झाला ? माझें सुद्धां मन नाहींका तिच्याकडे धांव घेऊं लागलें ? ह्मणजे येवढ्यावरून मी मूर्ख झालों वाटतें ! लग्न करायचें नाहीं, असा माझा बाणा होता खरा; पण तेव्हां नशिबांत भार्यायोग आहे, हें कुठें मला ठाऊक होतें ? आणि शिवाय, मनुष्यांच्या आचाराविचारांत, मतांत वगैरे बदल पडत नाहीं थोडाच ! लहानपणच्या एकेक खुळ्या समजुती असतात; पण त्या कांहीं पुढें कायम रहात नाहींत. तें काहीं नाहीं. लग्न हें झालेंच पाहिजे, जगाचें संततिरूपी देणें हें दिलेंच पाहिजे. ही पहा, माझी प्रियाच आली. हिचें माझ्यावर प्रेम आहे, अशाबद्दल हिची मुद्राच साक्ष देत आहे. प्रेम कांहीं कधीं छपून रहायचें नाहीं.

चतुरिका—(प्रवेश करून) माझ्या मर्जीविरुद्ध तुह्मांला जेवायला बोलवायला मला पाठविलं आहे.

प्रमोदराव—माझ्यासाठीं तुला त्रास झाला, याबद्दल मी फार दिलगीर आहें.

चतुरिका—'दिलगीर आहें' ह्मणायला तुह्मांला जितका त्रास पडला, तितकाच मला इकडे येण्यांत पडला.

प्रमोदराव—तर मग माझ्याकडे आल्यानें तुला आनंद झाला ना ?

चतुरिका—मी कधीं असं ह्मटलं ? आपल्याला भूक नाहीं वाटतं ? मी आपली जात्येंच कशी. (जाते.)

प्रमोदराव—"माझ्याकडे आल्यानें आनंद होतो" असें तुझ्या जिभेनें

ज़री नाहीं तरी तोंडानें मला सांगितलें. काय द्व्यर्थी भाषण आहे पहा! "दिलगीर आहें ह्मणायला तुह्माला जितका त्रास पडला, तितकाच मला इकडे येण्यांत पडला." ह्मणजे यांतला गर्भितार्थ हा कीं, "तुमच्यासाठीं हवी ती गोष्ट केली तरी तिच्यापासून मला बिलकुल त्रास नाहीं." असें जर आहे, तर प्रिये चतुरिके, मीही आजपासून तुला आपली असें ह्मणतों. तुला जर अंतर दिलें तर माझ्यासारखा पाषाणहृदयी खाटीक मीच. (जातो.)

[पडदा पडतो.]

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

(स्थळः—दौलतरावांची बाग. सरला, अंजनी, व मालती प्रवेश करितात.)

सरला—गडे अंजनी, महाराजांच्या बरोबर चतुरिका गोष्टी सांगत बसली आहे; तिला इळच जाऊन सांग कीं, या येथें माझ्या आणि मालतीच्या तिच्याबद्दलच कांहीं गोष्टी निघाल्या आहेत. ह्मणावं, कांहीं तुटक तुटक शब्द माझ्या कानीं पडले. आणखी तिला असं सुचव कीं या लतागृहांत बसलं असतां आमचं बोलणं खडानूखडा तिला ऐकूं येईल. येवढं सांगितलंस कीं, ती आपसुखं येथें येऊन लपून बसेल. हूं, ऊठ जा लवकर.

अंजनी—बरं आहे. आत्तां इतक्यांत त्यांनां इकडे पाठवून देतें कीं नाहीं पहा. (जाते.)

सरला—आतां कीं नाहीं, मालती, चतुरिका आली, ह्मणजे प्रमोदरावांशिवाय दुसरा विषयच काढायचा नाहीं बरं का ? मी त्यांचं नांव काढलं कीं, तूं आपली त्यांची कधीं कुणीं कुणाची केली नसेल इतकी वाखाणणी करीत सूट. चतुरिकेनं त्यांनां अगदीं मोहून टाकिलं आहे, असं मी ह्मणेन; आणि त्यांच्या अंगांत न्यून असं नाहींच, असं तूं ह्मण. येव-

ध्यानं तिच्या मनाची चलबिचल होते कीं नाहीं पहा. (चतुरिका मागच्या बाजूनें प्रवेश करते.) हूं, कर सुरवात. तो पहा आमिष दाढेखालीं चावायसाठीं मासा कसा धांवून येतो आहे.

मालती—पण आपणच काळाच्या दाढेंत सांपडणार, हें कुठं त्या बिचाऱ्याला ठाऊक आहे ! प्रमोदरावांनां मी अशी हरबऱ्याच्या झाडावर चढवून देत्यें कीं ते नेमके चतुरिकाबाईच्या मनांतच उतरावेत.

सरला— पाहूं आतां. (चतुरिकेस ऐकूं जाईल असें) छे बाई ! अगदींच कांहीं तऱ्हेवाईक स्वभाव हो ! इतका तुसडेपणा कांहीं चांगला नाहीं !

मालती—पण प्रमोदरावांचं त्यांच्यावर इतकं प्रेम जडलं आहे, हें तरी खास का ?

सरला—हो हो. तिकडच्या आणि महाराजांच्या सांगण्यावरून मी म्हणत्यें.

मालती—मग ही गोष्ट चतुरिकाबाईनां कळविण्याबद्दल तुह्मांला कांहीं सांगितलं असेल त्यांनीं ?

सरला—ते मला ह्मणत होते, तिच्यापाशीं प्रमोदरावांच्या वतीनं दोन शब्द टाक ह्मणून. पण मींच त्यांनां सांगितलं कीं, जर तुह्मांला त्यांच्याबद्दल कांहीं काळजी वाटत असेल, तर तिला या गोष्टीचा मुळींच पत्ता लागूं देऊं नका.

मालती—तें कां बरं ? ते चतुरिकाबाईनां पति शोभणार नाहींत, असं कां तुह्मांला वाटतं ?

सरला—भलतंच कांहीं तरी ! त्यांच्या अंगीं कांहीं तरी उणेपणा आहे का? पण हिच्या मानी स्वभावापुढें कश्शाची मातब्बरी नाहीं ! तिला आपल्या साऱ्या गोष्टी तुच्छवत् वाटतात. ज्याची त्याची कुचेष्टा करण्यापलीकडे तिला दुसरं तिसरं कांहीं दिसत नाहीं. सदा आपली आपल्याच ऐटींत असते. तिच्या डोक्यांत प्रीतिबीतिचे विचार ह्मणून येतच नाहींत.

मालती—अगदीं खरं बोललांत. प्रमोदरावांचं आपल्यावर प्रेम आहे,

हें जर त्यांनां समजलं, तर त्या त्यांनां अगदीं नकोनकोसं करून सोडतील. तेव्हां तुह्मीं केलेंलाच विचार चांगला दिसतो.

सरला—तेंच ह्मणत्यें. ह्मटलं असतां त्यांच्यासारखा हुषार, शूर, कुलीन, सुरेख असा पुरूष हजारांत तरी आढळेल का ? पण हिच्यापुढं सगळं रद्द आहे. एखादा सुरेख निरेख पुरुष असला तर ह्मणते, "इश्श ग बाई. हा कसला नवरा ? ही तर माझी बहीण शोभेल !" बरं, साधारण काळासांवळा असला, तरी हिचं आपलं त्याला "शिद्दी, नाहींतर जंगली ह्मणून नांव आहेच." उंच असला तर ह्मणते, "याचा आकाशदिवा लावायचा वासा, नाहींतर खबुतरें उडवायचा शेकाटा चांगला होईल !" बरं, ठेंगणा असला तर ह्मणते "मुलींच्या खेळांतला भावलादेखील याच्याहून मोठा असतो." साधारण बोलका असला तर त्याला वाचाळ ह्मणायचं; बरं, मितभाषणी असला, तर ह्मणायचं एकलकोंडा, गर्विष्ठ, नाहीं तर पाषाण! ज्याच्या त्याच्याकडे आपलीं नाकं मुरडायचीं ह्मणजे काय? "बरं" असं कोणाला ह्मणायचं नाहीं, ह्मणूच तिनं जसाकांहीं विडाच उचलला आहे !

मालती—पण हें कांहीं चांगलं लक्षण नाहीं.

सरला—अग, मुळींच ताळतंत्र सोडून देणं, ह्मणजे याला कोण चांगलं ह्मणेल ? पण, बाई, तिच्यापुढं बोलायची पुण्याई आहे कोणाची ? मी जर तिला दोन सामोपचाराच्या गोष्टी सांगूं लागल्यें तर ती ह्मणेल, "मोठ्या आल्या आहेत आजीबाई, ठाऊक आहेत !" उलट माझीच थट्टा करून मला पोट धरधरून हंसायला लावील; आणि त्या बिचाऱ्या प्रमोदरावांचा जीव मात्र रडकुंडीला आणील. ह्मणून ह्मणत्यें कीं, त्यांनां आपले मनांतल्या मनांतच तळमळूं द्यावेत.

मालती—पण पहाना एकदां त्यांच्या जवळ गोष्ट काढून ?

सरला—नको ग बाई ! तिच्याशीं प्रसंग धर्मास नको ! हवं तर मी प्रमोदरावांनां जाऊन सांगेन कीं, कसंही करून आपलं मन आवरून

धरा. तिच्या निर्मल नांवाला कलंक लागेल अशा खोट्याच गोष्टी त्यांनां सांगायलादेखील मी कमी करणार नाहीं. एका अपवादकारक शब्दानं प्रेम कसं विरघळून जातं, हें ठाऊक नाहीं तुला अजून!

मालती—त्या मोठ्या हुशार आणि धोरणी ह्मणून नावाजल्या आहेत; असं असून, तुह्मीं त्यांनां अगदींच विचारशून्य ठरविलंत! पण असलं रत्न टाकून देण्याइतक्या त्या वेड्या आहेत, असं मी तरी कधीं ह्मणायची नाहीं.

सरला—प्रमोदराव ह्मणजे खरोखरंच एक रत्न आहे! आतां, तिकडल्याइतकं त्यांचं तेज नाहीं ही गोष्ट वेगळी.

मालती—बाईसाहेब, स्पष्ट बोलल्यें याची माफी असू द्या. खरं पुसाल तर, सौंदर्य, शरीराची ठेवण, त्याचप्रमाणं भाषणांतली खुबी, एकंदर वर्तनांतली प्रौढी, तसाच मनाचा सरळपणा, शौर्य वगैरे गुणांबद्दल प्रमोदारावांचंच नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं असतं.

सरला—तेवढं राहूं द्या. बाकी तूं ह्मणत्येस तें कांहीं केवळ खोटं नाहीं! त्यांचा लौकिक फार चांगला आहे खरा!

मालती—आहे ह्मणजे? त्यांच्या अंगांत कुवतच आहे तशी. फुकटच्या नाहींत गोष्टी! तें सारं राहिलं. पण तुमच्या लग्नाची तिथि तीच कायम ठरली का?

सरला—हो; तुला नव्हतं का अजून समजलं? बरं चल लग्नाच्या वेळीं शालू कोणचा नेसायचा, दागिने कोणकोणचे घालायचे, तें सारं पाहून ठेवूं.

मालती—चला, झालं आपलं काम. आपण त्यांनां अगदीं भारून टाकलं खास!

सरला—मदनाचं आयुध कायतें बाण, असं ह्मणतात. पण तो कावेबाजपणाही कधीं कधीं लढवितो असं यापुढं ह्मणावं लागेल. (सरला व मालती जातात.)

चतुरिका—हें मीं ऐकलं तरी काय? यांत कांहीं तथ्य असेल का?

जी गोष्ट ध्यानींमनीं देखील नाहीं, ती आज अवचित कानांवर आली! छे! ज्याच्या त्याच्याकडून गर्विष्ठ आणि तुसडी ह्मणवून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या दोन्ही गोष्टींनां मनांतून झांकून दिलं पाहिजे; कारण तेथें आतां प्रमोदरावांची मूर्ति सांठवून ठेवायची आहे. त्यांची योग्यता थोर आहे असं लोक ह्मणतात; आणि माझीही याबद्दल पुरी खात्री झाली आहे. आजपासून त्यांच्याशीं अगदीं नम्रतेनं आणि प्रेमानं वागायचं. मीं आपलं मन तर त्यांनां वाहिलंच; आतां त्यांच्या प्रेमांत मात्र अंतर न पडो ह्मणजे झालं. (जाते.)

प्रवेश २ रा.

(**स्थलः**—दौलतरावांच्या वाड्यांतील एक दिवाणखाना. चंद्रकांत, विश्वासराव, प्रमोदराव, व दौलतराव बोलत आहेत.)

चंद्रकांत—तुमचा विवाह उरकला कीं आह्मी भरतपुराकडे परत जाणार.

विश्वासराव—माझ्याही मनांत आपल्याबरोबर यायचें आहे.

चंद्रकांत—छे. अशा वेळीं सरलाबाईनां आणि तुह्मांला दूर करणें ह्मणजे एखाद्या लहान मुलाला उगीचच एखादी सुरेखशी खेळायची वस्तु देऊन ती लागलीच त्याच्या हातून हिसकावून घेतल्यासारखें होईल. आमच्या प्रमोदरावांनां आह्मी बरोबर नेणार. कारण त्यांचें मन कांहीं कुठें मागें पुढें गुंतून राहणार नाहीं. हे दोन तीन वेळां मदनाच्या सपाट्यांतून निसटले आहेत; तेव्हांपासून तो कांहीं यांच्या वाटेस जात नाहीं. यांचें हृदय मोठें खंबीर खरें! ही स्वारी नखशिखांत आनंदानें भरली आहे. कां, प्रमोदराव, असेंच कीं नाहीं?

प्रमोदराव—नाहीं. हा कांहीं आतां तुमचा पहिला प्रमोद राहिला नाहीं.

दौलतराव—हें मीं ताडलेंच होतें. तुमचा चेहरा जरा उद्विग्न दिसत आहे.

विश्वासराव—तर मग यांच्यावर कोणी मोहिनी अस्त्र तर नाहींना टाकलें ?

चंद्रकांत—अहो कशाचें घेऊन बसलां अहांत मोहिनी अस्त्र? आतां सांगितलें ना तुह्मांला, कीं, मदनानें यांच्या पुढें हात टेकले ह्मणून ? पैशाची थैली रिकामी झाली असेल, तेव्हां थोडेंसें तोंड उतरलें आहे न् काय ?

प्रमोदराव—या दाढेनें फार बेजार केलें आहे हो !

विश्वासराव—दाढेनें एवढे बेजार! अहो असेल कीडबीड झालें !

प्रमोदराव—तुह्मांला काय होतें बोलायला ? परदुःख शीतल ह्मणतात, तें कांहीं खोटें नाहीं.

विश्वासराव—अहो कसली दाढ घेऊन बसलां ? अडकली आहे स्वारी प्रेमाच्या जाळ्यांत.

चंद्रकांत—यांचा स्वभाव मोठा नकल्या आहे, हें तुह्मांला ठाऊक आहेच. निरनिराळ्या व्यक्तींचें अनुकरण करून त्यांनां वेडावण्याची जशी यांची केव्हां केव्हां लहर लागते, त्याप्रमाणेंच आज हे प्रेमाचें वेड पांघरून प्रेमरोग्याचें सोंग करून दाखवीत आहेत, झालें. खरोखर हे प्रेमानें वेडे होतील, असें मनांत देखील आणूं नका.

विश्वासराव—पण आल्यावांचून राहील कसें ? खून आणि प्रेम या दोन गोष्टी कधीं लपून रहावयाच्या नाहींत. जरा न्याहाळून पहा यांच्याकडे. यांनीं आपला फेटा आजपर्यंत इतका रेंखून बांधलेला कधीं पाहिला होतात ? याच्यावरून काय अनुमान काढाल ? तसेंच, आपली दाढी आणि कल्ले यांचें यांनां मोठें भूषण वाटत असे. त्या दोहोंनांही यांनीं फाटा दिला. याच्यावरून काय सिद्धांत निघतो ?

दौलतराव—हे आतां पहिल्यापेक्षां तरुण आणि सुरेख दिसूं लागले.

चंद्रकांत—आणि हें अत्तराचें मर्दनही यांनींच केलें आहे वाटतें मघापासून मी ह्मणतों आहें कीं, हा वास येत आहे तरी कोठून ?

विश्वासराव—मला जो त्यांच्या अवस्थेचा वास आला तो या साऱ्या चिन्हांवरूनच.

चंद्रकांत—तरी ह्मटलें आज चेहरा उतरलेला कां ?

विश्वासराव—गालावरची दाढी उतरली त्याबरोबरच यांनीं आपल्या उल्हासवृत्तीला आणि विनोदी भाषणाला रजा दिली.

चंद्रकांत—एकंदरींत येथें कांहीं तरी पाणी मुरत आहे.

विश्वासराव—मी ह्मणतों आहें काय मघांपासून ? आणि त्यांच्यावर कोण येवढें फिदा झालें आहे, तेंही मला ठाऊक आहे.

चंद्रकांत—मग मला सांगानात ? यांचे गुण जिला माहीत नाहींत, अशीच कोणी तरी असेल ?

विश्वासराव—तें कां ? यांचे सारे गुण अवगुण त्या व्यक्तीला माहीत आहेत; आणि असें असूनही ती यांच्यासाठीं प्राण टाकीत आहे.

चंद्रकांत—आणि हे आपल्या वक्षःस्थलाच्या आणि बाहुपाशांच्या मध्यें तिला जिवंतपणीं पुरून टाकायला तयार आहेत ना ?

प्रमोदराव—या वायफळ बडबडीचा तुह्मांला कंटाळा कसा नाहीं येत ? अहो दौलतराव, जरा माझ्याबरोबर येतां का ? तुमच्यापाशीं दोन महत्वाचे शब्द बोलावयाचे आहेत.

दौलतराव—ठीक आहे. (प्रमोदराव व दौलतराव जातात.)

चंद्रकांत—चतुरिकेबद्दल मागणी करायची आहे न् काय ?

विश्वासराव—शंकाच नको. तिकडे त्या दोघींनीं चतुरिकेला जाळ्यांत धरली असेल. आतां हीं कुत्रीं भेटलीं, ह्मणजे कांहीं एकमेकांवर गुरगुरायचीं भुंकायचीं नाहींत.

(दुर्मदराव प्रवेश करितो.)

चंद्रकांत—कां भाऊ, इकडे कुणीकडे ?

दुर्मदराव—थोडी फुरसत असेल तर कांहीं बोलायची इच्छा आहे, महाराज.

चंद्रकांत—माझ्या एकट्याशीं ?

दुर्मदराव—हो.-तरी पण सरदार विश्वासरावांसमक्ष बोलण्याला हरकत नाहीं; कारण त्यांच्यासंबंधींच कांहीं बोलण्याला मी आलों आहें.

चंद्रकांत—ठीक आहे. काय तुझें ह्मणणें ?

दुमदराव—(विश्वासरावास) उद्यां आपला लग्नाचा बेत आहेना ?

चंद्रकांत—आहे हें तुला ठाऊक आहेच.

दुर्मदराव—पण आणखी जें काय मला ठाऊक आहे, तें समजल्यावर यांच्या बेताचें काय होईल कोणास ठाऊक ?

विश्वासराव—कांहीं प्रत्यवाय असल्यास एकदम सांगून टाका कसे ?

दुर्मदराव—तुह्मी कदाचित् ह्मणाल कीं, माझ्या मनांत तुमचा दावा साधावयाचा आहे, ह्मणून मी कांहींतरी किटाळ रचून तुमचें मन दूषित करीत आहें. कांहीं ह्मणा. त्याचा मी तूर्त मुळींच विचार करीत नाहीं. महाराजांचा तुमच्यावर अतोनात लोभ; ह्मणून त्यांनीं आपल्या विवाहाचा योग जुळवून आणिला. पण—

चंद्रकांत—पण काय ?

दुर्मदराव—काय तें तुमच्या कानांवर घालण्याकरितांच मी मुद्दाम इकडे आलों आहें. तुमची सरला — जिला तुह्मी जीव कीं प्राण समजतां — ती सरला व्यभिचारिणी आहे.

विश्वासराव—कोण, माझी सरला ?

दुर्मदराव—हो. जिचें तुमच्यावर अत्यंत प्रेम आहे, असें तुह्मी समजतां, आणि जिला तुह्मी सारेजण माझी माझी करतां, ती सरला—

विश्वासराव—व्यभिचारिणी आहे ?

दुर्मदराव—होय. ती किती दुराचरणी आहे, याची तुह्मांला कल्पना देखील व्हावयाची नाहीं. असें संशयित मुद्रेनें माझ्याकडे टवकारून नका पाहूं. पाहिजे तर आज रात्रीं—तुमच्या लग्नाच्या आधल्याच रात्रीं—माझ्याबरोबर चला; तिच्या शयनमंदिरांत कोण प्रवेश करतो तें प्रत्यक्ष पहा,

आणि नंतर आपल्याला काय करावयाचें असेल तें खुशाल करा.

विश्वासराव—असें होईल तरी कसें ?

चंद्रकांत—मला तर हें अगदीं अशक्य दिसतें !

दुर्मदराव—धडधडीत डोळ्यांनीं पाहिलेल्या गोष्टीवर जर तुमचा विश्वास बसला नाहीं, तर नाइलाज आहे. माझ्याबरोबर आलांत तर काय काय प्रकार घडतो, तो तुह्मांला दिसेलच.

विश्वासराव—कांहीं विपरीत गोष्ट जर माझ्या प्रत्ययास आली, तर तिच्या पाणिग्रहणाची गोष्ट एकीकडेच राहिली. चारचौघांसमक्ष तिची फटफजिती करायला मी कधीं कमी करणार नाहीं.

चंद्रकांत—आणखी, ती यांनां मिळवून देण्यासाठीं जसा मी झटलों, त्याचप्रमाणें आतांही यांनां मदत करायला मागें पुढें पाहणार नाहीं.

दुर्मदराव—मी आतां तिच्या दुष्कृत्याची जास्त चर्चा करीत बसत नाहीं. मध्यरात्र उलटेपर्यंत तुह्मी धीर धरा. मग काय चमत्कार होतो, तो दिसेलच.

चंद्रकांत—कोण्या मुहूर्तावर ही सरला यांच्या दृष्टीस पडली, असें होऊन गेलें आहे मला !

विश्वासराव—एकूण माझे मनोरथ जागच्याजागीं राहणार ना ?

दुर्मदराव—"बरें अरिष्ट टळलें," असें तुह्मीच मागाहून ह्मणायला लागाल.

(जातात.)

प्रवेश ३ रा.

[**स्थळ:**—रस्ता. सांभोरे कोतवाल, पिंगळे, आणि चपात्या, व खांडव्या प्रवेश करितात.]

कोतवाल—अरे, तुह्मी प्रामाणिक भले लोक आहांत ना ?

पिंगळे—असलेच पाहिजेत; नसतील तर त्यांच्या देहाला व आत्म्याला मोक्ष मिळेलच मिळेल. न मिळाला तर नवल.

कोतवाल—मोक्ष ? हे बेगुमान असतील तर मोक्ष ह्मणजे ह्यांनां मोठें बक्षीसच होईल.

पिंगळे—बरें कोतवालसाहेब, त्यांनां आतां त्यांची कामगिरी सांगून टाका.

कोतवाल—सांगतों; पण कोतवालीसारखा मोठा जोखमीचा अधिकार कोणाकडे द्यावा, असें तुह्मांला वाटतें ? आं, कोणाकडे द्यावा असें वाटतें ?

खांडव्या—या चपात्यांच्याकड द्यावा अस वाटत; कारन ह्ये बगा, त्यासनी ल्हिवता येतय; इक्तच न्हव, तर वाचताबी येतया.

कोतवाल—चपात्या, असा इकडे ये. तुझें नांव फार पसंत आहे बुवा ! हें पहा, चेहरामोहरा सुरेख असणें किंवा नसणें ही ज्याच्या त्याच्या प्रारब्धाची गोष्ट आहे. पण लिहायला-आणि त्यांतल्यात्यांत वाचायला येणें ही ईश्वरी देणगी आहे बुवा !

चपात्या—या दोनीबी गोष्टी, कोतवालसाब—

कोतवाल—"तुह्मांला येत आहेत" असेंच ह्मणणारना तूं ? बरोबर आहे. ईश्वराचे तुझ्यावरील उपकार विसरूं नको, आणि आपल्या गुणांबद्दल अभिमान बाळगूं नको. कोतवालीच्या कामाला तूं मोठा हुशार आणि लायक मनुष्य दिसतोस; तेव्हां तूं हा कंदील घे. तुह्मांला कोणी उडाणटप्पू लोक आढळले, तर त्यांनां धरून ठेवा. राजाच्या नांवानें पाहिजे त्याला 'हुकुमडर' करून थांबवून धरायला तुह्मांला संपूर्ण अधिकार आहे.

चपात्या—आन् योखांदा जर न्हाइ थांबला तर ?

कोतवाल—तर पीडा गेली असें ह्मणा, आणि स्वस्थ बसा.

पिंगळे—तुमच्या 'हुकुमडर' ला कोणीं जबाब दिला नाहीं, तर तो राजाची रयतच नाहीं, ह्मणून सोडून द्या.

कोतवाल—बरोबर आहे. जो राजाची रयत नाहीं, त्याच्याशीं आप-

त्याला काय करायचें आहे ? हें पहा, रस्त्यांत गडबड करूं नका बरेंका ? कारण राजाच्या रखवालदारांनीं तसें करणें ह्मणजे मोठी निंद्य आणि वाईट गोष्ट आहे; आलें का लक्ष्यांत ?

खांडव्या—होहो. गस्तवाल का कुठ गरबड करीत बसत्यात व्हय् ? आह्मी आपल मुकाट्या निजूनच ऱ्हाऊ कस.

कोतवाल—बरें बोललास; अगदीं बरोबर बोललास. गुप्‌चिप् निजून रहायला कोणची हरकत आहे ? पण जपून असा हो. नाहींतर कोणी तरी तुमच्या तरवारी आणि टोपीवरचे बिल्लेच नेईल चोरून; आणि मग बसाल हांका मारीत. ते नीट उशाला घेऊन मग निजा हवें तर. पण अगोदर एकदां सगळ्या दारूच्या गुत्त्यांवर हिंडून या; आणि निशा येऊन जे लोक बडबडत ओरडत असतील त्यांनां गप्प करा.

खांडव्या—आन त्यांनीं न्हाइ आमच ऐकल तर ?

कोतवाल—तर त्यांचा नाद सोडून द्या. शुद्धीवर आले, ह्मणजे अपोआप गप्प बसतील.

खांडव्या—जी व्हय कोतवालसाब.

कोतवाल—वाटेंत एखादा माणूस आढळला, आणि तो जर चोरटा आहे असा तुह्मांला वहिम आला, तर तुह्मी अंमलदार लोक ह्मणून त्या गोष्टीची नोंद करून ठेवा, आणि त्याच्याशीं जितका कमी संबंध ठेववेल तितका ठेवा. आलें का लक्ष्यांत ?

चपात्या—ह्मंजि ? त्यो चोर हाय्, अस जर आमच्या होऱ्यामंदी आल, तर त्याला आडकऊनशानी ठिऊ नय व्हय ?

कोतवाल—अलबत. तुह्मां अंमलदार लोकांना तसें करायला अधिकार पोहोंचतो. पण, 'खळा येतें साधुत्व साधुसंगें' याचा अर्थ तुला माहीत नाहीं ? 'खळा येतें साधुत्व साधुसंगें.' याचा अर्थ असा आहे कीं, वाईट लोकांची संगत केल्यानें चांगले लोक वाईट होतात. आलेंका लक्ष्यांत ? ह्मणून ह्मणतों कीं, चोरट्या हातचलाखीवाल्या लोकांशीं जितका कमी संबंध

ठेवाल, तितका चांगला. कदाचित् एखाद्याला ठेवलातच पकडून, तर त्याला ह्मणावें कीं, तूं आपलें काम कर, ह्मणजे आपली पायचलाखी दाखवून आमच्या हातून निसटून जा.

पिंगळे—तुमचा स्वभाव बुवा फारच दयाळू आहे !

कोतवाल—वा वा ! अगदीं बरोब्बर बोललांत. अहो, ज्या या सांभाऱ्याच्या हातून ढेंकूणपिसांचा देखील खून व्हायचा नाहीं, त्याच्याच हातून साडेतीन हात लांबीच्या माणसाचें अकल्याण कसें होईल ? आं, होईल कां ?

पिंगळे—मुळींच नाहीं. अरे ए, एखाद्या घरांत जर तान्ह्या मुलाचें रडणें ऐकूं आलें, तर त्याच्या आईला उठवून त्याला उगें करावा. बरें कां?

खांडव्या—आन् तिला जागच न्हाय् आली तर ?

कोतवाल—तर तुह्मी आपला रस्ता सुधारा. मग त्या पोराच्या रडण्यानेंच जेव्हां त्याची आई झोंपेंतून उठून त्याला उगें करील तेव्हां करील. पोटचें पोर रडत असतांना जी घोरत पडते, ती तुमच्या ओरडण्यानें थोडीच जागी होणार आहे ! खरें कीं नाहीं ?

पिंगळे—रास्त आहे.

कोतवाल—अहो लिहितां वाचतां येणार, बंदोबस्तीच्या कामांत तुह्मी राजाच्या ठिकाणीं आहां; तो जर तुह्माला रात्रीचा भटकतांना आढळला, तर त्याला चावडीवर अडकवून ठेवा.

पिंगळे—अरे बापरे ! असें हो कसें होईल कोतवालसाहेब ? प्रत्यक्ष राजाला धरून ठेवतां येईल का ?

कोतवाल—हो हो ! लावा दोनदोन पैशांची पैज. कायदे कशाशीं खातात हें माहीत आहे का आपल्याला ? ह्मणे राजाला कसें धरून ठेवतां येईल ! पाहिजे त्या इसमाला अटक करायला यांनां अधिकार आहे. आतां, त्याच कायद्याच्या पुढल्या कलमांत असें सांगितलें आहे कीं, या लोकांनीं कोणाची अब्रु घेऊं नये, किंवा कोणावर सक्ति करूं नये. तेव्हां

राजाच्या मर्जीविरुद्ध मात्र त्याला पकडतां येणार नाहीं; कारण हीं गोष्ट मर्गा अब्रुनुकसानी किंवा सक्तीच्या सदराखालीं जाणार. आलें का लक्ष्यांत ?

पिंगळे—आतां समजलें.

कोतवाल—(ऐटीनें हंसतो.) बरें; जा रे बाबानो तुह्मी आपल्या कामाला. कांहीं कमजास्त झालें तर मला हांक मारा. (पिंगळ्यास) कां दोस्त, चलतांना ? (पहारेकऱ्यांस) तुह्मांला सांगायचें राहिलें. दौलतराव सरदारांच्या वाड्यांत आज लग्नाची गडबड आहे. तिकडे नीट लक्ष्य असूं द्या बरें का ? चांगले खबरदारीनें वागा. आलें का लक्ष्यांत ? [कोतवाल व पिंगळे जातात.]

खांडव्या—या, राव. दोन वाजपत्तुर आपला पहारा हाये; तवर या देवळाच्या वंट्यावर बसूनशानी खुशाल डुलक्या खाऊ, आन् मंग घरला जाऊन पडू.

(येसाजी व कोंडीबा प्रवेश करितात.)

येसाजी—कोंडीबा, अहो कोंडिबातात्या—

खांडव्या—(हळूच) चुप्प बसा आं.

येसाजी—अहो कोंडिबातात्या—

कोंडीबा—हा मी तुमच्या पाठीशींच आहे कीं. सांगा काय सांगणार होतां तें.

येसाजी—या पावसानें काय रिप रिप लावली आहे बुवा ! असें वर या, या ओट्यावर; मग तुह्मांला सगळी इत्थंभूत हकीगत सांगतों.

खांडव्या—हत कायत्री दगा हाय् राव; संभाळा.

येसाजी—या पठ्यानें आज दुर्मदरावांपासून पांचशें रुपये उकळले !

कोंडीबा—अरेवा ! येवढें द्रव्य मिळण्याइतकें साहस तरी काय केलेंत तुह्मीं ?

येसाजी—साहसी लोकांजवळच देव येवढें द्रव्य कसें ठेवतो, ह्मणून विचारा. अहो, या पैसेवाल्या हरामखोरांनां आमच्यासारख्या लफंग्या सोद्यांची गरज लागली, ह्मणजे अश्शी आह्मी आपली तुमडी भरून घेतों.

कोंडीबा—मोठी मजा आहे बुवा !

येसाजी—तुह्मी अजून कच्चे आहां.

कोंडीबा—आणि तुह्मी पिकलांत वाटतें ? निदान सध्यां तुमची पोळी तरी पिकली आहे ! पण ही कुठली पैसे मिळवायची चोरटी टूम काढिली आहांत ?

येसाजी—अहो टूम कसलीन् काय कसलें !

कोंडीबा—अहो टूम ह्मणजे टूम.

येसाजी—आन् कोंडीबाताल्या ह्मणजे कोंडीबाताल्या. मोठेंच सांगितलेंत !

खांडव्या—'टूम' हा सबूद मी आज धा वर्स ऐकतोय्. लईच बिलंदर भामटी बुवा ! मार नट्टापट्टा करूनशानी खुशाल रस्तोरस्तीं हिंडत असती ह्मनत्यात.

येसाजी—कोणी बोलत आहे का हो ?

कोंडीबा—छे; पालबील चुकचुकली असेल.

येसाजी—आतां तुह्मींच गोष्ट काढलीत ह्मणून सांगतों. एकदां का कांहीं नवीन टूम निघाली कीं, ती येथून तेथून सगळ्या लोकांचीं डोकीं फिरवून टाकते; आणि तिच्या पायीं फुकटच्या फाकट पैशाची खराबी होते. पण आमची टूम जी आहे, ती पैसे मिळवून देणारी आहे.

कोंडीबा—तें सारें समजलों हो. पण मघाशीं काय मला सांगणार होतां, तें तसेंच राहिलें की.

येसाजी—हो, खरेंच. आतां थोड्या वेळापूर्वीं आह्मी फार मौज करून आलों बुवा !

कोंडीबा—ती काय बुवा ?

येसाजी—सरलेची दासी अंजनी ह्मणून आहे ती ? तिला मीं "अगे माझे लाडके छगुले सरले" ह्मणून हांक मारिली. तशी ती सरलेल्या निजायच्या खोलीच्या खिडकींत डोकावून उभी राहिली. मग आमचें खोटेंच

कांहीं तरी प्रेमाचें भाषण झालें. नंतर तिनें मोठ्या प्रीतीनें मला निरोप दिला.—हो! पण तुह्मांला अगोदर सांगायचें राहिलें कीं, हा सारा प्रकार महाराज, विश्वासराव, आणि आपले धनी थोड्या अंतरावरून अगदीं डोळ्यांत तेल घालून पहात होते.

कोंडीबा—आणि त्यांनां काय वाटलें कीं, खिडकींत सरलाच आहे ह्मणून?

येसाजी—त्या दोघांनां वाटलें. पण खरें काय तें आपल्या धन्यांनां ठाऊक होतेंच. त्यांच्या सांगण्यावरून त्या दोघांच्या मनाची आधींच चलबिचल झालेली होती. त्यांत काळोख्या रात्रीची आणि आमच्या शिताफीची भर पडल्यावर मग काय? दुधांत साखर पडल्यासारखें झालें, किंवा त्यांच्या बाजूनें ह्मटलें ह्मणजे, आगींत तेल पडल्यासारखें झालें. तेव्हां सरला जारिणी आहे, अशी खात्री होऊन विश्वासरावांची स्वारी खवळली. आणि 'उद्यां ऐन विवाहाच्यावेळीं भर समारंभांत तिची छी थू करायची,' असा निश्चय करून तडफडत निघून गेली.

खांडव्या—ए खडे रहो. तुमकू कैद किया हय्.

चपात्या—सांभाऱ्या कोतवालासनी बोलवून आन जा अधुगर. चांगल तावडीत सापडल्याती. असल हरामखोरीच धंद करतास न्हव का?

खांडव्या—आन् टूम ह्मनून कोनशी एक त्यांची साथीदारीन हाये. नांवावरन ती भउशां मुसलमानीन दिसती. टूम हे नाव मी लईंदा ऐकलय्. तिन आपल्या कपाळावर लांब लांब झुलप सोडल्याती ह्मन!

कोंडीबा—अहो शिपाईबुवा, आह्मी गरीब आहोंत—

चपात्या—वो कुच नही हम पछानता. वो टूम किधर हय उनकू बतलाव पह्यले.

कोंडिबा—पण शिपाईदादा जरा—

खांडव्या—पुना आपलच! ह्येरीचू वटवट करू नका. चला मोहोर व्हा अधुगर.

येसाजी—हें काय लचांड झालें ? हा चांगला रोजगार आहे बुवा !

कोंडीबा—तें काय विचारतां ! ब्रिन्भाड्याच्या घरांत सक्तमजूरीचा रोजगार लागणार आतां न् काय ! (जातात.)

प्रवेश ४ था.

[स्थळ—सरलेची खोली. सरला, मालती, व अंजनी बोलत आहेत.]

सरला—गडे मालती, चतुरिका उठली नाहींका अझून ?

मालती—उठल्या असतील तर ?

सरला—जा तिला ह्मणावं एकदां इकडे येऊन जा.

मालती—बरं आहे, बाईसाहेब. (जाते.)

अंजनी—ह्याच्यापेक्षां तो दुसरा तन्मणी चांगला दिसेल, बाईसाहेब.

सरला—तो नको गडे. मला हाच आवडतो.

अंजनी—हा बाई अगदीं आंधळा दिसतो. चतुरिकाबाई देखील अस्सं ह्मणतील.

सरला—ती एकवेडी आहे, अन् तूं सातवेडी आहेस. मी आपली हाच घालणार जा.

अंजनी—तुमचे केंस जर अगदीं काळे भोर असते, तर हीं फुलं जास्त उठून दिसलीं असतीं. बाकी हा शालू मात्र तुह्मांला नामी शोभतो हो ! त्या संपतगडच्या राणीच्या शालूची येवढी वाखाणणी करतात, तो पाहिला आहे मीं.

सरला—वा ! तो कित्ती तरी चांगला आहे याच्याहून !

अंजनी—इश्श ! तें मेलं जुनेर शोभेल याच्यापुढें. तसले दहा याच्यावरून ओंवाळून टाकावेत. याचं सूत किती बारीक, बुट्टे किती ठळक, कांठ काय सुबक, हा पदर किती घसघशीत, अन् इतकं असून हा हलका किती आहे ह्मणून सांगूं ?

सरला—त्याचा पायगुण चांगला होवो ह्मणजे झालं ! माझ्या हृदयांत बाई कसंसंच होऊं लागलं आहे !

अंजनी—त्याला पुरुषाच्या हातांचा स्पर्श झाला म्हणजे तें आपोआप ताळ्यावर येईल.

सरला—इश्श, हा ग कोण तुझा फाजिलपणा ? लाज नाहीं का वाटत ?

अंजनी—खरं बोलायची लाज काय म्हणून ? पुरुषाच्या हातांचा स्पर्श म्हणजे मी पतीच्या हातांचा स्पर्श असं म्हटलं. परक्या पुरुषांच्या म्हटलं असतं, आणि मग जर तुमची तब्बेत गेली असती, तर एक असो जावो !

(चतुरिका प्रवेश करते.)

सरला—यावं, बाईसाहेब.

चतुरिका—आलों, बाईसाहेब; काय हुकूम आहे ?

सरला—अगबाई ! आज अवाज नरमसा येतो आहे ?

चतुरिका—येत असेल, त्यांत काय मोठं ?

अंजनी—तर मग मी तुम्हांला एक गाणं शिकवित्यें, तें म्हणा; म्हणजे आवाज चांगला येऊं लागेल. म्हणा "तुम्हांविण मी व्याकुळ झालें"—

चतुरिका—झाली असशील ! अहो सरलाबाई, तुमचा नट्टापट्टा संपणार आहे का नाहीं आजच्या दिवसांत ? छे: ! आज कांहीं बाई मला चैन पडत नाहीं !

अंजनी—ओळखलंच मीं तें. आत्तां विचारणारच होत्यें कीं, येवढं चैन न पडायला कारण तरी कोण झालं आहे ?

चतुरिका—काय बडबड चालविली आहेन् हिनं !

अंजनी—कांहीं नाहीं. माझं म्हणणं इतकंच कीं, तुम्हांला लवकर बरं वाटूं लागावं.

सरला—हा शेला पाहिलास का तिकडून आला आहे तो ? याला किती मधुर वास येतो आहे म्हणून सांगूं ?

चतुरिका—मला बाई फार थंडी झाली आहे. मला कांहीं वासबिस येत नाहीं.

अंजनी—फार थंडी वाजत असली, तर ती कांहीं आतां नुसत्या पांघरुणांनीं रहायची नाहीं.

चतुरिका—अबबब! येवढ्या विनोदी कधींपासून झालांत तुह्मी?

अंजनी—तुह्मी नाहींशा झालांत तेव्हांपासून. माझा विनोद मला शोभतो, नाहीं?

चतुरिका—तो चांगलासा लोकांच्या नजरेस येत नाहीं. तुह्मी विनोदी आहांत ह्मणून एक चिठ्ठी मारा कपाळावर. अरे देवा देवा! मला आज कसंसंच होतं आहे.

अंजनी—त्याला एक औषध ठाऊक आहे मला. तुह्मी थोडासा प्रमोदरस घ्या, आणि त्याचाच लेप छातीला लावा, ह्मणजे हटकून गुण वाटेल.

चतुरिका—काय, प्रमोदरस? यांत कांहींतरी तुझा खोल अर्थ आहे.

अंजनी—खोल अर्थ कशाचा आला आहे? थोडासा प्रमोदरस पोटांत गेला ह्मणजे तितकी शांति वाटेल. माझं ह्मणणं इतकंच कीं, तुह्मी प्रमोदाचा लेप छातीला लावा,—ह्मणजे आनंदी वृत्ति धारण करा. तुह्मी कांहीं भलताच अर्थ केलात वाटतं? वा! बऱ्याच आहां कीं अर्थाचा अनर्थ करणाऱ्या! तुह्मांला असं वाटत असेल कीं, मला वाटतं तुमचं मन कोणावर तरी गेलं आहे ह्मणून! पण माझ्या मनाला वाटेल तें वाटूं द्यायला मला कांहीं वेड नाहीं लागलं. "तुमच्या मनांत कोणाबद्दल प्रेमभाव वाटत असेल, किंवा पुढें केव्हां तरी वाटेल," असं मला वाटावं ह्मणून मी किती जरी प्रयत्न केला तरी तो सिद्धीस जायचा नाहीं, असं मला वाटतं. प्रमोदराव देखील तुमच्यासारखेच होते. पण त्यांनांही चारचौघांसारखे मनोविकार होऊं लागले आहेत. लग्न करायचं नाहीं, असा त्यांचा बाणा होता; पण एका माणसासाठीं—तुमच्यासाठीं नव्हे हो—त्यांचा जीव आतां अगदीं घाबरा होऊन गेला आहे. तुमचा निश्चय तरी कितपत टिकेल

कोणास ठाऊक! बाकी तुह्मी थोडथोड्या माणसाळत चाललां आहांत, असं दिसतं.

चतुरिका—वारे वा! जीभ पण अगदीं शर्यतीच्या घोड्यापुढें धावते आहे!

अंजनी—पण मी कांहीं शर्यतीच्या घोड्यासारखी दारूबिरू नाहीं प्यालें कांहीं. मी शुद्धींत आहें, आन् माझं बोलणं अक्षरशः खरं आहे.

मालती—(प्रवेश करून) अरे वा! नवरी मुलगी तर सजली; चला तर आतां. चलाहो करवलीबाई. (जातात.)

प्रवेश ५ वा.

[**स्थळः**–दौलतरावांचा वाडा. दौलतराव, सांभारे, व पिंगळे प्रवेश करितात.]

दौलतराव—कां कोतवाल, येवढें काय जरुरीचें काम आहे?

कोतवाल—कांहीं नाहीं सरकार; आपल्याशीं थोडा एकांत करून कांहीं गुह्य गोष्ट उघड करायची आहे, सरकार.

दौलतराव—हें पहा, मी जरा धांदलींत आहें; तेव्हां काय असेल तें थोडक्यांत सांगा.

कोतवाल—बरोबरच आहे. घरांत लग्न वगैरे असलें ह्मणजे गडबड ही उडायचीच, सरकार.

पिंगळे—हो हो, तें काय सांगावें.

दौलतराव—तुमचा मुद्दा काय आहे तो कळं द्या अगोदर.

कोतवाल—(हंसून) हे पिंगळे थोडेसे मुद्दा सोडून बोलत सुटतात; चाललेंच आहे. त्यांचें आतां ह्मातारपण होत चाललें आहे, तेव्हां बुद्धी थोडी—हं. बाकी माणूस अगदीं गरीब आणि सरळ आहेत, सरकार.

पिंगळे—सरळ ह्मणजे? इतकें वय झालें तरी पाठीला येवढा-सुद्धां बांक नाहीं आला.

दौलतराव—छे बुवा, तुह्मी फार दीर्घसूत्री आहांत.

कोतवाल—छे छे. आह्मी आपले त्या गरीब बिचाऱ्या राजाच्या

पदरचे कोतवाल आहों. दीर्घसूत्रीचा हुद्दा कुठें, आणि आह्मी गरीब कुठें! बाकी आह्मांला जर दीर्घसूत्री मिळाली, तर ती आह्मी आपल्याला देऊं, सरकार.

दौलतराव—काय तुह्मी आपला दीर्घसूत्रीपणा मला देणार?

कोतवाल—अलबत. दीर्घसूत्रीहून मोठ्या पगाराचा हुद्दा मिळाला तरी तो आपल्याला द्यावा, असेंच आह्मांला वाटेल, सरकार. कारण आपण फार सुज्ञ आणि हुषार आहां, असा गांवांत दाट बोभाटा आहे. तो ऐकून मला फार आनंद वाटतो आहे, सरकार.

पिंगळे—मलासुद्धां.

दौलतराव—पण तुमचें ह्मणणें काय आहे?

पिंगळे—काल रात्रीं गस्तवाल्यांनीं दोन असामी पकडले आहेत. माझ्या नोकरीचीं बारा वर्षें भरत आलीं, पण असले बदमाष लोक आपण कधीं पाहिले नव्हते. ते आपल्या धर्मपुरींत असणें ही मोठी—लाजिरवाणी गोष्ट आहे.

कोतवाल—(हंसून) किती बोलतां हो? ह्मातारपणाचें आणि शहाणपणाचें वांकडें असतें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं! या जगांत काय काय मजा भरली आहे, तिला सीमाच नाहीं. चाललेंच आहे! बाकी यांचा स्वभाव फार सुरेख आहे. सरकार, आतां सगळ्यांच्या अंगीं सारखा शहाणपणा सांपडणें, ह्मणजे कांहीं सोपी गोष्ट नाहीं. हो, पांची बोटें कुठें सारखीं दिसतात, सरकार?

दौलतराव—शहाणपणाच्या बाबतींत हे तुमच्या पासंगाला देखील पुरायचे नाहींत, अशी माझी तुह्मीं अगदीं खात्री करून टाकलीत.

कोतवाल—शहाणपणाचा काय, कशाचाही काय, ईश्वर देणेदार आहे, सरकार.

दौलतराव—मला आतां गेलेंच पाहिजे—

कोतवाल—थांबा. जरा थांबा, सरकार. खरोखरीच आह्मीं रात्रीं

दोन भामटे पकडले आहेत. त्यांचा न्याय निवडायला त्यांनां इकडे आणूं का, ह्मणून विचारायला आह्मी आलों आहोंत, सरकार.

दौलतराव—कांहीं नको. मला आतां बिलकूल फुरसत नाहीं. तुह्मीच त्यांची जबानी वगैरे घेऊन माझ्याकडे या.

कोतवाल—ठीक आहे, सरकार.

दौलतराव—एकेक पेला झोंकून मग जा हो; तसे नका जाऊं.

एक चाकर—(प्रवेश करून) आपल्या वांचून तिकड अगदी खोळंबा झालाय सरकार.

दौलतराव—हा आलोंच मी. (दौलतराव व चाकर जातात.)

कोतवाल—चला पिंगळाजीराव; त्या चपात्याला ह्मणावें दौत, शाई, लेखण्या, आणि वाळू घेऊन चावडीवर ये. हो राहिलें–कागद-ही आणायला सांगा बरें का? आपल्याला आतां न्याय निवडायला बसायचें आहे.

पिंगळे—आणि तो नीट निवडला पाहिजे.

कोतवाल—हो हो. त्यांत काय आहे? एक गादीची खुर्ची आणि चांगलें गुळगुळीत रंगवलेलें टेबल असलें, ह्मणजे न्याय चक्क निवडतां येतो, असें मला पक्कें माहीत आहे. त्या शिरस्तेदारालाही घेऊन या बरें का येतांना, नाहीं तर विसराल. आलें का लक्ष्यांत? (जातात.)

[पडदा पडतो.]

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

[**स्थळः**—दौलतरावांचा वाडा. चंद्रकांत, दुर्मदराव, दौलतराव, विद्याधर पंडित, विश्वासराव, प्रमोदराव, सरला, चतुरिका, व इतर मंडळी बोलत आहेत.]

विश्वासराव—ही अजब चीज आपण मला देतां, पण या उपकारांची फेड मी कोणत्या तऱ्हेनें करूं?

दौलतराव—हें पहा, हीं सांप्रदायाचीं बोलणीं आतां पुरे करा. मी आपली बिनमोल कन्या तुमची योग्यता जाणूनच तुह्मांला अर्पण करीत आहें. तिचा नीट सांभाळ करा, आणि उभयतां सुखासमाधानानें नांदा.

विश्वासराव—बिन्मोल, खरी बिन्मोल! अहो, ही वरून जितकी सुंदर आणि सुशील दिसते, तितकी जर मनानें निर्मळ आणि सरळ असती, तर काय बहार झाली असती! पण दोन्ही गोष्टी एकाच व्यक्तीच्या अंगीं कोठल्या सांपडायला? हिची चर्या जितकी निर्व्याज दिसते आहे, तितकेंच हिचें अंतःकरण कुटिल असेल, अशी कोणाला शंका तरी येईल का? हें घ्या. हें उष्टें फळ मला नको. मी वेळेवर जागा झालों, हें फार बरें झालें. ती पहा कशी लाजते आणि मुरडते आहे ती. जशी कांहीं ही त्या गांवचीच नाहीं! वा; कृतकर्मावर पांघरूण घालायची ही युक्ति तर नामी शोधून काढिली आहे! हिच्या हुषारीची तारीफ करावी, कां दुष्कृत्याबद्दल खेद मानावा, हेंच मला समजत नाहीं. हिच्या मानभावीपणावरून एखाद्याला वाटेल कीं, ही महासाध्वी, आणि विशुद्ध शीलाची आहे; पण नाहीं. रतिसुखाचा आस्वाद हिनें पूर्णपणें घेतलेला आहे. आतां ही पायांचीं बोटें मोजीत उभी राहिली आहे, ती विनयानें नव्हे, तर आपलें दुष्कर्म उघडकीस आलें ह्मणून; असें पक्कें समजा.

दौलतराव—हें काय मांडलें आहे तुह्मीं? तुमच्या मनांत तरी काय आहे?

विश्वासराव—इतकेंच कीं, जिच्या नांवाचा साऱ्या जगभर डंका वाजला आहे, अशा जारिणीशीं संबंध जोडायचा नाहीं.

दौलतराव—तुह्मीं स्वतःच जर त्या बिचारीला चारित्र्यभ्रष्ट केलें असलें, तर—

विश्वासराव—समजलें, समजलें. मीच तिचा लग्नाचा पति होणार, तेव्हां माझ्याशीं रममाण व्हायला तिला कांहीं प्रत्यवाय वाटला नसेल,

असें तुह्मी ह्मणणार; पण नाहीं. आजपर्यंत तिच्याशीं जें माझें भाषण आणि वर्तन झालें, त्यांत अपवाद घ्यायला काडीमात्र जागा नाहीं.

सरला—आणखी माझ्या वर्तनांत आपल्याला काय गैर दिसलं ?

विश्वासराव—बस बस; कांगाव पुरे कर. तूं अगदीं किंत्ता घेण्याजोगी स्त्री आहेस, असें मला वाटत होतें; पण चांगलाच भ्रम दूर केलास. तुझ्या इतकी जबर कामवासना साऱ्या जीवितसृष्टींत एकाही प्राण्याला नसेल.

सरला—महाराज, आपल्याच कां मुखांतून हे वाग्बाण येत आहेत ?

दौलतराव—(चंद्रकांतास) महाराज, आपण कां स्वस्थ बसलां ?

चंद्रकांत—मी कोणच्या तोंडानें बोलूं; आणि काय बोलूं ? निवळ एका वेश्येबरोबर मी यांचें लग्न लावायला प्रवृत्त झालों, यांत मीं मात्र स्वतःची शोभा करून घेतली.

दौलतराव—आं ! खरोखरच मी हे शब्द ऐकतों आहें, का स्वप्नांत आहे; आहे तरी काय ?

दुर्मदराव—अहो रावसाहेब, आपण जागे असून यांचें भाषण ऐकत आहां; आणि तें अक्षरशः खरें आहे, समजलांत ?

सरला—खरं रे देवा ! तुला डोळे आहेत.

प्रमोदराव—या नमुन्याचें लग्न आपण पहिल्यानेंच पाहतों आहोंत आज !

विश्वासराव—अहो दौलतराव, मला तुह्मी ओळखतां कां नाहीं ? हे महाराज, आणि हे त्यांचे बंधु. हे तुमच्या माहितीचे आहेत कीं नाहीं ?

दौलतराव—आहेत, पण पुढें काय ?

विश्वासराव—फार कशाला ? मी तुमच्या मुलीला एकच प्रश्न विचारतों, ह्मणजे सर्व निकाल होईल. तुह्मी तिचे वडील या नात्यानें त्याचें खरें खरें उत्तर द्यायला तिला सांगा.

दौलतराव—ये बाळे; यांच्या प्रश्नाला काय सरळ असेल तो जबाब दे.

सरला—(स्वगत.) देवारे देवा ! काय हा माझ्यावर गहजब रचला आहे ! (उघड.) बोला महाराज काय असेल तें. माझ्या निर्मळ नांवाला डाग लावणं कोणाच्याही हातून होणार नाहीं.

विश्वासराव—तो तूंच लावून घेतला आहेस. बोल, काल रात्रीं बारा आणि एकाच्या दरम्यान तूं आपल्या खोलीच्या खिडकींतून कोणाशीं हितगुज करीत होतीस ? आपल्या सतीत्वाची शपथ घेऊन एकदां तरी खरें बोल.

सरला—आपण ह्मणतां त्या वेळीं मीं कोणापाशीं देखील एक शब्द काढला नाहीं.

चंद्रकांत—तर मग तूं सतीच नाहींस. दौलतराव, आतां तुह्मांला सगळी हकीगत सांगणें भाग आलें. काल रात्रीं या विश्वासरावांनीं, दुर्मद-रावांनीं, आणि मींस्वतः हिला आपल्या खोलीच्या खिडकींतून एका अडाणी मनुष्याशीं बोलत असतांना पाहिलें, आणि ऐकलें. हिचे आणि त्याचे शेंकडो वेळां एकांत होतात, त्यांचें वर्णन तो मोठ्या डौलानें करीत असतो.

दुर्मदराव—शिवशिव ! त्यांचा उच्चार करणें ह्मणजे केवळ जिव्हा विटाळणें आहे. अश्लील शब्द मुखांतून काढल्याखेरीज त्यांचें यथार्थ वर्णन करणें शक्यच नाहीं. छे छे, सरलाबाई, तुह्मांला अशी बुद्धि झाली तरी कोठून ?

विश्वासराव—खरोखर, सरले, ईश्वरानें तुझें बाह्य सौंदर्य आणि मोह-कपणा कमी करून जरी त्याच्या ऐवजीं तुझें अंतःकरण जास्त प्रबुद्ध केलें असतें, आणि विचार अधिक उदात्त केले असते, तरी चांगलें झालें असतें. अग सुंदर कुलटे, कुटिल सरले, पापकर्म करतांना मनांत थोडी तरी शंका येऊं द्यायची होतीस ? पण मी तुला काय ह्मणून बोल लावतों ? या भूलो-कावर अन्यून वस्तूची अपेक्षा करणें हाच वेडेपणा. अग अजून तरी डोळे उघड ! आतां तुझ्यावरचें माझें प्रेम कायम राहणें हें तर अशक्यच आहे. पण इतःपर कोठेंही रूपवती स्त्री माझ्या नजरेस पडली कीं, तिच्या शीलाबद्दल मनांत शंका आल्याखेरीज राहणार नाहीं.

दौलतराव—अरेरे! आतां मला मृत्यु येईल तर बरें!

(सरला मूर्छित होऊन पडते.)

चतुरिका—अग बाई, हें काय झालं! सरले, अग सरले–

दुर्मदराव—चला, येथें कशाला उभे राहतां आतां? आपलें बिंग बाहेर पडलें, तेव्हां मनाला धक्का बसून हिचा प्राण गेला आहेन् काय!

(चंद्रकांत, विश्वासराव, दुर्मदराव, वगैरे जातात.)

प्रमोदराव—(चतुरिकेस) कायग, अजून नाहींका सावध होत?

चतुरिका—छे हो. ती कशाची सावध होत्ये आहे! बाई सरले, सावध हो, सावध हो. अहो प्रमोदराव, गुरूजी तुह्मी तरी हिला शुद्धीवर आणाहो!

दौलतराव—कशाला आणा शुद्धीवर? हिच्या पापाला मृत्यूखेरीज दुसरें प्रायश्चित्त नाहीं. शिव शिव! हिचे आतां कायमचेच डोळे मिटूंदेत.

चतुरिका—झालीस का सावध? (सरला उठून बसते.)

दौलतराव—काय, ही फिरून उठली कां?

विद्याधर—असें कां बोलूं लागलां आपण?

दौलतराव—" असें कां बोलूं लागलों"? इतःपर या कारटीनें जगावें असें कोण ह्मणेल? जगांतल्या एकंदर चेतनाचेतन वस्तूंनां हिचा अगदीं तिटकारा आला असेल. हिच्या चेहऱ्यावरून जी गोष्ट सिद्ध होत आहे, ती गोष्ट ही तोंडानें नाकारते, तेव्हां हिला काय ह्मणावें? नको, उठूं नको; अशीच्या अशीच मर. जगांत तोंड दाखवायला तुला शरम वाटत नसेल, पण मी कुठें आतां तुला जिवंत ठेवतों आहें? आपल्याला कायती एकच मुलगी, ह्मणून मी खेद मानीत होतों; पण पुरे. एकीनें ध्वज लावला तेवढा पुरे झाला. हर हर! ही चांडाळीण निपजली नसती तरी कांहीं दुनिया ओस पडली नसती. हिच्यापेक्षां एखाद्या भिकारड्याची पोर बाळगली असती, आणि तिचें पाऊल थोडें जरी वांकडें पडलें असतें, तरी "ही माझी नव्हे," असें साफ सांगून

पलीकडे सरतां आलें असतें. पण ही–ही माझी पडली; हिच्यावर मीं अतोनात प्रेम केलें; हिचे नाहीं नाहीं ते चोजले पुरविले; हिच्याबद्दल येवढा अभिमान बाळगला; ज्याच्या त्याच्या पुढें हिचे गुणानुवाद गाइले; हिला मी आपलें सर्वस्व ह्मणून मानीत आलों; पण व्यर्थ ! साऱ्या गोष्टींचें हिनें उत्तम सार्थक केलें ! हिनें आपल्या चारित्र्याला येवढा कलंक लावून घेतला आहे कीं, तो धुवून काढायला अखंड समुद्राचें पाणी देखील पुरणार नाहीं.

प्रमोदराव—अहो दौलतराव, जरा शांत व्हा. शांत व्हा. (स्वगत) मी तर असा गोंधळून गेलों आहें कीं आतां येथें काय ह्मणावें, कांहीं सुचत नाहीं.

चतुरिका—मी खात्रीनं सांगत्यें कीं, या बिचारीवर त्यांनीं खोटंच कुभांड रचलं आहे.

प्रमोदराव—काल तुह्मी दोघी एके ठिकाणीं निजलां होतां का ?

चतुरिका—नाहीं. आज वर्षभर आह्मी एकाच जागीं निजत होतो; पण काल मात्र—

दौलतराव—बस्स ! आतां तर शंकेला जागाच उरली नाहीं. ज्या गोष्टीबद्दल अगोदरच खात्री झाली होती, तिला अधिक पुष्टीकरण मिळालें. प्रत्यक्ष महाराज खोटें बोलतील हें संभवेल तरी कसें ? त्यांच्या बंधूंनां तरी नसतें किटाळ रचायचें काय प्रयोजन आहे ? आणि विश्वासराव—बिचाऱ्याला हिच्या दुष्कर्मांचा उच्चार करतांना देखील रडूं कोसळलें— त्यांनां हिच्यापुढें सारें तुच्छ वाटत होतें. त्यांच्या हातून हिच्यावर खोटा आळ घालणें कधीं तरी होईल का ? तें कांहीं नाहीं. हीच दोषी आहे. हिला जाऊं द्या, मरूं द्या एकदांची.

विद्याधर—जरा शांत व्हा. माझें ह्मणणें थोडें ऐकून घ्या. तुमचा हा सारा गोंधळ चालला असतांना मी मुद्दाम स्तब्ध राहून हिच्या मुखचर्येचें बारीक तऱ्हेनें निरीक्षण करीत होतों. संतापानें हिची मुद्रा कशी लाल होत होती, आणि एका क्षणांत दुःखानें कशी फिक्की पडत होती,

तें सारें माझ्या लक्ष्यांत आलें. त्याचप्रमाणें हिच्या डोळ्यांत असें एक प्रकारचें विलक्षण तेज दिसत होतें कीं, त्याच्या योगानें ही आपल्या विमल कीर्तीला लागलेल्या कलंकाचें भस्म करून टाकते आहे कीं काय, असा भास होत होता. तुह्मी कांहींही ह्मणा, पाहिजे तर माझें वय, वृत्ति, अधिकार वगैरे कांहींएक न जुमानतां, मी शुद्ध वेडा आहें असें ह्मणा—पण प्रतिज्ञेवर सांगतों कीं, ही बिचारी खरोखर निरपराधी असून तुह्मां सर्वांच्या मतीला भ्रम पाडणारी कांहीं तरी दुर्बोध गोष्ट घडून आली असलीच पाहिजे.—मी ह्मणतों हें खोटें ठरलें तर मीं केलेलें अध्ययन, व त्याच्या जोडीला मिळालेला अनुभव हें सर्व फुकट, असें तुह्मी समजा.

दौलतराव—तें कांहीं नाहीं हो ! जी गोष्ट अगदीं निर्विवाद आहे, तिच्यावर पांघरूण घालायचा प्रयत्न तुह्मी कशाला करतां ?

विद्याधर—काय ग, ज्याच्याबद्दल तुझ्यावर दोषारोप झाला आहे, तो मनुष्य तरी कोण ?

सरला—त्या आरोप करणारांनांच विचारा; मी काय सांगू ? अविवाहित मुलींचं पुरुषांशीं ज्या तऱ्हेचं वर्तन असावं, त्याच्या पलीकडे जर मी एक नखभर गेल्यें असल्यें, तर सात जन्म नरकांत पडेन. देवारे देवा! काय हा माझा छळवाद मांडला आहेस ! काल रात्रींचसें काय, पण बाबा, स्वप्नांत देखील मीं कधीं कोणाशीं गैरवर्तन केलं नाहीं, कीं एक अवाक्षर काढलं नाहीं. जर असेल, तर माझं तोंड पाहूं नका. माझा तिरस्कार करा. मला हाल हाल करून मारा. पण उगीचच्या उगीच माझ्यावर अशी आग पाखडूं नका.

विद्याधर—महाराजांचा कांहींतरी मिथ्या ग्रह झालेला असावा.

प्रमोदराव—अगदीं खास. त्या दोघांच्या डोळ्यांत जर कोणी धूळ टाकली असेल, तर तो महाराजांचा लेकवळा भाऊ दुर्मदच असला पाहिजे. असलीं निंद्य कृत्यें करण्यांत तो सदा गुंतलेला असतो.

दौलतराव—तुह्मी ह्मणतां असेंही असेल. जर ही जारिणी असली,

तर हिला यमसदन दाखवीन. आणि ते जर नीच, कपटी, ठरले, तर त्यांच्या नरडीचा घोट घेऊन त्यांचें निसंतान करीन. तुह्मी ह्मणाल कीं, माझा स्वतः-चाच अंतकाळ आतां जवळ येऊन ठेपला आहे, तेव्हां माझ्या हातून काय होणार; पण नाहीं. तितकी धमक या दौलतरावाच्या अंगांत अजून आहे. माझी शरीरप्रकृति चांगली सुदृढ आहे; माझ्या बुद्धीला कांहीं भ्रंश झालेला नाहीं, कीं द्रव्याची टंचाई आहे असें नाहीं, कींवा मित्रांचें साहाय्य नाहीं असेंही नाहीं. माझ्या अंगची ताकद, या डोक्याची मसलत, तसेंच पैशाचें पाठबळ, आणि मित्राचें साहाय्य, इतक्या गोष्टी अनुकूल असल्यावर त्यांची धूळधाण उडवायला फारसा अवकाश नाहीं लागायचा.

विद्याधर—पण जरा सावकाशीनें घ्या. असे रागाच्या स्वाधीन होऊं नका. या कामांत माझ्या सह्यानें अवश्य चाला. हिचा प्राण गेला अशी समजूत होऊन ती मंडळी आत्तां येथून गेली. तेव्हां हिला एखाद्या गुप्त ठिकाणीं ठेवून, हिचा खरोखर अंत झाला अशीच लोकांत वदंता होऊं द्या. हिच्या नांवाची छत्री बांधा, व सर्व तऱ्हेनें जणूं काय ही खरोखरच मरण पावली अशी बतावणी करा.

दौलतराव—असें करण्याचा उद्देश ?

विद्याधर—उद्देश हाच कीं, एक तर हिचा नाश झाला असें पाहून लोकांनां हिच्या दुष्कर्माचा विसर पडेल, आणि तिच्याबद्दल करुणा वाटूं लागेल; आणि दुसरें असें कीं, विश्वासरावांच्या मनावर याचा निराळ्याच तऱ्हेचा परिणाम होईल. कोणतीही वस्तु घ्या. ती नाहींशी झाली ह्मणजे तिची किंमत अधिक वाटूं लागते. तेव्हां, सरलेचें अशा तऱ्हेनें प्राणो-त्क्रमण झालें, हें पाहून जो तो तिची कींव करील, आणि तिला क्षमा करील. ही गोष्ट सामान्य जनांची झाली. आतां विश्वासरावांविषयीं ह्मणाल तर, 'सरलेच्या नाशाला केवळ आपण कारण झालों' असा मर्मभे-दक विचार त्यांच्या मनांत आला कीं, त्यांचें मन त्यांनां अतिशय खाऊं लागेल. त्यांनां अनावर दुःख होईल. आणि मग हिची मनोहर मूर्ति नख-

शिखांत त्यांच्या कल्पनाचक्षूंपुढें विलास करूं लागेल. इतकेंच नव्हे, तर ती त्यांनां हल्लींपेक्षां दसपट रमणीय वाटेल. मग ते आपल्या मनाशीं म्हणूं लागतील कीं, "छे, तिच्या हातून जरी दुष्कर्म घडलें, तरी अशा तऱ्हेनें आपण तिला बोलायचें नव्हतें." अहो याच्याहूनही कल्याणप्रद गोष्टी घडून येणार नाहींत म्हणून कशावरून? पण नाहीं आल्या म्हणून समजा घटकाभर. ती नाहींशी झाली, अशी लोकांची कल्पना झाली, म्हणजे तिच्या दुराचरणाची तितकी चिकित्सा होणार नाहीं; हें काय थोडें झालें? आतां माझ्या अदमासाप्रमाणें विश्वासरावांच्या आणि हिच्या संयोगाचा योग पुन्हां जुळून आला नाहीं, तर हिला लोकांच्या दृष्टीआड—जेथें कोणाचा संपर्क नाहीं—अशा एखाद्या मठाबिठांत ठेवून द्यावी म्हणजे झालें.

प्रमोदराव—दौलतराव, तुह्मी यांच्या मसलतीनें वागावेंत, असें माझें देखील मत आहे. आतां, महाराजांशीं आणि विश्वासरावांशीं जरी माझें इतकें सख्य आहे, तरी या गोष्टीचा मी त्यांनां मुळींच गंध लागूं देणार नाहीं, असें तुह्मांला अगदीं शपथपूर्वक सांगतों.

दौलतराव—दुःखाच्या आवेगानें माझें अगदीं भान नाहींसें झालें आहे. तेव्हां पाहिजे त्यानें मला आतां हातांतल्या भावल्याप्रमाणें खेळवावें, अशी स्थिति झाली आहे. ठीक आहे; तुमच्या ह्मणण्याप्रमाणें करायला मी तयार आहें.

विद्याधर—आतां कसें बोललांत? जसें संकट येईल, तसा त्याच्या निवारणाचा उपाय योजिला पाहिजे. सरले, चल. तुझ्या विवाहाची तिथि थोडीशी लांबणीवर पडली, असें मानून रहा झालें. ओढवलेले कुदिन कसे तरी कंठणें भाग आहे.

(चतुरिका व प्रमोदराव यांखेरीज सर्व जातात.)

प्रमोदराव—अग! तूं अशी रडतेस कां?

चतुरिका—मी आपली अशीच रडत बसेन जा.

प्रमोदराव—छे बुवा. तूं रडूं नयेस अशी आपली इच्छा आहे.

चतुरिंका—माझं रडणं न रडणं कांहीं तुमच्या इच्छेवर अवलंबून नाहीं. मी रडत बसल्यें ह्मणून तुमचं काय बिनसलं ?

प्रमोदराव—खरोखर, तुझ्या बहिणीवर फार अन्याय चालविला आहे.

चतुरिका—तिला कोणी न्याय मिळवून दिला, तर त्याची मी किती तरी उतराई होईन!

प्रमोदराव—तुझे आभार संपादन करायला कांहीं मार्ग आहे का ?

चतुरिका—मार्ग आहे. पण तो स्वीकारणाराच कोणी नाहीं.

प्रमोदराव—कोणी नाहीं ? पुरुषाच्या हातून होण्याजोगें तें काम आहे कीं नाहीं ?

चतुरिका—आहे. पण तुमच्यासारख्याच्या हातून नाहीं व्हायचं.

प्रमोदराव—हें बघ चतुरिके, सांगूंच का ? तूं किंनाहीं, मला फार आवडतेस; हा चमत्कार नाहीं का ?

चतुरिका—ठाऊक नसलेल्या गोष्टींचा चमत्कार वाटतो खरा. मला देखील असं ह्मणतां येईल कीं, 'हें पहा किं नाहीं, प्रमोदराव, तुम्ही मला फार आवडतां.' पण—येवढ्यावरून तुम्ही खरोखरच मला आवडतां कीं नाहीं, हें ताडणं कठीण आहे. माझ्या सरलेबद्दल मला बाई फार वाईट वाटतं!

प्रमोदराव—तें कांहीं नाहीं; तुझें माझ्यावर प्रेम आहे, असें मी प्रतिज्ञेनें सांगतों.

चतुरिका—ही कुठली बाई उलटी प्रतिज्ञा! माझं तुमच्यावर प्रेम आहे, असं तुम्ही प्रतिज्ञेवर सांगतां का ?

प्रमोदराव—होय. आणखी असेंही सांगतों कीं, माझें तुझ्यावर अतोनात प्रेम आहे.

चतुरिका—पहा बरं ? बदलाल.

प्रमोदराव—प्राण गेला तरी नाहीं बदलणार. आतां तरी झाली खात्री ? कां नाहीं ?

चतुरिका—यासुद्धां तुह्मीं तीन वेळ सांगितलंत; तेव्हां आतां खात्री झाली. एकंदरींत देवानंच गाऱ्हाणं ऐकलं ह्मणायचं !

प्रमोदराव—तें काय ?

चतुरिका—मी अशा विचारांत होत्यें कीं, प्रेमाची गोष्ट तुमच्याजवळ काढावी कां नाहीं; इतक्यांत तुह्मीं होऊनच मला ह्मटलंत कीं, "चतुरिके, तूं मला फार आवडतेस." माझ्या मनांत देखील तसेच शब्द घोळत होते; आणि ते मी बोलूनही दाखवणार होत्यें.

प्रमोदराव—तर मग ते शब्द पुन्हां एकदां अगदी मनापासून उच्चार पाहूं ?

चतुरिका—ते मनापासून उच्चारायला माझं मन आतां माझ्याजवळ आहे कुठें ?

प्रमोदराव—तर मग मी तुझ्यासाठीं काय करूं, बोल.

चतुरिका—सांगू ? घ्या विश्वासरावांचा प्राण.

प्रमोदराव—भलतेंच ! ही गोष्ट कालत्रयीं घडणार नाहीं.

चतुरिका—मग माझा कांहीं आतां जीव रहात नाहीं. (जाऊं लागते.)

प्रमोदराव—थांब, प्रिये थांब.

चतुरिका—तें कांहीं नाहीं. ही निघाल्येंच मी. तुमचं माझ्यावर प्रेमच नाहीं. सोडा. जाऊं द्या मला.

प्रमोदराव—पण—

चतुरिका—पण नाहीं न् बीण नाहीं. सोडतां का नाहीं मला ?

प्रमोदराव—जा, पण अशी रुसून फुगून जाऊं नको.

चतुरिका—माझ्या वैऱ्याचा नाश करणं होत नाहीं, अन् ह्मणे 'रुसून फुगून जाऊं नको.'

प्रमोदराव—विश्वासरावांचें आणि तुझें वैर का आहे ?

चतुरिका—हें विचारायला का पाहिजे ? ज्या मेल्या क्रूर राक्षसानं माझ्या गरीब निरपराधी बहिणीची अब्रू घेऊन तिच्या जन्माचं वाटोळं केलं, तो माझा वैरी नव्हे तर कोण ? मी जर पुरुष असत्यें तर दाखवलं असतं. अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत कांहींएक कपट न दाखवितां ऐन वेळेला भर समाजांत उघडपणें नाहीं नाहीं तें बोलून त्या बिचारीचा गळा कापला आं ! मी जर पुरुष असत्यें, तर उभ्या दोनप्रहरीं भर चावडीवर आणून त्याची आंतडीं लोंबविलीं असतीं. कध्धीं चुकत्यें नसत्यें.

प्रमोदराव—प्रिये चतुरिके, माझें ऐक—

चतुरिका—काय ह्मणे, पर पुरुषाशीं हितगुज करीत होती का ? छान्; वा सुरेख !

प्रमोदराव—अग पण माझें ऐकून घे—

चतुरिका—माझी लाडकी ती ! बिचारीवर केवढा अनर्थ आणला; तिच्या जन्माचं मातेरं झालं.

प्रमोदराव—जरा शांत हो. मी काय—

चतुरिका—मोठे राजे आणि सरदार ह्मणवून घेतात ! राजेशाहीचं आणि सरदारीचं लक्षणच हें ! त्या खाटकावर तरवार उपासायला तरी मी पुरुष असायला पाहिजे होत्यें. निदान माझ्या वतीनं तरवार उपसणारा एक तरी मर्द या जगांत असायचा होता. पण नांव कशाला ! पुरुषांच्या अंगांत आतां मर्दुमकी राहिली आहे कुठं ? त्यांनां तेवढं भपकेदार पोषाख करून आणि मिशांचे आंकडे वर चढवून नटायला सांगा. बायकांच्यापुढें लुब्रेपणा करण्यांत आणि अद्वातद्वा बडबडण्यांत मात्र निपुण ! हवं तर, अमक्यानं अशी लढाई मारली, आणि तमक्यानं तसा वाघ मारला, ह्मणून पोकळ गप्पा मारीत बसतील. बरं पण जाऊं द्या. माझ्या ह्मणण्यानं मी पुरुष होत्यें आहें थोडीच ! तेव्हां असंच मुळूमुळू रडत बसावं न् काय !

प्रमोदराव—हें बघ चतुरिके, असा संताप करून घेण्यांत काय बरें अर्थ आहे ? माझें तुझ्यावर प्रेम आहे, याबद्दल हें घे माझें वचन.—

चतुरिका—कोरडं वचन देण्यापेक्षां आपल्या हाताचा कांहीं तरी सदुपयोग करा.

प्रमोदराव—खरेंच कां सरळेवर हें कुभांड रचलें आहे, असें तुला वाटतें ?

चतुरिका—अगदीं खरं. तुमचं माझ्यावर प्रेम आहे हें जितकं खरं, तितकं तेंही खरं.

प्रमोदराव—बस्स; लागलें माझ्याकडे. आणतों त्याला समरांगणांत ओढून, आणि काढतों काम. तूं आपल्या बहिणीचें शांतवन कर जा.

(जातात.)

प्रवेश २ रा.

[स्थळ—कचेरी. कोतवाल, पिंगळे, शिरस्तेदार, शिपाई, येसाजी व कोंडीबा.]

कोतवाल—कायहो, कचेरी भरलीना ? आतां कामाला सुरवात होऊं द्या.

पिंगळे—याहो शिरस्तेदार, खुर्ची घ्या.

शिरस्तेदार—आरोपी कोठें आहेत ?

कोतवाल—हे तुमच्यापुढेंच आहों कीं आह्मी !

पिंगळे—भले शाबास ! आह्मी तर न्याय निवडणारे आहोंत.

शिरस्तेदार—बरोबर आहे. पण ज्यांचा न्याय निवडायचा, त्यांनां हजर करवा कीं कोतवालसाहेब.

कोतवाल—चला हजर व्हारे बाबांनो. कां दोस्त, तुमचें नांव काय ?

येसाजी—येसाजीराव.

कोतवाल—लिहून घ्याहो 'येसाजीराव.' आणि तुमचें हो ?

कोंडीबा—मी एक सभ्य गृहस्थ आहें. माझें नांव कोंडीबा.

कोतवाल—लिहा ' सभ्य गृहस्थ कोंडीबा. ' ह्मणा 'ईश्वराला स्मरून खरें बोलेन.'

येसाजी
कोंडीबा }—खरें बोलूं ईश्वराला स्मरून.

कोतवाल—लिहाहो, हे ह्मणत आहेत कीं, ' खरें बोलूं ईश्वराला स्मरून.'—थांबा थांबा. ईश्वर हा शब्द अगोदर लिहा, आणि मग ह्या चोरांचीं नांवें लिहा; नाहीं तर देवाला आपला अपमान झाला असें वाटेल. अहो तुह्मी सभ्य गृहस्थ, तुह्मी दोघेही पहिल्या नंबरचे हरामखोर आहां, असा पुरावा झाला आहे. यावर तुमचें काय ह्मणणें आहे ?

पिंगळे—दोघांचाही पहिला नंबर कसा बुवा ?

कोंडीबा—आमचें ह्मणणें असें आहें कीं, आह्मी हरामखोर नाहीं.

कोतवाल—अरे वा ! काय मजा करतोरे हा ! थांब गुलामा सभ्य गृहस्था, तुझा खरपूस समाचार घेतला पाहिजे. (येसाजीस) अहो दोस्त, इकडे या पुढें. तुमच्या कानांत एक गोष्ट सांगतों. तुह्मी दोघे हरामखोर आहांत का नाहीं ?

येसाजी—मुळींच नाहीं.

कोतवाल—दोघेही हरामखोर नाहीं ह्मणतात; गुलाम कट करून आले आहेत. अरे ए, एका बाजूला उभे रहा पाहूं ? कायहो, 'मुळींच नाहीं.' ह्मणून लिहिलें का ?

शिरस्तेदार—अशा तऱ्हेनें नाहीं खटला चालावयाचा कोतवाल-साहेब. त्या गस्तवाल्यांची अगोदर साक्ष घेतली पाहिजे; कारण या कज्जांत ते फिर्यादी आहेत.

कोतवाल—मग असें अगोदर नव्हतें का सांगतां येत ? याहो दोस्त, करा यांच्यावर फिर्याद.

खांडव्या—ह्यो इसम (येसाजीकडे बोट दाखवून) ह्मंगाला की दुर्म-दराव हरामखोर हायती कोतवालसाहेब.

कोतवाल—लिहून घ्या 'दुर्मदराव हरामखोर आहेत.' चांगला रोजगार ! राजाच्या भावाला हरामखोर ह्मणणें ह्मणजे केवढा राजद्रोह !

येसाजी—कोतवालसाहेब,—

कोतवाल—ए, चुप बैस. तुला खरेंच सांगतों कीं, तुझ्याकडे लक्ष्य द्यायची माझी खुषी नाहीं.

शिरस्तेदार—बरें कायरे, तुह्मी आणखी काय काय ह्मणतांना ऐकलेंत यांनां.

चपात्या—'सरलाबाई वाईट चालीच्या हैती, अस दावन्यापाई दुर्मदरावापून पाचशे रुपय लाटल' अस ह्यानी ह्यासनी सांगितल बगा.

कोतवाल—काय हा नीचपणा !

शिरस्तेदार—बरें पुढें ?

खांडव्या—विस्वासरावानी सरलाबाईची अक्शी चारचौगामंदी फटफजिती उडवायच ठरिवलय, अस ह्ये हंगाले.

कोतवाल—अरे लुच्चा, चोरा. तुला नुसती काळ्यापाण्याची शिक्षा पुरणार नाहीं. तुला हिरव्या, निळ्या, आणि जांभळ्या पाण्यावर पाठवून देतों; तूं काय समजला आहेस ?

शिरस्तेदार—बरें आणखी ?

चपात्या—आनीक काय बी न्हाई.

शिरस्तेदार—या पुराव्यावर तोंड काढून बोलायला तुह्मांला जागाच नाहीं. दुर्मदराव रात्रींच चोरून फरारी झाले आहेत. विश्वासरावांनीं सरलाबाईच्यावर हुबेहुब असाच आरोप आणिला, आणि त्यासरसा त्यांचा प्राण गेला ! ठीक आहे. कोतवालसाहेब, यांनां दौलतरावांच्या वाड्यांत घेऊन या. मी पुढें जाऊन झालेली हकीगत त्यांनां कळवितों.

कोतवाल—चढवारे यांच्या हातांत बेड्या. ए सभ्य गृहस्थ, हात पुढें कर.

पिंगळे—बरोबर आहे. यांनां सक्त अटकेंत ठेवलें पाहिजे.

कोंडीबा—अरे हो अटकिच्या.

कोतवाल—काय ह्मणतोस ? अरे ते हे गेलेकां ? त्यांनां ह्मणावें, राजाच्या पदरचा नोकर 'अटकिच्या' आहे ह्मणून लिहून ठेवा. चला बघतां काय ? अडकवा बेड्या यांच्या हातांत. चोर बेरड कुठले !

कोंडीबा—अरे जा. मोठा आला आहे बेड्या अडकविणारा ! गाढव; गध्धा कुठला.

कोतवाल—फिरून तर बोल ?

कोंडीबा—तूं गध्धा आहेस गध्धा.

कोतवाल—काय, माझ्या अधिकाराची बेअब्रू करतोस कां ? येवढ्या मोठ्या पुरुषाचा अपमान करितोस, तुला लाज नाहीं वाटत ? अरेरे ! 'मी गध्धा आहें,' हें लिहून घ्यायचें राहिलें ! कांहीं हरकत नाहीं. मी गध्धा आहें बरें का हो ? ध्यानांत ठेवा. मी तर हें कध्धीं विसरणार नाहीं. अरे भामट्या ! थांब, तूं काय समजला आहेस ? या सांभाऱ्या कोतवालाशीं गांठ आहे. तेव्हां तुझीं शंभर वर्षें भरलीं ह्मणून समज. मी ह्मणजे काय समजला आहेस तूं ? मी मोठा शाहणा आहें, इतकेंच नव्हे, तर मोठा घरंदाज मनुष्य आहें, इतकेंच नव्हे, तर मोठा अम्मल-दार आहें, जमीनदार आहें, आणि पाणीदार आहें. माझ्या घरीं कपाट-भर कायद्याचीं पुस्तकें आहेत. तूं काय समजला आहेस ? चला बांधारे यांच्या मुसक्या. छे, मी गध्धा आहें ह्मणून लिहायचें राहिलें !

[पडदा पडतो.]

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

[स्थलः—दौलतरावांचा वाडा. दौलतराव व मल्हारराव बोलत आहेत.]

मल्हारराव—दादा, आतां हा शोक पुरे करा. याच्यापासून काय बरें फायदा आहे ?

दौलतराव—'सुखमुपदिश्यते परस्य.' हें पहा, तुह्मी आपला उपदेश पुरे करा. तुमचें सगळें भाषण पालथ्या घागरीवर पाणी पडल्याप्रमाणें होत आहे. जो कोणी माझ्याप्रमाणेंच समदुःखी असेल, त्याच्याच हातून माझें सांत्वन झालें तर होईल. माझ्याप्रमाणें ज्याच्या आवडत्या मुलीवर अनर्थ गुदरला असेल, असा मनुष्य मला येऊन सांगूद्या पाहूं कीं, शोक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं ? हुबेहुब माझ्यासारखाच दुर्धर आणि दुःखकारक प्रसंग ज्याच्यावर ओढवला असेल, असा एखादा इसम जर मोठ्या प्रौढपणानें आपली दाढी कुरवाळीत कुरवाळीत "अं:, त्यांत काय आहे" ह्मणून ह्मणेल, आणि क्षणभंगुरत्वाच्या गोष्टी सांगूं लागेल, तर मी आपलें दुःख विसरून जाईन; पण असा मनुष्य आढळायचाच नाहीं. हें पहा भाऊ, मनुष्याला वेदान्ताच्या गोष्टी सुचतात कोठपर्यंत, तर प्रत्यक्ष आपल्यावर वेळ बेतली नाहीं तोंपर्यंत. पण स्वतःवर पाळी आली कीं, तो वेदांत जागच्याजागीं राहतो. दुःखानें गांजलेल्या मनुष्याला सुखासमाधानाच्या गोष्टी सांगणें पाहिजे त्याच्या हातून होतें. पण त्यांच्यापासून स्वतःच्या मनाला बोध करून घेणें मात्र एकाच्यानेंही होत नाहीं. ह्मणून ह्मणतों कीं, तुह्मी माझ्या नादीं लागूं नका. मला किती दुःख होतें आहे तें माझें मला ठाऊक.

मल्हारराव—पण त्यांतल्यात्यांत थोडा विवेक केला पाहिजे. नाहींतर लहान पोरांत आणि आपल्यांत भेद तो काय ?

दौलतराव—आतां मेहेरबानी करून उगीच बसा कसे ! मी असाच दुःख करीत बसणार. आजपर्यंत लाखो साधू आणि संत होऊन गेले, पण सुखदुःखांपासून अजीबात अलिप्त राहिलेला असा एकही माझ्या ऐकण्यांत नाहीं. नुसते त्यांचे विचार कितीही गंभीर आणि उदात्त असले, तरी काय करायचे आहेत ?

मल्हारराव—तर मग जे तुमच्या दुःखाला कारण झाले त्यांनांही त्याचा थोडा प्रसाद मिळूं द्या.

दौलतराव—हें वास्तविक बोललांत; मी तसें करणारच आहें. माझी मनोदेवता मला असें सांगते आहे कीं, सरलेचें आचरण शुद्ध आहे, आणि अंतःकरण पवित्र आहे. आणि ह्मणून, विश्वासरावांची आणि तिची नालस्ती केलेल्या सर्वांची पुरी खोड मोडायचा माझा कृतनिश्चय आहे.

मल्हारराव—हे पहा विश्वासराव आणि महाराज मोठ्या लगबगीनें इकडेच येत आहेत.

(चंद्रकांत व विश्वासराव प्रवेश करितात.)

चंद्रकांत—कां दौलतराव ?

विश्वासराव—कसें काय मल्हारराव ?

दौलतराव—यावें महाराज. मी—

चंद्रकांत—आह्मी थोडे गडबडींत आहों या वेळीं.

दौलतराव—काय गडबडींत आहांत काय ? बरें, जा तर मग. आतां ठीकच आहे !

चंद्रकांत—असे अगदीं भांडायलाच काय उठलांत ?

मल्हारराव—भांडणें करून जर आमचें नुकसान भरून आलें असतें, तर येव्हांना किती रक्तस्राव झाला असता कोणास ठाऊक !

विश्वासराव—कुणीं तुमचें नुकसान केलें ?

दौलतराव—कुणीं केलें ह्मणून विचारतोस काय आणखी ? अरे ढोंग्या, कपट्या; बस बस. तरवारीला हात घालून मला धाक दाखवूं नकोस. मी कांहीं भीत नाहीं तुला.

विश्वासराव—तुमच्यासारख्या वृद्धाला धाक दाखवायचा माझा मुळींच हेतु नव्हता. माझा हात आपला सहज तरवारीकडे गेला असेल.

दौलतराव—कळलें, कळलें. अरे पोरा, माझी अशी चेष्टा करूं नकोस बरें; जड जाईल. ह्मातार्‍या माणसांना, 'आह्मीं लहानपणीं अस्सें केलें, आणि तस्सें केलें, आणखी अझूनही यंव आणि त्यंव करूं,' ह्मणून वल्गना करण्याची खोड असते. पण हा दौलतराव तशांपैकीं नव्हे, हें पक्कें समजून रहा. विश्वासराव, माझ्या निष्पाप मुलीचा आणि माझा तुह्मी इतका घोर अपराध केला आहांत कीं, त्याचा सूड उगविण्याकरितां मला तुमच्याशीं लढायला कंबर बांधावी लागत आहे. खरें ह्मटलें असतां माझे लढायचे दिवस गेले आहेत; हे सारे केंस देखील पिकून गेले आहेत. पण या सार्‍या गोष्टींचा विचार मला बाजूला ठेवणें भाग आहे. माझ्या सुशील कन्येवर तुह्मी नसता आळ घातलात; नाहीं नाहीं तसलीं दुष्ट भाषणें बोलून तिच्या काळजाला घरे घरे पाडलेत; आणि त्याच्या योगानेंच त्या बिचारीचा शेवट झाला! आमच्या घराण्यांत आजपर्यंत कोणाचीही कीर्ति दूषित झाली नव्हती; ती व्हायला तुमचा अधमपणा कारण झाला.

विश्वासराव—काय माझा अधमपणा ?

दौलतराव—होय होय विश्वासराव, तुमचा अधमपणा.

चंद्रकांत—तुमचें ह्मणणें चुकीचें आहे, दौलतराव.

दौलतराव—महाराज, आपण या कामांत बोलूं नका. यांची छाती असेल तर उपसा ह्मणावें तरवार; मग यांचा शिरच्छेद करून माझें ह्मणणें खरें आहे कीं नाहीं दाखवितों. यांच्या अंगची चपलता, उमेद आणि पट्टा खेळण्यांतलें प्राविण्य सगळें एका बाजूला राहून जाईल.

विश्वासराव—जा हो! असे पुष्कळ पाहिले आहेत शिरच्छेद करणारे.

दौलतराव—अरे कालचा पोर नाहींस तों किती टुरटुर लावली आहेस ? त्या अबलेला मारलीस यांत काय पुरुषार्थ केलास ? तुझ्या अंगांत जर खरें पाणी असलें तर असा माझ्या समोर ये.

मल्हारराव—चल उपस तरवार; बघतोस काय ? ए बाळ, असा पुढें ये जरा ? अरे तरवार उपस बाळ, तरवार उपस. तुझीं हाडेंन्हाडें सोडवून काढतों; बघ तर खरा !

दौलतराव—भाऊ,—

मल्हारराव—बस; बोलूं नका. या नीचानें माझ्या आवडत्या पुतणीची निर्भर्त्सना करून तिचा प्राण घेतला. अहो, याचें काय तोंड लागलें आहे माझ्या समोर यायला ? दुष्ट कुठला, चांडाळ, खाटीक, नीच—

दौलतराव—पण भाऊ, जरा—

मल्हारराव—सांगितलेंना उगीच बसा ह्मणून ? अहो, यांची किंमत मी पुरी ओळखून आहें. हीं वाचाळ छाकटीं नटवीं पोरें; यांची नुसती तोंडमगरुरीच पाहून घ्यावी. लोकांची कुचेष्टा आणि वात्रटपणा करायला सांगा यांना. येवढा कडवेपणाचा आव घालितात, पण त्यांच्या हातून कांहीं देखील होणार नाहीं.

दौलतराव—पण असे बेफाम होऊं नका.

मल्हारराव—गप्प बसा हो, मधें बोलूं नका. मी यांचा खरपूस समाचार घेणारच.

चंद्रकांत—हें पहा दौलतराव, मल्हारराव, उगीच कांहीं डोक्यांत राख घालून घेऊं नका. तुमच्या मुलीबद्दल मला खरोखरच मनापासून वाईट वाटतें; पण काय उपयोग ? आतां तिच्यावरच्या आरोपाबद्दल ह्मणाल, तर तो अगदीं यथार्थ आणि प्रमाणसिद्ध आहे.

दौलतराव—जरा माझें ह्मणणें ऐकून घेतां का ?

चंद्रकांत—कांहीं ऐकून घेत नाहीं.

दौलतराव—ठीक आहे. पाहतो कसे नाहीं घेत ते ! चला हो.

मल्हारराव—चला. जर यांना चौदावें रत्न नाहीं दाखविलें, तर नांव बदलून ठेवीन.

(दौलतराव व मल्हारराव जातात; व प्रमोदराव प्रवेश करितो.)

चंद्रकांत—हे पहा, आपण शोधीत होतों ते गृहस्थ येत आहेत.

विश्वासराव—यावें प्रमोदराव; कसें काय आहे ?

प्रमोदराव—रामराम महाराज.

चंद्रकांत—रामराम. तुह्मी अगदीं थोडक्यांत चुकलांत बुवा ! येथें अगदीं लढाई जुंपायचा बेत आला होता, पण थोडक्यांत निभावलें.

विश्वासराव—दोन दांतपडके बुढ्ढे आह्मांला अगदीं चावूनचावून खाणार होते.

चंद्रकांत—हो; दौलतराव, आणि मल्हारराव. मला वाटतें, आमच्या हातून त्यांच्यापुढें मुळींच टिकाव धरवला नसता; नाहीं ?

प्रमोदराव—आपला पक्ष खोटा असला, ह्मणजे खरी वीरश्री चढायचीच नाहीं. मी तुह्मां दोघांनांच शोधीत होतों.

विश्वासराव—आणि आह्मी दोघेही एकसारखे तुमच्याच शोधांत होतों. हें पहा, आमच्या मनावर, कीं नाहीं, विलक्षण उदासीनता आली आहे; ती तुह्मी आपल्या तीक्ष्ण बुद्धीनें धुडकवून लावा पाहूं ?

प्रमोदराव—ती या म्यानांत आहे. तिचा प्रयोग तुमच्यावर करूं का ?

विश्वासराव—जरूर. आज कोणचा प्रयोग करून दाखविणार आपण ?

चंद्रकांत—पण कायहो, तुमचा चेहरा अगदीं फिक्कासा पडलेला दिसतो ? कांहीं होत तर नाहींना ? कां कांहीं फिकीरींत आहांत ?

विश्वासराव—यांनां फिकीर ! अहो प्रमोदराव, तुह्मी येवढे शूर ह्मणवून घेतां; लढाईंत मोठमोठ्या वीरांनां जमीनदोस्त करतां; असें असून काळजीसारख्या अचेतन, निरवयव, आणि स्त्रीलिंगी वस्तूला हार जातां, ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे बुवा !

प्रमोदराव—हें पहा विश्वासराव, तुह्मी येवढे शहाणे ह्मणवतां, असें असून मूर्खांसारखें बोलतां आणि आचरण करतां, ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे बुवा !

विश्वासराव—छे, अजून कांहीं तुमची तीक्ष्ण बुद्धि नीटशी चालत नाहीं. आतां दुसरा एखादा विषय तरी काढून पहा.

चंद्रकांत—पण हें काय हें ? यांची मुद्रा अधिक अधिकच पालटत चालली ! यांनां राग आला आहे खास.

विश्वासराव—आला तर आला; म्यानांतली तीक्ष्ण बुद्धि त्यांच्याजवळ आहेच; तिच्या मदतीनें त्यांनां आपला राग शांत करून घेतां येईल.

प्रमोदराव—इकडे या; तुमच्या कानांत एक गोष्ट सांगायची आहे.

विश्वासराव—हें पहा, कांहीं डोक्यांतल्या तीक्ष्ण बुद्धीचा उपयोग करायचा असला तर करा. मात्र म्यानांतलीचा नको हो !

प्रमोदराव—(विश्वासरावास) तुह्मांला इतकेंच सांगायचें कीं, तुह्मी महा नीच आहांत; ह्मणून मी तुह्मांला यमाजी भास्कर हिंसाकर यांच्या घरीं पाठवून द्यायचा बेत केला आहे. तुमची जर हिम्मत असेल तर माझ्याशीं द्वंद्वयुद्ध खेळायला तयार व्हा; नाहीं तर तुम्ही भित्र्या भागूबाई आहां, असें जिकडे तिकडे जाहीर करीन. बोला काय जबाब असेल तो. एका सुकुमार अबलेचा तुह्मीं वध केलात, त्याचें प्रायश्चित्त तुह्मांला भोगलेंच पाहिजे.

विश्वासराव—तुह्मी ह्मणाल तेव्हां माझी तयारी आहे. पाहूं तुमचा कसा काय समाचार घेतां येतो तो !

चंद्रकांत—समाचार कसचा घेतां ? मेजवानीचा बेतबीत आहे वाटतें ?

विश्वासराव—बरोबर आहे. पण पक्कान्न अगदींच पिळपिळीत आहे. तरी त्यांतल्या त्यांत हात दाखवायला कमी नाहीं करणार आपण.

प्रमोदराव—लाक्षणिक भाषण करण्यांत तुमची बुद्धि फार चांगली चालते बुवा !

चंद्रकांत—हो, बरी आठवण झाली. त्या दिवशीं चतुरिका तुमच्या बुद्धीची कशी तारीफ करीत होती सांगूं का ? मीं आपलें सहज ह्मटलें कीं,

प्रमोदराव बुद्धिवान् आहेत. तेव्हां ती ह्मणाली 'मनुष्य प्राण्याला देवानें बुद्धि दिलेलीच आहे, तेव्हां प्रमोदराव बुद्धिवान् आहेत, या ह्मणण्यांत कांहींच विशेष नाहीं.' मग मी तिला उलट ह्मणालों कीं, ते मोठे बुद्धिवान् आहेत. तेव्हां ती काय ह्मणते कीं 'त्यांची बुद्धि मोठी ह्मणजे स्थूल ह्मणजे जड आहे खरी !' मग मी पुन्हां तिला उत्तर दिलें कीं, त्यांची बुद्धि जड नसून चांगली आहे. तरी ती आपली पुन्हां ह्मणालीच कीं, 'चांगली आहे विचारी ! तिच्यापासून कधीं कोणाचें वाईट व्हायची भीति नाहीं.' तेव्हां मीं फिरून तिला ह्मटलें कीं 'तसें नव्हे, ते फार शहाणे गृहस्थ आहेत.' तेव्हां तिनें मोठ्या गंभीरपणानें उत्तर दिलें कीं, 'ते फार शहाणे आहेत खरे! तुमच्या आमच्यापेक्षां दीडपट शहाणे आहेत.' अखेर मीं हात टेंकले. आणखी अशाच तऱ्हेनें तिनें एक प्रहरभर तुमच्या एकेक गुणाची चिकित्सा चालविली होती. तरी पण शेवटीं सुस्कारा टाकून ती काय ह्मणाली सांगूं का ? ती असें ह्मणाली कीं, "एकंदरींत प्रमोदरावांच्या अंगीं मोहकपणा आहे खरा !"

विश्वासराव—आणखी असें देखील नाहीं का ह्मणाली कीं 'असला तरी मला काय करायचं आहे ?' मात्र असें ह्मणतांना तिचें तोंड अगदीं म्लान दिसत होतें.

चंद्रकांत—तें कांहीं का असेना ? येवढें मात्र खरें कीं, तिचें यांच्याबद्दलचें वाईट मत नाहींसें झालें, तर ती यांच्यावर मनापासून प्रेम करील. त्या ह्मातारीची पोर आह्मांला सारें सांगत असे.

विश्वासराव—अगदीं एकूण एक ! शिवाय हे आपलें भाषण ऐकत जाईच्या मंडपांत लपून बसले होते, तेव्हां देवाच्या नजरेस पडलेच.

चंद्रकांत—पण हिंदीपंचांतल्यासारखीं यांचीं विद्रूप चित्रें केव्हां काढायचीं ?

विश्वासराव—हो ! आणखी त्यांच्या खालीं 'कामांध झालेला प्रमोद' हीं अक्षरें लिहायचीं आहेत, नाहीं का ?

प्रमोदराव—कायरे ए वत्सा, फारसा रंगांत आला आहेस ? पण

येवढें बरें आहे कीं, तुझें बोलणें ह्मणजे खेळांतल्या बंदुकीसारखें आहे. त्याच्यापासून इजा मुळींच व्हायची नाहीं. ठीक आहे; मघाशीं सांगितलेलें ध्यानांत आहेच तुझ्या. महाराज, तुह्मीं सर्वांनीं मिळून त्या निष्पाप सरलेचा प्राण घेतलात, त्या अर्थीं तुमचा सहवास आतां पुरे करणें भाग आहे. आजपर्यंत तुह्मीं मला प्रेमानें वागविलेंत, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. तुमच्या बंधुराजांनीं येथून पोबारा केला आहे ह्मणे! अहो तुम्ही शूर, अजातश्मश्रू, तुमची आमची मुलाखत होईलच; तोंपर्यंत काय निरवानिरव करायची असेल ती करून घ्या. (जातो.)

चंद्रकांत—अरे ही स्वारी खरोखरच रागावली!

विश्वासराव—अगदीं मनापासून ! हें सारें त्या चतुरिकेच्या पायीं असावें, असें दिसतें.

चंद्रकांत—तुमच्याशीं द्वंद्वयुद्ध करणार का काय हे ?

विश्वासराव—हो; असें ठरवून गेले खरे !

चंद्रकांत—काय मौज आहे, मनुष्य एकदां प्रेमाच्या तडाख्यांत सांपडला, ह्मणजे काय काय गोष्टी करायला प्रवृत्त होतो पहा !

विश्वासराव—अहो, तो जे एकेक वेडे बेडे चाळे करूं लागतो, ते कांहीं विचारूं नका. त्याच्यापुढें जनावरें सुद्धां शहाणीं असें ह्मणायची पाळी येते.

चंद्रकांत—हें तुह्मी स्वतःच्या अनुभवावरून सांगतां वाटतें ? पण राहूंद्या; ही थट्टेची वेळ नव्हे. तुह्मांला आतां पुढचा विचार केला पाहिजे. प्रमोदराव काय ह्मणाले, आमच्या बंधुराजांनीं पळ काढला, नाहीं का ?

(सांभारे कोतवाल, पिंगळे, खांडव्या, चपाल्या, व कैद केलेले येसाजी आणि कोंडीबा प्रवेश करितात.)

कोतवाल—चला व्हा पुढें. कां दोस्त, दमलांत कीं काय ? अरे पाय उचल, पाय उचल. कां भूक लागली ? जरा थांब; तुला आतां लवकरच अपराधाचीं फळें खायला मिळतील; कांहीं घाबरूं नको. न्यायाच्या हातांत ह्मणे तागडी असते, आणि तो गुन्ह्याच्या भारंभार फळें खायला घालतो, हें माहीत आहे का तुला ?

चंद्रकांत—अरे हे तर दुर्मदरावाच्या पदरचे लोक ! यांनां कां बरें अटक केली असावी ? यांपैकीं एक येसाजी दिसतो आहे.

विश्वासराव—त्यांनीं काय गुन्हा केला विचारा बरें ?

चंद्रकांत—का हो कोतवाल, यांनां कां ह्मणून कैद केलें आहे ?

कोतवाल—महाराज, यांनीं खोटी बातमी उठविली. दुसरें कलम हें कीं, यांनीं अब्रुनुकसानीचा गुन्हा केला. सातवें आणि शेवटचें कलम असें कीं, यांनीं एक थोरामोठ्याची बाई वाईट चालीची आहे, असें खोटेंच उठविलें. तिसरें कलम असें आहे कीं, हे खोटें बोलले. आतां शेवटीं सांगायचें ह्मणजे इतकेंच कीं, हे पाजी हरामखोर लोक आहेत.

चंद्रकांत—पहिला प्रश्न मी तुह्मांला असा विचारतों कीं, यांनीं केलें काय ? तिसरा प्रश्न असा कीं, यांच्या हातून अपराध काय घडला ? सातवा आणि शेवटचा प्रश्न असा कीं, यांच्यावर तुमचा काय आरोप आहे ? आतां शेवटचा प्रश्न येवढाच कीं, यांनां कैद कशासाठीं केलें आहे ?

विश्वासराव—वाहवा ! तुह्मी यांच्यावर ताण केलीत ! एका प्रश्नाचीं कितीतरी रूपांतरें झालीं हीं !

चंद्रकांत—कायहो, तुह्मांला कोणत्या गुन्ह्यासाठीं पकडलें आहे ? या विद्वान् कोतवालांच्या गहन भाषणाचा भावार्थ माझ्या मुळींच लक्ष्यांत येत नाहीं.

येसाजी—महाराज, सगळी हकीकत आपल्यापाशीं सांगतों ती ऐकून घ्या; आणि विश्वासराव, आपण या चांडाळाला कायमचा नाहींसा करून टाका. मीं आपणां दोघांनां भुरळ पाडली; दोघांच्याही डोळ्यांत धूळ टाकली. आपल्यासारख्यांची कुशाग्र बुद्धि सुद्धां जिच्यायोगानें गुंग झाली, ती गोष्ट या अडाणी मूर्खांनीं जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिली. सरलाबाईची अपकीर्ति करण्यासाठीं दुर्मदरावांनीं मला भर दिली. आपण जो त्या रात्रीं प्रकार पाहिलात, त्यावेळीं खिडकीमध्यें खरोखर सरलाबाई नसून, त्यांची दासी अंजनी ही त्यांचीं वस्त्रें नेसून उभी होती, आणि

खालीं मी उभा होतों. येवढ्यावरून आपला गैरसमज झाला, आणि विश्वासरावांनीं लग्नाच्या वेळीं सरलाबाईंची फजीती करण्याचा निश्चय केला. ही सर्व हकीगत त्याच रात्रीं मी या कोंडीबाजवळ सांगत असतांना या लोकांच्या कानीं पडली, आणि त्यांनीं आह्मांला धरून नलें. अशी हकीगत आहे, महाराज. त्या साध्वीच्या नाशाला हा दुष्ट चांडाळ कारण झाला, तेव्हां याला मृत्यूखेरीज दुसरें शासन नाहीं. तें शासन, विश्वासराव, आपण मला ताबडतोब करा, येवढेंच मागणें आहे.

चंद्रकांत—हें भाषण तुह्मांला अगदीं शल्यासमान वाटत असेल, नाहीं ?

विश्वासराव—त्यांतलें प्रत्येक अक्षर मला अगदीं विषाप्रमाणें वाटत आहे.

चंद्रकांत—माझ्या भावानेंच का तुह्मांला हें घोर कृत्य करायला लावलें ?

येसाजी—होय; आणि त्याच्याबद्दल माझी मूठही खच्चून भरली.

चंद्रकांत—अरे राम राम ! तो ह्मणजे मूर्तिमंत राक्षस आहे ! ही गोष्ट उघडकीस येईल ह्मणूनच तो नाहींसा झाला असावा !

विश्वासराव—शिव शिव ! प्रिये सरले, या वेळीं तुझी मूर्ति नखशिखांत माझ्या डोळ्यांपुढें उभी रहात आहे; पण आतां काय त्याचा उपयोग !

कोतवाल—चला ओढा रे या चोरांना. एव्हांना त्या शिरस्तेदारानें दौलतरावांच्याजवळ सगळी हकीगत सांगितली असेल. तो भेटल्याबरोबर पहिली गोष्ट ही कीं, मी गध्धा आहें ह्मणून लिहून ठेवायचें. चला व्हा पुढें.

पिंगळे—हे पहा; ते दोघेही इकडेच येत आहेत.

(दौलतराव, मल्हारराव, व शिरस्तेदार प्रवेश करितात.)

दौलतराव—कोणचा तो चांडाळ मला दाखवा एकदां, ह्मणजे

पुन्हां त्याच्यासारखा माणूस दृष्टीस पडला, तर त्याच्यापासून दूर रहायला बरें पडेल. कोणचा, हा कां हा ?

येसाजी—मीच तो मानवी राक्षस, सरकार.

दौलतराव—नुसत्या तोंडच्या श्वासानें माझ्या सुशील कन्येचा प्राण घेणारा कृष्णसर्प तूंच का ?

येसाजी—मीच तो. माझ्याशिवाय कोणीही नाहीं.

दौलतराव—अरे दुष्टा, खोटें बोलूं नकोस. हे बघ, हे सन्मान्य पुरुष; हे तुझे साथीदार येथेंच उभे आहेत. आणि तो पसार झालेला काळतोंड्या, तोही तुझा साथीदार होता कीं नाहीं ? अहो महाराज, माझ्या पोरीचा गळा कापलात, अगदीं दिग्विजय केलात बरें ! आजपर्यंत जीं काय तुह्मीं श्लाघ्य कृत्यें केलीं असतील, जे जे पराक्रम गाजविले असतील, त्यांच्याबरोबर या स्तुत्य आणि स्मरणीय कर्माबद्दलचाही अवश्य लेख करवून ठेवा. ही अगदीं मुद्दाम नोंद करून ठेवण्यासारखी गोष्ट आहे, असें विचाराअंतीं तुह्मांलाही दिसून येईल.

विश्वासराव—आतां जितकें तुह्मी माझें मर्मभेदन कराल, तितकें सोसून घेणें आहे. आतां कोणच्या तोंडानें तुमची क्षमा मागावी हेंच मला सुचत नाहीं. माझ्या हातून अपराध घडला खरा; तेव्हां जितकें सुचेल तितकें कडक शासन तुह्मी मला करा. तें अगदीं विनतक्रार भोगण्याला मी कबूल आहें. तरीपण येवढें ध्यानांत असूं द्या कीं, माझ्या हातून जो अनर्थ घडला, त्याला कारण केवळ माझी गैरसमजूत आहे.

चंद्रकांत—आणखी माझी देखील अशीच स्थिति आहे. तथापि तुह्मी सांगाल ती गोष्ट करायला मी राजी आहें.

दौलतराव—बिचारी माझी पोर गेली ती गेलीच. ती थोडीच पुन्हां परत येते आहे ! तेव्हां तिला जिवंत करून द्या, असें कांहीं तुह्मांला ह्मणतां येत नाहीं. आतां येवढें करा कीं, तिचें आचरण शुद्ध होतें अशाबद्दल येथल्या लोकांची तुह्मी खात्री करून द्या. आणखी तुह्मी माझे जांवई झालां नाहीं तेव्हां या माझ्या बंधूंची मुलगी पत्करा. माझ्या सरलेपेक्षां

तिच्या अंगांत कोणत्याही प्रकारचा उणेपणा नाहीं. आह्मां दोघांनां आतां तिच्यावांचून कोणीही उरलें नाहीं. ह्मणून ह्मणतों कीं, तिला तरी चांगल्या तऱ्हेनें वागवा; ह्मणजे तुह्मी केलेला अपराध आह्मी विसरून जाऊ.

विश्वासराव—अहाहा! दौलतराव, तुमचें औदार्य पाहून माझा कंठ अगदीं दाटून येत आहे. तुमच्या पुतणीचा मी अगदीं कृतज्ञतापूर्वक अंगीकार करितों. आणखी यापुढें ठेवाल त्या स्थितींत राहण्यास मी तयार आहें.

दौलतराव—ठीक आहे; झाला तुमचा निश्चय? आतां या गृहस्थाची आणि अंजनीची रुजवात केली पाहिजे. त्या सटवीला देखील तुमच्या भावानेंच या कारस्थानांत फितवून घेतली होती, असें दिसतें.

येसाजी—तसा कांहीं भाग नाहीं, सरकार. आपल्या बोलण्याचा इतका दूरवर परिणाम होणार आहे, हें तिच्या ध्यानींमनीं देखील नव्हतें. या प्रकरणांत तिचें कोणत्याही प्रकारें अंग नाहीं. मला जी तिची माहिती आहे, तिच्यावरून ती मोठी योग्यतेची बायको आहे, असें मला वाटतें.

कोतवाल—माझी विनंति थोडी मान्य करा, सरकार. याच्या साक्षींत ही गोष्ट लिहून घेतलेली नाहीं; पण हा गृहस्थ मला गद्धा ह्मणाला, सरकार. याला शिक्षा सांगतांना या गोष्टीचा जरूर विचार करावा, अशी माझी विनंति आहे, सरकार. आणखी यांच्यापैकींच कोणशी एक टूम या नांवाची मुसलमानीण चोरटी आहे. तिनें आपल्या कपाळाला मोठमोठीं कुलपें आणि किल्ल्या अडकविल्या आहेत, सरकार.

खांडव्या—कुलप नव्हत सरकार; तिनं झुलप राखल्याती झुलप.

कोतवाल—बरें झुलपें असतील. ती काशीयात्रेला जायचें ह्मणून थापा मारून लोकांपासून पैसे उपटते, सरकार. ती कुठें आहे तिला हजर करायला सांगा यांनां.

दौलतराव—ठीक आहे, ठीक आहे. तुमचें सगळें ह्मणणें माझ्या लक्ष्यांत आलें आहे. त्याचा योग्य विचार करण्यांत येईल, समजलांत?

तुह्मी इतके खबरदारीनें काम करितां, ही अगदीं शिफारस करण्यासारखी गोष्ट आहे.

कोतवाल—आपलें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. देवानें आपल्याला जन्म दिला ही फार चांगली गोष्ट झाली, सरकार.

दौलतराव—हं, हें घ्या तुह्मांला बक्षीस. (अंगावरील वस्त्र त्यास देतो.)

कोतवाल—देव तुमचें कल्याण करो.

दौलतराव—आणखी त्या काशीरामेश्वराला जाणाऱ्या कुलपेंवाल्या मुसलमानणीचा शोध लावायला जा. आह्मी या इसमांनां आपल्या ताब्यांत घेतों.

कोतवाल—ठीक आहे. ए सभ्य गृहस्थ, यांच्या ताब्यांत जा. या बदमाषाला होता कीं नव्हता करून टाका, सरकार. कायरे, ए, आतां ह्मणशील कां मला गद्धा ? नाहीं, ह्मण, ह्मण ? बरें आहे; जाऊं सरकार मी आतां ? देव तुमचें कल्याण करो. चला दोस्त, चला.

(कोतवाल व पिंगळे जातात.)

दौलतराव—मग कसें काय विश्वासराव ? झाला ना तुमचा नक्की निश्चय ? लागूं आह्मी तयारीला ?

विश्वासराव—अगदीं बेलाशक.

दौलतराव—ठीक आहे. (पहारेकऱ्यांस) यांनां घेऊन चला रे. त्या अंजनीची आणि याची गट्टी कशी जमली, याची चौकशी केली पाहिजे. (जातात.)

प्रवेश २ रा.

[**स्थळ**—विश्रामबाग. प्रमोदराव व अंजनी प्रवेश करितात.]

प्रमोदराव—अग ए अंजनी, चतुरिकेला जरा इकडे धाडून दिलेंस तर—

अंजनी—तर काय कराल ? माझ्या सौंदर्यावर एखादं काव्य रचाल का ?

प्रमोदराव—हो हो, त्यांत काय आहे ? कमलनयन, कमलवदन, कमलशयन, कमलवसन, कमलरदन, कमलजघन अंजनी। तुझे डोळे कमळासारखे आहेत; तुझें तोंड कमळासारखें आहे; तुझे हातपाय कमळासारखे आहेत; गाल, नाक, पोट कमळासारखें आहे; असें ह्मणून तुझ्या अंगभर कमळेंच कमळें रचून टाकतों, ह्मणजे झालीच काव्यरचना. तुझ्या सौंदर्याचें वर्णन पाहूनच लोक जागच्याजागीं गार होतील.

अंजनी—तर मग यापासून दोघांचंही नुकसान आहे. एक तर तुमचं काव्य वाचून जितके लोक गार पडतील, तितक्यागणित तुह्मांला एकेकदां फांशीं जावं लागणार; पण त्याची मला फारशी काळजी नाहीं. आतां लोक जर असे भराभर गार पडूं लागले, तर माझ्या गळ्यांत मंगळसूत्र कोण बांधील ?

प्रमोदराव—वा ! बराच अर्थाचा अनर्थ करतेस ! एकंदरींत तुझी बुद्धि मोठी तीव्र आहे.

अंजनी—ह्मणजे तुमची अगदीं बोंथट आहे वाटतं ?

प्रमोदराव—माझी कशी का असेना; पण तूं मात्र संभाळ. कारण तुझी तीव्र बुद्धि तुलाच कधीं तरी जाचेल. बरें जा; चतुरिकेला पाठवून देतेसना ?

अंजनी—देईन, पण कृपा करून माझ्या सौंदर्यावर काव्य ऊर्फ कमळं रचूं नका.

प्रमोदराव—राहिलें ! (अंजनी जाते.) हो ! आपलें चतुरिकेवरचें कवन कोठपर्यंत आलें बरें ? हं. 'मी विव्हल कामशरानें। मज जीववि अधरसुधेनें ॥' हे दोन चरण तर साधले. आतां पुढल्या दोन ओळींत 'मला मदनरूपी अग्नि जाळीत आहे, तेव्हां सुखरूपी सागरांत बुडवून तूं माझ्या अंगाचा दाह शांत कर' असा अर्थ आला पाहिजे. ही कल्पना मोठी सुरस असून तिच्यांत उपमा कां उत्प्रेक्षा काय ह्मणतात तो अलंकारही आहे. यापैकींही एक चरण जुळला आहे. 'करि दग्ध अनंग मदंग'–पण यांत थोडी शंका आहे अजून. 'करि दग्ध–"अनंग मदंग"

ह्मणावें, कां "मदंग अनंग" ह्मणावें ? पण असो. त्यांत कांहीं विशेष नाहीं. तेव्हां काय झालें, "मी विव्हल कामशरानें । मज जीववि अधर-सुधेनें ॥ करि दग्ध अनंग मदंग । सुखसागर—" आतां मदंग याच्याशीं प्रास जुळेल असा शब्द पाहिजे; नाहीं का ? काय तोटा पडला आहे ?— 'मृदंग' 'पतंग' किंवा 'शंख.' पण यांचा संबंध येथें कसा आणावा ? छे बुवा, कविता करण्याच्या कामांत आपण अगदीं शंख आहोंत. येवढी एक ओळ मग जुळवितां येईल. पुढें काय बरें ? हं. विवेकरूपी सारथी माझ्या मनरूपी घोड्याला आवरून धरीत असतांना माझें मन तुझ्याकडे धांव घेत आहे. ही कल्पना पद्यांत गोंवली पाहिजे; पण नको. घोडा, लगाम, गाडीवाला या कल्पनेंत कांहीं प्रसाद नाहीं. उगीच ती चतुरिका मी घोडा आहें, असें ह्मणून माझी चेष्टा करूं लागेल. माझें तिच्यावर इतकें प्रेम आहे कीं, त्याच्या शतांश देखील मला कवितारूपानें प्रकट करितां येत नाहीं. एकंदरींत कविता रचणें कांहीं लहानसहान काम नव्हे. मीं पुष्कळ यत्न केला; पण 'व्याकूळ', आणि 'बकूळ' किंवा 'जांभूळ'; 'पीडा' आणि 'किडा'; 'बांधा' आणि 'कांदा' यांशिवाय दुसरें यमकच मला सुचत नाहीं. (चतुरिका येते तिला उद्देशून) प्रिये चतुरिके, अशीच तूं नेहमीं मी बोलावल्याबरोबर येत जाशीलना ?

चतुरिका—होय. आणखी तुह्मीं जा ह्मणून सांगितल्याबरोबर जात जाईन.

प्रमोदराव—बरोबर आहे. बोलावलें ह्मणजे येत जा; आणि जायला सांगितलें ह्मणजे जात जा.

चतुरिका—हें पहा, तुह्मी 'जा' ह्मटलंत. जात्यें मी आतां. पण विश्वासरावाचं आणि तुमचं काय झालं तें सांगा अगोदर.

प्रमोदराव—आमचें सपाटून कुत्सित भाषण झालें. येवढ्या कामगिरीबद्दल तुझ्याकडे एक मुका लागू झाला; तो मी घेणार.

चतुरिका—मी देणार नाहीं. कारण तुह्मीं कुत्सित भाषण केल्यानं तुमचं तोंड कलुषित झालं आहे; ह्मणजे तुमचं तोंड अपवित्र आहे; ह्मणजे

अस्पृश्य आहे; ह्मणजे स्पर्श करण्याला अयोग्य आहे; ह्मणून मी तुमच्या तोंडाचा आपल्या तोंडाला स्पर्श होऊं देणार नाहीं; ह्मणजे मी तुह्माला मुका देणार नाहीं.

प्रमोदराव—मी तुला पुढें बोलूं देणार नाहीं. (तिचें चुंबन घेतो.) तूं तर्कशास्त्राचें बरेंच अध्ययन केलें आहेस असें दिसतें; मोठी तर्कटी बुवा! बरें, खरें सांगूं तुला ? विश्वासरावांनां मीं द्वंद्वयुद्धाला बोलावलें आहे. ते जर नाहीं पुढें आले, तर त्यांनां लोकांत तोंड दाखवायला जागा ठेवणार नाहीं. तें असो. पण माझ्या अंगच्या कोणत्या दुर्गुणावरून तूं पहिल्या प्रथम माझ्यावर लुब्ध झालीस ?

चतुरिका—सगळ्यांवरूनच. तुमच्या अंगचे दुर्गुण आपली बाजू अशी कायम राखीत आहेत कीं, ते एका सद्गुणाला देखील वर मान काढूं देत नाहींत. बरं, पण—माझ्या अंगच्या कोणच्या सद्गुणानं तुह्मांला प्रथम मोहून टाकलं ?

प्रमोदराव—मला मोह पडला हेंच खरें! कारण मी तुझ्यावर प्रेम करितों, ह्या गोष्टीला माझ्या मनाची मुळींच संमति नाहीं.

चतुरिका—तर मग माझ्या पायीं तुह्मी आपल्या मनाचा द्वेष करीत असाल ? आतां तुमच्या वतीनं मला देखील त्याचा द्वेषच केला पाहिजे. जळो तें मेलं तुमचं मन! जी गोष्ट तुह्मांला नावडती आहे, तिची आवड मी कधींही धरणार नाहीं. इश्शरे मन!

प्रमोदराव—वा! तुमच्या आमच्या प्रेमांत जर कांहीं रंग असेल, तर तो या लाथाळ्यांत आहे. आपल्या प्रेमाला अशा तऱ्हेच्या उकळ्या फुटल्याखेरीज कधींही राहणार नाहींत; कारण आपले स्वभाव आणि अक्कलाच तशा दिव्य पडल्या!

चतुरिका—खरे शहाणे जे असतात, ते कांहीं अशी आपल्या अक्कलेची बढाई सांगत नाहींत.

प्रमोदराव—खुळी आहेस तूं! अग, आज काल जो गृहस्थ स्वतः-

च्या तोंडाभोंवतीं दिवे ओंवाळून घेत नाहीं, त्यानें आपलें नांव चिरकाल राहण्याची आशाच करायला नको. त्याच्या होळीभोंवतीं जो पांचजन्याचा गजर होईल, आणि त्याची बायको जी काय थोडीफार रडेल, तेवढेंच;—

चतुरिका—ह्मणजे सुमार किती वेळ ?

प्रमोदराव—त्याची कवटी फुटायला एक अर्धा पाऊण तास, आणि मंडळींनां घरीं येऊन त्याच्या बायकोची समजूत पाडायला जेमतेम एक पंधरा वीस मिनिटें.मिळून तो मेल्या घटकेपासून शिकस्त तास दीड तासांतला सर्व कारभार आहे. नंतर कोणाला त्याची आठवण देखील होत नाहीं ! ह्मणून ह्मणतों कीं, ज्याला कांहीं अक्कल असेल, आणि मनाचा जाच नसेल, त्यानें माझ्याप्रमाणें आपली स्वतःची पुंगी वाजवीत असावें. या खुब्या मला समजतात, ह्मणूनच मी शहाणा. आणखी मी शहाणा आहें, ह्मणूनच स्वतःची बढाई मिरवितों. तें असो, पण सरलेचें कसें काय आहे ?

चतुरिका—कांहीं नीट नाहीं.

प्रमोदराव—बरें, तुझें तरी ?

चतुरिका—तसंच.

प्रमोदराव—मग माझ्यावर सपाटून प्रेम करूं लाग; ह्मणजे तेव्हांच बरें वाटूं लागेल. पण हिच्या जिवाची कां येवढी धांदल उडाली आहे ?

मालती—(प्रवेश करून) चला बाईसाहेब, या पावलीं वाड्यांत चला. तिकडे काय गडबड उडाली आहे अगदीं. दुर्मदरावांनीं विश्वासरावांनां पुरं फसवलं असून, सरलाबाई अगदीं निष्कलंक आहेत, असं ठरलं ! आणखी दुर्मदराव ह्मणे कुठें नाहींसे झाले आहेत.

चतुरिका—खरंच का ? तर मग ही मी आल्येंच हो. तुह्मी नाहीं का येत ?

प्रमोदराव—तूं जिकडे जाशील, तिकडे तुझ्या हृदयांत मी आहेंच. पण तूं एवढी बोलावते आहेस, तुला नाहीं कसें ह्मणावें ? (जातात.)

प्रवेश ३ रा.

[स्थळ—दौलतरावांचा वाडा. दौलतराव, मल्हारराव, प्रमोदराव, विद्याधर पंडित, सरला, चतुरिका, अंजनी व मालती बोलत आहेत.]

विद्याधर—मी ह्मणत नव्हतों ती निष्पाप आहे ह्मणून ?

दौलतराव—त्याचप्रमाणें विश्वासराव आणि महाराज हेही निर्दोष आहेत, असें आतां ठरलेंच. आतां जाणूनबुजून न कां होईना, पण अंजनीची थोडी चूक झाली खरी !

मल्हारराव—जाऊं द्या, आतां काय त्याचें ? सगळ्या गोष्टी पूर्ववत् जुळून आल्या, हा ईश्वराचा मोठा अनुग्रहच समजला पाहिजे.

प्रमोदराव—बरोबर आहे. या गोष्टींचा उलगडा झाला, हें फार चांगलें झालें, नाहींतर बिचारे विश्वासराव फुकट प्राणाला मुकले असते.

दौलतराव—बरें चतुरिके, सरले, तुह्मी आतां पलीकडल्या दिवाणखान्यांत जाऊन बसा; आणखी मी हांक मारली, ह्मणजे साऱ्याजणी बुरखे घेऊन इकडे या. (सर्व स्त्रिया जातात.) महाराज आणि विश्वासराव येण्याची अगदीं वेळ होत आली. भाऊ, सरला स्वतःची मुलगी ह्मणून विश्वासरावांनां द्यायची; ध्यानांत आहेना ?

मल्हारराव—हो हो; तें काम माझ्याकडे लागलें.

प्रमोदराव—अहो गुरूजी, आमच्यासाठीं थोडी तसदी घ्याल का ?

विद्याधर—ती कशासाठीं बुवा ?

प्रमोदराव—चतुरिकेच्या सौभाग्यप्राप्तीसाठीं; किंवा—त्याचा काय नियम—माझ्या दुर्भाग्यप्राप्तीसाठीं ह्मणा. हें पहा दौलतराव, तुमच्या पुतणीची माझ्यावर अत्यंत प्रणयदृष्टि आहे.

दौलतराव—माझ्या मुलीनें तिच्या डोळ्यांत तसेंच कांहीं अंजन घातलें होतें.

प्रमोदराव—या तुमच्या संदिग्ध भाषणांतला भावार्थ मला कांहींच समजत नाहीं. आतां, माझेंही पण तिच्यावर निस्सीम प्रेम आहे.

दौलतराव—त्याला कारण, मला वाटतें, महाराज, विश्वासराव, आणि मी आहोंत. बरें पण पुढें तुमचें ह्मणणें काय ?

प्रमोदराव—इतकेंच कीं, आमच्या दोघांच्या विवाहाला तुमची सम्मति असावी. आणखी गुरूजी, तुह्मांला तसदी द्यायची ती याच कामांत.

दौलतराव—तुमचें ह्मणणें मला मान्य आहे.

विद्याधर—आणि शुभ मंगल करायला मी तयार आहें. हे पहा महाराज आणि विश्वासराव आले.

(चंद्रकांत, विश्वासराव व इतर दोन तीन लोक येतात.)

दौलतराव—यावें. कसें काय विश्वासराव ? माझ्या पुतणीला वरण्याचा तुमचा निश्चय अद्यापि कायम आहेना ?

विश्वासराव—हो, हो; हें काय विचारणें ? ती कसली जरी हेडंबा असती, तरी तिला गृहिणीपद देण्याला मी कचरलों नसतों.

दौलतराव—जा भाऊ, तिला घेऊन या जा.

चंद्रकांत—कां प्रमोदराव, तुमच्या चेहऱ्यावरचा प्रफुल्लितपणा नाहींसा व्हायला असें झालें आहे तरी काय ?

विश्वासराव—त्यांच्या डोळ्यांपुढें आतां हिंदीपंचांतलीं चित्रें दिसायला लागलीं आहेत, आणि काय ? अहो, असे घाबरूं नका. देवादिकांचा सुद्धां जेथें निग्रह ढळला, तेथें तुमची काय कथा ? हें पहा, जरी तुमचीं गाढवासारखीं चित्रें काढलीं, तरी तीं उत्तम चिताऱ्यांकडून काढवूं, आणि त्यांनां सोनेरी रंग द्यायला सांगूं; मग तर झालें ? नुसती आकृति गाढवाची असली ह्मणून काय झालें ?

प्रमोदराव—कांहीं नाहीं; पण ही तुमची कृति मात्र हुबेहुब तुह्मी ज्याच्यासारखें माझें चित्र काढणार आहां, त्याच्यासारखी आहे. अहो, सासुरवाडीस तरी माणसासारखे वागा.

विश्वासराव—ठीक आहे. याचा वचपा काढीन केव्हांनां केव्हांतरी. [मल्हारराव व सर्व स्त्रिया (बुरखे घेऊन) येतात.] यांपैकीं माझी पत्नी कोणची ?

मल्हारराव—ही पहा.

विश्वासराव—ये प्रिये, मला एकदां तुझें मुख बघूं दे.

दौलतराव—छे छे. या गुरुजींच्या समक्ष तिचें पाणिग्रहण करण्याबद्दल तुह्मीं वचन दिल्याशिवाय तिचें मुख तुमच्या दृष्टीस पडायचें नाहीं.

विश्वासराव—मी तुला आपली पत्नी करीन, आणि प्रेमानें वागवीन; याबद्दल हें घे माझें वचन.

सरला—मी जेव्हां जिवंत होत्यें, तेव्हां आपलीच पत्नी होणार होत्यें. आणि आपण माझ्यावरच प्रेम करीत असून माझे पति होणार होतां. (बुरखा काढते.)

विश्वासराव—अरे ! ही तर दुसरी सरलाच आहे !

सरला—होय. दुष्कीर्ति झालेली सरला गेली. पण मी जिवंत असून पवित्र आहें.

चंद्रकांत— काय ही सरला ? सरला तर मेली ?

दौलतराव—तिच्या नांवावरचा कलंक जोंपर्यंत जिवंत होता, तोंपर्यंतच ती मेली होती.

विद्याधर—हें काय गौडबंगाल आहे, तें सारें मी तुह्मांला सावकाशपणें सांगेन. अगोदर हे लग्नविधि यथासांग होऊंद्या; चला.

प्रमोदराव—अहो पण जरा थांबा. नवरदेवापेक्षां तुमचाच उतावळेपणा जास्त दिसतो कीं ! ह्यांतली चतुरिका कोणची ?

चतुरिका—ही. आपलं काय ह्मणणं आहे ?

प्रमोदराव—तुझें माझ्यावर प्रेम आहेना ?

चतुरिका—मुळींच नाहीं. तुमच्यावर माझं प्रेम जडायला कारण ?

प्रमोदराव—तर मग दौलतराव आणि ही सगळी मंडळी फसली ह्मणायची ?

चंद्रकांत—असें झालें खरें बुवा. आह्मीच फसलों !

चतुरिका—बरं, तुमचं माझ्यावर प्रेम आहे कीं नाहीं ?

प्रमोदराव—मुळींच नाहीं. तुझ्यावर माझें प्रेम जडायला कारण ?

चतुरिका—तर मग या सरला आणि मालती पुऱ्याच फसल्या ह्मणायच्या ?

अंजनी—त्या फसल्या, कां त्यांनीं कोणाला फसवलं, कोणास ठाऊक !

प्रमोदराव—हे दौलतराव तर ह्मणत होते तूं अगदीं माझ्यावांचून झुरणीला लागली होतीस ह्मणून ?

चतुरिका—आणि सरला ह्मणत होती कीं, तुह्मी माझ्यासाठीं प्राण टाकीत होतां ?

प्रमोदराव—भलतेंच कांहीं तरी. मग काय माझ्यावर तुझें प्रेम नाहीं ह्मणतेस ?

चतुरिका—ओळखीच्या माणसांवर असायचं त्याहून अधिक मुळींच नाहीं.

दौलतराव—आतां उगीच कां ओढून चंद्रबळ आणतां ? तुझें त्यांच्यावर प्रेम आहे खास.

विश्वासराव—आणि यांचेंही तिच्यावर आहे. याला प्रमाण हवें असलें, तर हें पहा यांच्या स्वतःच्या हातचें आणि स्वकपोलकल्पित चतुरिकेवर रचलेलें कवन.

सरला—आणखी हें पहा दुसरं एक हिनं त्यांनां उद्देशून लिहिलं आहे. हें मला तिच्या उशीखालीं सांपडलं.

प्रमोदराव—अरे बापरे ! आमच्या विरुद्ध अगदीं लेखीच पुरावा आणला यांनीं ! बरें ये; अगदीं झुरणीला लागली होतीस, तेव्हां मला तुझी फार दया येते आहे; घेतों मी तुला आपली बायको करून.

चतुरिका—बरं आहे; माझी कांहीं ना नाहीं. पण खरं ह्मणाल तर माझ्यासाठीं तुह्मी अगदीं प्राण टाकीत होतां, येवढ्याकरितांच मी तुह्मांला पत्करीत आहें हो ?

प्रमोदराव—बरें, गप्प बैस. एकटी असतीस तर बागेंतल्यासारखें तुझें तोंडच बंद करून टाकलें असतें.

चंद्रकांत—कां प्रमोदराव, अखेरीस तुह्मीं चतुर्भुज होण्याचें ठरविलेंत, हें कसें काय ?

प्रमोदराव—असें आहे कीं, तुह्मीं अगदीं वेंचक वेंचक अशा शंभर थट्टेखोर लोकांची तुकडी आणून, त्यांच्या शंभर तोंडांचे तोफखाने जरी एकदम आमच्यावर सुरू केलेत, तरी आमचें मन हार जाणार नाहीं. तुमच्या कुचेष्टांनां मी भीक घालीन, असें तुह्मी समजतां होय ? प्रतिकूल टीकेला फाजील महत्व देऊन जो गृहस्थ उद्दिष्ट कार्यापासून पराङ्मुख होतो, त्यानें आपल्या मनोरथांवर उदकच सोडलें पाहिजे. तुह्मांला सांगतों, मला ज्या अर्थीं लग्न करायचें आहे, त्या अर्थीं त्याच्या विरुद्ध कोणीं कांहीं जरी केलें, तरी त्याला मी मुळींच जुमानणार नाहीं. लग्नाविरुद्ध मीं जी काय बडबड केली असेल, तिचा अनुवाद करून मला खिजविण्याचा तुमचा प्रयत्न बिलकूल सिद्धीस जाणार नाहीं. आतां मी स्वतःच्या अनुभवावरून येवढें सांगतों कीं, मनुष्यप्राणी ह्मणजे खरोखर मोठी अगम्य वस्तु आहे बुवा ! त्याच्या डोक्यांत कोणच्या वेळीं काय वेड शिरेल, आणखी तो आपल्या पूर्व चरित्राशीं व एकंदर वर्तनाच्या धोरणाशीं विसंगत दिसणाऱ्या काय काय गोष्टी करण्याला प्रवृत्त होईल, याचा कांहीं भरंवसा नाहीं. बरें असो. अहो तुह्मी विश्वासराव, तुह्मी आमचे नातेवाईक झालांत ह्मणूनच वाचलांत बरें कां ? नाहींतर या पठ्याशीं गांठ होती.

विश्वासराव—आमच्या चतुरिकेकडे पाहून मी तुमची दया करतों हो ! नाहींतर अजूनही तुह्मांला हात दाखविला असता.

प्रमोदराव—तुह्मी हात दाखवून अवलक्षणच करून घ्याल. आमच्या सरलेबद्दल भलत्या सलत्या शंका पुन्हां मनांत आणूं नका बरें क ? संभाळा.

एक शिपाई—(प्रवेश करून) महाराज, फरारी झालेल्या दुर्मदरावांनां पकडून आणलें आहे; आतां आपली जशी आज्ञा होईल त्या—

प्रमोदराव—सध्यां त्याला सक्त पाहऱ्यांत असूंद्या, जा. आमच्या विवाहाचे सोहाळे यथासांग आटोपल्यावर मग त्याच्याबद्दलचा विचार करतां येईल. (शिपाई जातो.) चला आतां अगोदर सर्वजण मिळून यथास्थित भोजन करूं. कां महाराज, तुमच्या मनांत आमच्याबद्दल स्पर्धा उत्पन्न झाली वाटतें ? तुह्मी देखील एखादी बायको पटकावा ह्मणजे झालें ! छे बुवा, ज्याला बायको नाहीं, त्याचें जिणें अगदीं व्यर्थ ! ! !

[समाप्तीचा पडदा पडतो.]